# <u>मिरा भाईंदर महानगरपालिका</u>

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. महासभा दि. २६/०२/२०१८**

आज सोमवार दि. २६/०२/२०१८ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०६ दि. १४/०२/२०१७ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | **डिम्पल विनोद मेहता** | **महापौर** |
| २) | **चंद्रकांत सिताराम वैती** | **उपमहापौर** |
| ३) | **धृवकिशोर मन्साराम पाटील** | **सभापती, स्थायी सामिती** |
| ४) | **पाटील रोहिदास शंकर** | **सभागृह नेता** |
| ५) | **भोईर राजू यशवंत** | **विरोधी पक्षनेता** |
| ६) | **भोईर सुनिता शशिकांत** | **सदस्या** |
| ७) | **शाह रिटा सुभाष** | **सदस्या** |
| ८) | **तिवारी अशोक सूर्यदेव** | **सदस्य** |
| ९) | **पांडेय पंकज सूर्यमणि** | **सदस्य** |
| १०) | **गोहिल शानू जोरावर सिंह** | **सदस्या** |
| ११) | **कांगणे मीना यशवंत** | **सदस्या** |
| १२) | **सिंह मदन उदितनारायण** | **सदस्य** |
| १३) | **शेट्टी गणेश गोपाळ** | **सदस्य** |
| १४) | **कदम अर्चना अरुण** | **सदस्या** |
| १५) | **नलावडे दिनेश दगडु** | **सदस्य** |
| १६) | **भोईर गणेश गजानन** | **सदस्य** |
| १७) | **पाटील प्रभात प्रकाश** | **सदस्या** |
| १८) | **गुप्ता कुसुम संतोष** | **सदस्या** |
| १९) | **पाटील धनेश परशुराम** | **सदस्य** |
| २०) | **पाटील वंदना मंगेश** | **सदस्या** |
| २१) | **रावल मेघना दिपक** | **सदस्या** |
| २२) | **शाह राकेश रतिशचंद्र** | **सदस्य** |
| २३) | **सिंग श्रीप्रकाश जिलेदार** | **सदस्य** |
| २४) | **जैन गीता भरत** | **सदस्या** |
| २५) | **जैन सुनिता रमेश** | **सदस्या** |
| २६) | **जैन राजेंद्र भवरलाल** | **सदस्य** |
| २७) | **रॉड्रीकस मोरस जोसेफ** | **सदस्य** |
| २८) | **भूप्ताणी रक्षा सतीश (शाह)** | **सदस्या** |
| २९) | **मोकाशी दिपाली आनंदराव** | **सदस्या** |
| ३०) | **व्यास रवि वासुदेव** | **सदस्य** |
| ३१) | **परेरा कॅटलीन एन्थोनी** | **सदस्या** |
| ३२) | **रकवी वैशाली गजेंद्र** | **सदस्य** |
| ३३) | **खंडेलवाल सुरेश जगदीश** | **सदस्य** |

| | | |
|---|---|---|
| ३४) | परदेशी गिता हरीश | सदस्या |
| ३५) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ३६) | सय्यद नुरजाहाँ नाझर हुसेन | सदस्या |
| ३७) | शेख अमजद गफार | सदस्य |
| ३८) | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | सदस्य |
| ३९) | घरत तारा विनायक | सदस्या |
| ४०) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४१) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| ४२) | शिर्के अनंत गेणू | सदस्य |
| ४३) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| ४४) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ४५) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| ४६) | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | सदस्या |
| ४७) | शेट्टी अरविंद आनंद | सदस्य |
| ४८) | गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ४९) | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | सदस्या |
| ५०) | थेराडे संजय अनंत | सदस्य |
| ५१) | मुखर्जी अनिता बबलू | सदस्या |
| ५२) | हसनाळे ज्योत्सना जालींदर | सदस्या |
| ५३) | पारधी सुजाता यशवंत | सदस्या |
| ५४) | म्हात्रे सचिन केसरीनाथ | सदस्य |
| ५५) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ५६) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ५७) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| ५८) | भोईर विणा सुर्यकांत | सदस्या |
| ५९) | भोईर कमलेश यशवंत | सदस्य |
| ६०) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ६१) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ६२) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ६३) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ६४) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ६५) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ६६) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ६७) | सोंस नीला बर्नाड | सदस्या |
| ६८) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| ६९) | शेख रुबीना फिरोझ | सदस्या |
| ७०) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ७१) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ७२) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |
| ७३) | परमार हेतल रतिलाल | सदस्या |
| ७४) | भट दीप्ती शेखर | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| **७५)** | **कासोदारिया अश्विन शामजीभाई** | **सदस्य** |
| **७६)** | **जैन दिनेश तेजराज** | **सदस्य** |
| **७७)** | **भावसार वंदना संजय** | **सदस्या** |
| **७८)** | **शाह सीमाबेन कमलेश** | **सदस्या** |
| **७९)** | **दुबे मनोज रामनारायण** | **सदस्य** |
| **८०)** | **विराणी अनिल रावजीभाई** | **सदस्य** |
| **८१)** | **सपार उमा विश्वनाथ** | **सदस्या** |
| **८२)** | **अहमद साराह अकरम** | **सदस्या** |
| **८३)** | **इनामदार जुबेर अब्दुल्ला** | **सदस्य** |
| **८४)** | **भोईर जयेश भानुदास** | **सदस्य** |
| **८५)** | **म्हात्रे नयना गजानन** | **सदस्या** |
| **८६)** | **भानुशाली वर्षा गिरधर** | **सदस्या** |
| **८७)** | **म्हात्रे विनोद काशिनाथ** | **सदस्य** |
| **८८)** | **बांड्या एलायस दुमिंग** | **सदस्य** |

**गैरहजर सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| **१)** | **ढवण निलम हरीश्चंद्र** | **सदस्या** |
| **२)** | **म्हात्रे परशुराम पदमाकर** | **सदस्य** |
| **३)** | **अरोरा दीपिका पंकज** | **सदस्या** |
| **४)** | **शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम** | **सदस्य** |
| **५)** | **गोविंद हेलन जॉर्जी** | **सदस्या** |
| **६)** | **बगाजी शर्मिला विन्सन्ट** | **सदस्या** |

**रजेचा अर्ज -**

| | | |
|---|---|---|
| **१)** | **अग्रवाल सुशील गोपीकिशन** | **सदस्य** |

**मा. महापौर :-**

उपस्थित सर्व मान्यवर पदाधिकारी, गटनेते, नगरसेवक, नगरसेविका, मा. आयुक्त, अधिकारी यासोबत नागरिक यांचे स्वागत करते. दि. ०१/०३/२०१८ रोजी होळी सण व दि. ०२/०३/२०१८ रोजी धुलीवंदन सणाच्या सर्वांना होळीच्या व धुलीवंदनाच्या शुभेच्छा! होळीच्या सणामध्ये पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. ही बाब लक्षात घेऊन सर्वांनी पाणी जपून वापर करावे, पाण्याचा अतिरेक टाळावा. तसेच पर्यावरणाचा नाश होणार नाही याचा विचार करुन होळी सण साजरा करावा. सर्वांनी आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात व शांततेने पार पाडावी. सभेचे कामकाज सुरु करावे.

**प्र. नगरसचिव :-**

मा. पिठासीन अधिका-यांच्या परवानगीने, **मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सोमवार दि. २६/०२/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र . ०६ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.**

शानु गोहिल :-

महापौरांच्या परवानगीने **सन 2013-14 या वर्षात चांगले कार्य केल्याबद्दल अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था , मुंबई मार्फत तत्कालीन महिला व बालकल्याण समितीस उत्कृष्ट काम केल्याबद्दल रु.11,000/- (अक्षरी अकरा हजार मात्र) पुरस्कार मिळाल्याबद्दल हि सभा अभिनंदन करीत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**रिटा शहा :-**

माझे अनुमोदन आहे.

**अभिनंदन ठराव क्र. ७३ :-**

**सन 2013-14 या वर्षात चांगले कार्य केल्याबद्दल अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था , मुंबई मार्फत तत्कालीन महिला व बालकल्याण समितीस उत्कृष्ट काम केल्याबद्दल रु.11,000/- (अक्षरी अकरा हजार मात्र) पुरस्कार मिळाल्याबद्दल हि सभा अभिनंदन करीत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**सुचक :- श्रीम. शानु गोहिल          अनुमोदक :- श्रीम. रिटा शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**धृवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम दि. २५ जानेवारी रोजी भाईंदर पश्चिम येथील कमला पार्कच्या पाण्याच्या टाकीजवळ क्लोरीनचा एक मोठा बॉटल होता. तिकडून क्लोरीन गॅस लिकेज झाला आणि त्या क्लोरीन गॅस लिकेजने त्या परिसरामध्ये खुप मोठ्या प्रमाणात क्लोरीन पसरल्यानंतर त्या लोकांना श्वासोच्छवासाला त्रास झाला ती पूर्ण बिल्डींग खाली करण्यात आली. रात्री जवळ-जवळ १.३० वाजताची घटना आहे आणि त्यावेळेला आपल्या फायर ब्रिगेडची माणसं आणि वॉटर डिपार्टमेन्टचे इंजिनियर रणदिवे आणि विठ्ठल या लोकांनी खुप चांगल काम केल. तो क्लोरीनचा ताबडतोब बॉटल काढला. फायर ब्रिगेडच्या गाडीतून तो बॉटल आपल्या समुद्राच्या खाडीमध्ये टाकून तिकडच्या लोकांचे, रहिवाशांचे खुप त्यांनी चांगले काम केले. त्याच्यानंतर आपण त्यांचा सत्कार करावा अशी मी आपणाला विनंती करतो.

**मा. महापौर :-**

अनुमती आहे त्यांना बोलावून घ्या.

**रोहिदास पाटील :-**

महापौर मॅडम मिरा भाईंदर महापालिका मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात दि.२६ व २७ जुलै २००५ मध्ये अतिवृष्टीमुळे पुरपरिस्थिती निर्माण झालेली होती. या काळात श्री.जगदिश ल. पाटील यांनी कर्तव्य दक्षतेने लोकांचे प्राण वाचवून केलेल्या उल्लेखनिय कामगिरीबद्दल मिरा भाईंदर महानगरपालिकेने त्यांचा सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यांत आलेले होते.

दि.०२/०५/२००६ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात चेणा पुल येथे झालेल्या अपघातात जखमी झालेल्या प्रवाशांचे तात्काळतेने अपघातस्थळी जाऊन जखमींचे प्राण वाचविण्यांत मदत केल्याबद्दल त्यांचे मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे सन्मानित करण्यांत आलेले होते तसेच तत्कालिन आयुक्त यांनी त्यांची मा.राष्ट्रपती पदकाकरिता शिफारस केलेली होती.

दि.११/०७/२००६ रोजी रेल्वे बॉम्बस्फोटात जखमी झालेल्या नागरिकांना प्राण वाचविण्यांत कर्तव्य दक्षतेने केलेल्या कामगिरीबद्दल मिरा भाईंदर महानगरपालिका तत्कालिन आयुक्तांनी त्यांची सन्मानचिन्हाकरिता शिफारस केलेली होती.

दि.२३/०९/२०११ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खारीगांव येथील लता अपार्टमेंट इमारतीचा स्लॅब कोसळल्याचा दुर्घटनेत झालेल्या नागरिकांचे प्राण वाचविण्यांत कर्तव्य दक्षतेने केलेल्या कामगिरीबद्दल त्यांची मिरा भाईंदर महानगरपालिका तत्कालिन आयुक्तांनी मा.राष्ट्रपती पदकाकरिता शिफारस केलेली होती.

दि.२१/०६/२०१२ रोजी मंत्रालय मुंबई येथे इमारतीस लागलेली आग आपल्या मनपाच्या अग्निशमन विभागात कार्यरत असलेल्या श्री.जगदिश पाटील यांनी रोजनबार ह्या ऑस्ट्रीया कंपनी (युरोप) टन टेबल लॅडर वाहनाव्दारे विझविल्याबद्दल रोजनबार कंपनीने ऑस्ट्रीया (युरोप) येथे गौरविलेले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कर्तव्य दक्षतेने कामगिरी केल्याबद्दल मा.आयुक्त यांनी ०३ वेळा श्री.जगदिश पाटील यांची राष्ट्रपती पदकाकरिता शिफारस केली आहे.

मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रात भाईंदर (प) कमला पार्क येथे पाण्याची टाकी असुन सदर पाण्याचा टाकीतील पाणी शुध्दीकरण करणेकरिता क्लोरिन वायुचा उपयोग केला जातो. दि.२५/०१/२०१८

रोजी रात्री ११.३० वा सदर पाण्याच्या टाकीवर क्लोरिन वायुची गळती सुरु झाली होती. क्लोरिन वायुमुळे आसपासच्या १० इमारतीस त्याची बाधा होऊन नागरिकांना त्याचा त्रास होऊ लागला त्यात आबालवृध्द व लहान मुलांचा जास्त समावेश होता. त्यावेळी रात्रपाळीसाठी कार्यरत असलेले अग्निशमन विभागातील श्री.जगदिश पाटील व इतर १६ जणांनी आपल्या प्राणाची पर्वा न करता आसपासच्या इमारतीतील लोकांना सुखरुप बाहेर काढले व क्लोरिन वायुचा गळका बाटला ज्यामध्ये १६५ किलो क्लोरिन वायु होता त्याला भाईंदर (प) येथील समुद्रात विसर्जित केले व क्लोरिन वायुची गळती रोखण्यास यशस्वी होऊन सुमारे ५०० लोकांचे प्राण वाचविण्यात श्री.जगदिश पाटील व इतर अग्निशमन दलाचे अधिकारी/कर्मचारी यांनी यश संपादन केले.

ही खचितच मोठी कामगिरी आपल्या मनपाच्या अग्निशमन अधिकारी व कर्मचा-यांनी केलेली आहे. त्यांचा फक्त शाल व श्रीफळ देऊन सन्मानित करणे योग्य ठरणार नाही. त्यांनी वेळोवेळी मनपास दिलेले योगदान हे बहुमूल्य असून त्यांनी कर्त्यव्यदक्ष व प्रामाणिकपणे केलेल्या कार्याची कुठेतरी गंभीर दखल घेण्यांत येऊन व त्यांच्या अग्निशमन विभागातील गेल्या २७ वर्षाचा अनुभव लक्षात घेऊन तसेच त्यांच्या अनेक वर्षापासून केलेल्या मागणीचा विचार करुन श्री. जगदिश ल.पाटील यांना “सब स्टेशन ऑफीसर” या पदावर कायम केल्यास हाच त्यांचा खरा व यथोचित सत्कार होईल. तरी त्यांना प्रशासनामार्फत १५ दिवसांच्या आत “सब स्टेशन ऑफीसर” या पदावर कायम करण्याचे आदेश देण्यात यावे व श्री.जगदिश पाटील व इतर १६ अग्निशमन दलातील अधिकारी यांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन सत्कार करावा असा मी ठराव मांडत आहे.

**प्रभात पाटील :-**

माझे अनुमोदन आहे. त्याबरोबर मॅडम मला सांगायचे आहे की पाणी पुरवठा विभागाचे दोन अभियंता आहेत. श्री. उत्तम रणदिवे आणि मिस्त्री श्री. विठ्ठल डोंगरे यांचा सुध्दा सन्मान करावा अशी मी आपणांस विनंती आहे.

**जुबेर इनामदार :-**

चांगला विषय आला त्यांचा सत्कार झालाच पाहिजे. त्यांनी एवढा पराक्रम केलेला आहे. पण याचे निमित्त काय होत त्याच्यावर कोणाच लक्ष का नाही. आयुक्त महोदय क्लोरीनचा बाटला लिक झाला कसा. त्याच्यावर चर्चा कोण करणार त्याची डागदुरुस्ती त्याची देखभाल, त्याची मेन्टनन्स कोण करतो? पाणी पुरवठा विभागाकडे त्याची जबाबदारी आहे. ठिक आहे. तो विषय थोडक्यात आटोपला. मोठ काही त्याच्यावर संकट आले असते त्याच्यामुळे तेव्हा त्याचे उत्तर कोणी दिले असते त्याच्यावर चौकशी काय झाली? आयुक्त साहेब आपल्याला विनंती आहे ह्या विषयावर सखोल चौकशी लावावी. ते घडल कस कुठल्या कंपनीकडून हे बाटले उपलब्ध करुन घेतले जातात. त्या कंपनी वरती आपण काय केल आहे. त्यांना आपण पैसे दिलेले आहेत. कोणी फुकट आपल्याला देत नाही साहेब मेहरबानी आपल्याकडे नाहीच आहे. कोणाकडून ह्या वस्तु घेतल्या असतील त्यांची चौकशी झाली पाहिजे साहेब. धन्यवाद.

**प्र. नगरसचिव :-**

अग्निशमन विभागाचे अधिकारी/कर्मचारी यांचा गौरव करण्यांत येणार आहे त्यांनी कृपया सभागृहात यायचे आहे.

**प्रभात पाटील :-**

मला असे वाटते की ह्या सरकारी वर्षामध्ये काही त्यांनी उल्लेखनीय घटना सोडल्या आता त्याच्याकडून निश्चितपणे चांगले काम झाले असेल ना. वाईट कामाचा रेकॉर्ड आहे. २७ वर्ष माणूस सेवा जेष्ठतेवर म्हणा किंवा त्याच्या पदोन्नतीपासून वंचित राहतो ही बाब आपल्याला गंभीर वाटत नाही का? मॅडम असे काही शुक्राचारी इथे आहेत की एखाद्या माणसाला पुढे होऊ देत नाहीत. माझ ह्या निमित्ताने आयुक्तांना निवेदन आहे की ह्यांनी आस्थापना विभागाची पूर्ण झाडाझडती घ्यावी कोण शिक्षित आहे. कोण प्रशिक्षित आहे कोण अनुभवी आहे. कोणाला कामाचा अनुभव कसा आहे. ह्या पुढे येणा-या सगळ्या पदोन्नत्या किंवा भरती, बदली ह्या सगळ्या त्यांच्या एकदा फाईल चेक कराव्यात. आणि त्यानुसार द्याव्यात असे बरेच लोक आहेत पालिकेत आहेत, पालिकेच्या बाहेर आहेत. तुमच्या प्रशासनात आहेत. काही पॉलिटेकही आहेत आणि हे लोक कुठेतरी त्या आस्थापना विभागामध्ये घर करुन बसलेले आहेत. ही अतिशय गंभीर बाब आहे. मला असे वाटते की मी बोलते बहुतेकांना तसा अनुभव असेल कोणी कदाचित बोलत नसतील. परंतु ही बाब साहेब मी आपल्यासाठी बोलते की, आपण हा सगळा झाडाझडती प्रकार

घ्यावा. त्यांचे कॉलिफिकेशन पासून त्यांच्या युनिर्वसिटीपासून सगळ्या गोष्टी तुम्ही ध्यान्यात घ्याव्या आणि एकदा त्या विभागाकडे लक्ष घालावे. धन्यवाद.

**प्र. नगरसचिव :-**

गौरवास्पद कामगिरी करणारे अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांना सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे. त्याकरिता मी पहिले नाव घेतो. १. श्री. प्रकाश शंकर बोराडे, प्रभारी मुख्य अग्निशमन अधिकारी कृपया डायसवर यायचे आहे. २ श्री. जगदिश लक्ष्मण पाटील ३ श्री. रविंद्र जयवंत पाटील. ४ श्री. समाधान सुरेश माळी ५ श्री. लक्ष्मण मोरारी भंडारी ६ श्री. संतोष नकुल पाटील. ७ श्री. संजय यशवंत म्हात्रे ८ श्री. संतोष दत्तात्रेय माशाळ ९ श्री. रोहित बाबुराव पाटील १० श्री. धनिलाल मणिलाल भावे ११ श्री. हर्षल अशोक अधिकारी १२ श्री. तुषार गजानन भोईर १३ श्री. उत्तम यशवंत रणदिवे १४ श्री. विठ्ठल लक्ष्मण डोंगरे १५ श्री. उत्तरामन दुरेराज १६ श्री. सुहास करणाकरण १७ श्री. निखिलेश तिवारी.

**हसमुख गेहलोत :-**

महापौर मॅडम हमारे मिरा भाईंदर के रहिवासी और उनके बच्चे जो हमारे मिरा भाईंदर से गए थे कराटे में स्टेट लेव्हल में वो जित के आए हुए है। तो मैं चाहता हूँ जिस तरिके से अग्निशमन दल का अभिनंदन किया गया, सत्कार किया गया उन्हे भी यहाँ पर बुला के जो हमारे मिरा भाईंदर का नाम और गौरव उन्होंने काफी अच्छा उचा किया। अलग स्टेट मे जाके पुरी तरह से हमारा नाम चाहता हूँ की उन्हें भी यहाँ पर बुलाके सत्कार और अभिनंदन किया जाए।

**मा. महापौर :-**

बोलावून घ्या.

**प्र. नगरसचिव :-**

कराटेमध्ये ज्यांनी प्राविण्य मिळवून मिरा भाईंदर महापालिकेचे नाव उज्वल केलेले आहे. अशा सर्व मुलांना आणि त्यांचे समन्वयक त्यांचे शिक्षक यांना कृपया सभागृहात बोलवायचे आहे. कराटे स्पर्धेमध्ये प्राविण्य मिळविलेल्या सर्व मुलांना सभागृहात बोलविण्यात आलेले आहे. त्यांच्याबरोबर त्यांचे शिक्षक विजय शिरवाणे हे आहेत ते त्यांच्या बरोबर आलेल्या मुलांचे नावे वाचुन दाखवतील. त्याप्रमाणे त्यांना शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यांत येत आहे.

**जयंतीलाल पाटील :-**

कुठल्या शाळेचे आहेत याचा आधी खुलासा करा. त्यांनी काय केले आहे. कुठला बेल्ट मारलेला आहे. ते आधी समजून घ्या फक्त द्यायच म्हणून द्यायच का?

**विजय शिरवाणे :-**

नमस्कार. मी विजय शिरवाणे बोलतो ही स्पर्धा केरळ येथे कराटे असोसिएशन इंडिया ही संस्था आहे. त्यांनी आयोजित केली होती आणि संपूर्ण महाराष्ट्रामधून ४२ मुलांनी भाग घेतला होता. मिरा भाईंदर मधल्या मुलांनी भाग घेतला होता. त्याच्यामधले नऊ गोल्ड आपल्या मुलांनी मिळविलेले आहेत. बाकी सिल्वर आणि ब्राऊन असे मिळवलेले आहेत. एकूण १५०० मुलांनी त्या स्पर्धेमध्ये भाग घेतलेला होता आणि आपल्या मुलांनी चांगली कामगिरी केली, खुप मेहनत घेतली आणि मेडल मिळविलेले आहेत.

**जयंतीलाल पाटील :-**

याची माहिती आम्हाला हवी होती. फक्त द्यायच म्हणून द्यायचं हे सांगितल बरोबर आहे योग्य आहे.

**विजय शिरवाणे :-**

नगरपालिकेच्या संबंधित नगरसेवक आहेत किंवा मिरा भाईंदर महानगरपालिका आहे. त्यांना एवढेच सांगणे आहे की त्या मुलांना प्रोत्साहन द्या. त्याप्रमाणे प्रोत्साहन द्या की ते पुढे जाऊन आपले जग जिंकतील. आपल्या मुलांमध्ये ती धम्मक आहे. ह्या स्पर्धेमध्ये ज्यांनी गोल्ड मिळविलेले आहे त्यांची नाव घेतो. अगर्वा तिवारी, सयनी ठाकूर, आभार उडिया जानवी सोनावणे, मनु अय्यर, मंजी शेट्टी, कॅप शेख, कॅप नागुरने, हिरल गेहलोत, हर्षल खान, हर्ष शेट्टी, आदित्य कोल्हेकर, दन्मनी परिक्षित, सेवन नंदी, आस्था डंग, अभिषेक परियार, कॅप शेख.

**प्र. नगरसचिव :-**

ह्या मुलांचे शिक्षक आहेत विजय शिरवाणे. त्यांचा देखील सर्वांच्या वतीने सत्कार करण्यांत येत आहे. सर्व मुलांच्या फोटोग्राफीसाठी पुढे बोलवण्यात यावे.

**स्नेहा पांडे :-**

कॉंग्रेज्युलेशन बच्चो आज यह नन्हे मुन्ने बच्चे कल के देश के भविष्य है। आज स्टेट लेव्हल पे इन्होंने खेला है कल नॅशनल लेव्हल पे इन्होंने खेला है। कल नॅशनल लेव्हल पे और इंटरनॅशनल लेव्हल पे खोले ऐसी कामना करती हूँ बेस्ट ऑफ लक।

**अभिनंदन ठराव क्र. ७४ :-**

मिरा भाईंदर महापालिका मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात दि.२६ व २७ जुलै २००५ मध्ये अतिवृष्टीमुळे पुरपरिस्थिती निर्माण झालेली होती. या काळात श्री.जगदिश ल. पाटील यांनी कर्तव्य दक्षतेने लोकांचे प्राण वाचवून केलेल्या उल्लेखनिय कामगिरीबद्दल मिरा भाईंदर महानगरपालिकेने त्यांचा सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यांत आलेले होते.

दि.०२/०५/२००६ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात चेणा पुल येथे झालेल्या अपघातात जखमी झालेल्या प्रवाशांचे तात्काळतेने अपघातस्थळी जाऊन जखमींचे प्राण वाचविण्यांत मदत केल्याबद्दल त्यांचे मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे सन्मानित करण्यांत आलेले होते तसेच तत्कालिन आयुक्त यांनी त्यांची मा.राष्ट्रपती पदकाकरिता शिफारस केलेली होती.

दि.११/०७/२००६ रोजी रेल्वे बॉम्बस्फोटात जखमी झालेल्या नागरिकांना प्राण वाचविण्यांत कर्तव्य दक्षतेने केलेल्या कामगिरीबद्दल मिरा भाईंदर महानगरपालिका तत्कालिन आयुक्तांनी त्यांची सन्मानचिन्हाकरिता शिफारस केलेली होती.

दि.२३/०९/२०११ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खारीगांव येथील लता अपार्टमेंट इमारतीचा स्लॅब कोसळल्याचा दुर्घटनेत झालेल्या नागरिकांचे प्राण वाचविण्यांत कर्तव्य दक्षतेने केलेल्या कामगिरीबद्दल त्यांची मिरा भाईंदर महानगरपालिका तत्कालिन आयुक्तांनी मा.राष्ट्रपती पदकाकरिता शिफारस केलेली होती.

दि.२१/०६/२०१२ रोजी मंत्रालय मुंबई येथे इमारतीस लागलेली आग आपल्या मनपाच्या अग्निशमन विभागात कार्यरत असलेल्या श्री.जगदिश पाटील यांनी रोजनबार ह्या ऑस्ट्रीया कंपनी (युरोप) टन टेबल लॅडर वाहनाव्दारे विझविल्याबद्दल रोजनबार कंपनीने ऑस्ट्रीया (युरोप) येथे गौरविलेले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कर्तव्य दक्षतेने कामगिरी केल्याबद्दल मा.आयुक्त यांनी ०३ वेळा श्री.जगदिश पाटील यांची राष्ट्रपती पदकाकरिता शिफारस केली आहे.

मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रात भाईंदर (प) कमला पार्क येथे पाण्याची टाकी असुन सदर पाण्याचा टाकीतील पाणी शुध्दीकरण करणेकरिता क्लोरिन वायुचा उपयोग केला जातो. दि.२५/०१/२०१८ रोजी रात्री ११.३० वा सदर पाण्याच्या टाकीवर क्लोरिन वायुची गळती सुरु झाली होती. क्लोरिन वायुमुळे आसपासच्या १० इमारतीस त्याची बाधा होऊन नागरिकांना त्याचा त्रास होऊ लागला त्यात आबालवृध्द व लहान मुलांचा जास्त समावेश होता. त्यावेळी रात्रपाळीसाठी कार्यरत असलेले अग्निशमन विभागातील श्री.जगदिश पाटील व इतर १६ जणांनी आपल्या प्राणाची पर्वा न करता आसपासच्या इमारतीतील लोकांना सुखरुप बाहेर काढले व क्लोरिन वायुचा गळका बाटला ज्यामध्ये १६५ किलो क्लोरिन वायु होता त्याला भाईंदर (प) येथील समुद्रात विसर्जित केले व क्लोरिन वायुची गळती रोखण्यास यशस्वी होऊन सुमारे ५०० लोकांचे प्राण वाचविण्यात श्री.जगदिश पाटील व इतर अग्निशमन दलाचे अधिकारी/कर्मचारी यांनी यश संपादन केले.

ही खचितच मोठी कामगिरी आपल्या मनपाच्या अग्निशमन अधिकारी व कर्मचा-यांनी केलेली आहे. त्यांचा फक्त शाल व श्रीफळ देऊन सन्मानित करणे योग्य ठरणार नाही. त्यांनी वेळोवेळी मनपास दिलेले योगदान हे बहुमूल्य असून त्यांनी कर्त्यव्यदक्ष व प्रामाणिकपणे केलेल्या कार्याची कुठेतरी गंभीर दखल घेण्यांत येऊन व त्यांच्या अग्निशमन विभागातील गेल्या २७ वर्षाचा अनुभव लक्षात घेऊन तसेच त्यांच्या अनेक वर्षापासून केलेल्या मागणीचा विचार करुन श्री. जगदिश ल.पाटील यांना "सब स्टेशन ऑफीसर" या पदावर कायम केल्यास हाच त्यांचा खरा व यथोचित सत्कार होईल. तरी त्यांना प्रशासनामार्फत १५ दिवसांच्या आत "सब स्टेशन ऑफीसर" या पदावर कायम करण्याचे आदेश देण्यात यावे व श्री.जगदिश पाटील व इतर १६ अग्निशमन दलातील अधिकारी यांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन सत्कार करावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील अनुमोदक :- श्रीम. वर्षा भानुशाली**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सभेचे कामकाज सुरु करावे.

**प्र. नगरसचिव :-**

प्रश्नोत्तराला सुरुवात होत आहे. ११ वाजुन ५५ मिनिटे झालेली आहेत.

**धृवकिशोर पाटील :-**

सर दोन क खाली एक विषय घ्यायचा आहे. तो सभागृहापुढे देतो. २ के खाली प्रस्ताव – मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गॅरेजेस, कार वॉशिंग सेंटर, सर्विस सेंटर, वाहन शोरुम, स्पेअर पार्टस विक्रेते यांना परवाना देणे, दंडात्मक कारवाई करणेबाबतच्या धोरणास मान्यता देणे.

**प्र. नगरसचिव :-**

२ के खाली प्रस्ताव आलेला आहे त्याला सभागृहाची मान्यता आहे का?

**मा. महापौर :-**

मान्यता आहे.

**प्र. नगरसचिव :-**

मान्यता आहे. त्यामुळे हा विषय विषयपत्रिकेवरील सर्व विषय संपल्यानंतर शेवटी घेण्यात येईल. प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होत आहे. पहिला प्रश्न आहे सौ. निलम ढवण यांचा. निलम ढवण ह्या सभेसाठी अनुपस्थित आहेत. त्यासाठी त्यांनी विनंती केलेली आहे. रजेचा अर्ज दिलेला आहे त्याच्यासोबत सांगितले आहे की माझे प्रश्न आहेत ते पुढील सभेसाठी घेण्यात यावेत. पुढील ४ प्रश्न त्यांचेच आहे. त्याच्यानंतर ५ वा प्रश्न जुबेर इनामदार यांचा आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम, उपमहापौर साहेब सभागृहामध्ये प्रश्न विचारल्यानंतर हे सर्व सदस्यांशी कन्सन असतो आणि त्याची उत्तरे देणे अपेक्षित असते. डिपार्टमेंटकडून याच्यापूर्वी मला वाटत ती पध्दत होती. उत्तरे सुध्दा त्या प्रश्नांबरोबर आम्हाला उत्तरे सुध्दा मिळायची. आता काय झाल की फक्त प्रश्न आहेत उत्तरे कुठे आहेत?

**प्र. नगरसचिव :-**

उत्तरे दिली ना.

**अनिल सावंत :-**

कुठे आम्हाला मिळाली नाहीत.

**प्र. नगरसचिव :-**

मागच्या वेळी दिलेली आहेत. तुम्हाला मिळाले नसतील तर दोन मिनिटात देतो. सर्वांना सभागृहामध्ये उत्तरे आणि प्रश्नोत्तरे दोन्ही सर्क्युलेट केलेली आहेत.

**जुबेर इनामदार :-**

महापौर महोदया, उपमहापौर महोदय, आयुक्त साहेब विषय नगररचनाशी निगडीत आहे. महापौर मॅडम, नगररचना अधिकारी संचालक, सहा. संचालक नगररचनाकार त्यांना बोलवून घ्या ना. प्रश्नोत्तरे त्यांनाच द्यायची आहेत. मला उत्तर कोण देईल प्रश्नोत्तरामध्ये उत्तर देणे प्रशासनाचे काम आहे. त्यांना बोलवायला पाहिजे तुम्ही देऊ शकत नाही.

**मा. महापौर :-**

नगररचनेचे अधिकारी या.

**जुबेर इनामदार :-**

साहेब सध्या देशाचे वातावरण घोटाळ्यात आहे. ललीत मोदी, विजय मल्या, निरव मोदी, चौक्सी एक नविन घोटाळ्याच्या परिचय ह्या मिरा भाईंदरमध्ये झालेला आहे साहेब. त्याचा तुम्हाला परिचय करुन दाखवितो.

**मा. उपमहापौर :-**

प्रश्नाशी सुसंगत चालू करा.

**मा. महापौर :-**

आपण विषयावर बोलावे.

**जुबेर इनामदार :-**

सर माझा पहिला प्रश्न मा. महासभा दि. ३०/०७/२०१० प्रकरण क्र. २६, ठराव क्र. ३२. १९६६ म्हणजे एम.आर.टी.पी. चे कलम ३७ अन्वये विकास नियंत्रण नियमावलीत बदल करण्याचा विषय मंजुरीसाठी शासन दरबारी पाठविला होता. त्यावर शासनाने काय कारवाई केली.

**श्रीकांत देशमुख :-**

त्याचे उत्तर इथे दिलेले आहे. महासभा ३०/०७/२०१० प्रकरण क्र. २६, ठराव क्र. ३२. ३७ अन्वये जो प्रस्ताव पाठविलेला होता तो शासनाच्या दरबारी प्रलंबित आहे. त्यानंतर विकास हक्क प्रमाणपत्राबाबत २९/११/२०१६ रोजी अधिसुचना केलेली आहे. त्यानंतर त्याला अमेन्टमेन्ट पण आलेली आहे आणि त्यानुसार आता कारवाई चालु आहे.

**जुबेर इनामदार :-**

अमेन्टमेन्टवर आपण नंतर येऊ. उत्तर देताना तुम्ही अमेन्टमेन्टची मला त्याच्यामध्ये उल्लेख केलेला आहे. त्याच्यावर परत मी तुमच्याकडे येणार आयुक्त महोदय डी.सी. रुल डेव्हलपमेन्ट कंट्रोल रेग्युलेशन त्यास नियंत्रण नियमावली ह्याच्यामध्ये भाग क्र. ३३ चा भाग क्र. ४. ३३ चा ६ याच्या अनुषंगाने शहरामध्ये रस्ते विकसित करायचे असल्यास होणारा लेसीसी म्हणजे मालक किंवा सत्ताधारक याने ते विकसित करता येतील. आणि विकसित केल्यानंतर त्याचा मोबदला तो त्याला मिळू शकतो. टी.डी.आर किंवा एफ.एस.आयच्या माध्यमातून तो विषय एफ.एस.आय. आणि टी.डी.आर लॉस इंडेक्स वापरु शकतो. टी.डी.आर तो स्वतः वापरु शकतो किंवा बाजारामध्ये तो विकू शकतो कोणाला देऊ शकतो. नियमावलीचा तो एक भाग आहे. मध्यकाळामध्ये तत्कालीन आयुक्त शिवमूर्ती नाईक साहेबांनी हा विषय महासभेमध्ये प्रस्तावित केला होता. असे रस्ते महापालिकेला विकसित करण्यासाठी खर्च होतो त्याचा फार महापालिकेच्या तिजोरीवर पडतो म्हणून आपण त्यांना विकसित करुन घ्यावेत. कोणते रस्ते डी.पी. रस्ते आरक्षणाचे रस्ते आता हा रस्ता आणि ह्या आरक्षणातला रस्ता हा दोन वेगवेगळे भाग आहेत. बरोबर देशमुख साहेब.

**श्रीकांत देशमुख :-**

बरोबर आहे.

**जुबेर इनामदार :-**

आरक्षणातले रस्ते विकसित करण्यासाठी शासन दरबारी प्रस्ताव पाठवला डी.पी. रुलमध्ये फेरबदल करण्यासाठी माईनर मॉडिफिकेशन ठराव करुन पाठवला. मा. महासभा ठराव क्र. ३२ नियम ३७ अन्वये हा विषय गेला. आमच्याकडे ३०/०७/२०१० ला शासनाकडे आम्ही पाठवून दिला. महासभेमध्ये विषय आला महासभेने ठिक आहे चांगले धोरण आहे केले पाहिजे. धोरण ठरविण्यासाठी महासभेमध्ये आला. सर्वांनी एकमताने कोणीच विरोध केला नाही. चांगली गोष्ट आहे झाले पाहिजे. २०१० ते २०१८ विषय शासन दरबारी प्रलंबित आहे. त्याला मान्यता देण्यात आलेली नाही. याचा अर्थ हा नियम आपल्याकडे लागू नाही. याचा अर्थ तोच होईल ना साहेब म्हणजे जो मायनर मॉडिफिकेशनसाठी पाठविण्यात आला होता.

**श्रीकांत देशमुख (नगररचनाकार) :-**

तो विषय लागू होणार नाही जोपर्यंत शासन.............

**जुबेर इनामदार :-**

म्हणजे त्याला केलेला ठराव त्याअनुषंगाने केलेला ठराव ते मायनर मॉडिफिकेशन करुन तो ठराव कसा गेला होता साहेब ते सांगा. कोणीही इंट्रेस्टेड व्यक्ती त्या रस्त्यांना विकसित करायची त्याला इच्छा असेल डी.पी. रस्ता विकसित करायची. डी.पी. म्हणजे आरक्षण विकास आराखड्यातले रस्ते देशमुख साहेब आरक्षण झाले ते १०० टक्के आरक्षणातले रस्ते झाले. म्हणजे ते डी.पी. मध्ये आहेत.

**श्रीकांत देशमुख (नगररचनाकार) :-**

बरोबर आहे.

**जुबेर इनामदार :-**

विकास आराखड्यामध्ये त्यांना नमुद करण्यात आलेले आहे. त्याला मंजुरी २००० साली आपल्याला देण्यात आली. याचा अर्थ तो आरक्षणाचा भाग आहे. त्यांना विकसित करायचे असेल त्यांना कॉंक्रीटीकरण तेव्हा हा विषय तेथुन सुरु झाला आहे. कॉंक्रीटीकरण जर करायचे असेल तर अशा रस्त्यांना ओपन टेंडरींग सिस्टिम निविदा मागवून जो कमीत कमी टी.डी.आर मागेल अशा व्यक्तीला ते रस्ते

विकसित करता येतील. त्याने मग तो टी.डी.आर त्याने त्याच्या बांधकामामध्ये वापरावा. ओपन बाजारामध्ये विकावा अस आहे साहेब ते. हा विषय अशा प्रकारे साहेब आपले लक्ष वेधू इच्छितो या विषयावर कारण हा विषय तुमच्याकडे परत येणार आहे. असे रस्ते विकसित करतात अशाप्रकारे ओपन टेंडरींग सिस्टीमने त्या जो कमीत कमी त्याच्यामध्ये जो दर भरेल. टी.डी.आर कमीत कमी घेईल. एफ.एस.आय. कमीत कमी घेईल अशा व्यक्तीला ते रस्ते विकसित करता येतील. काँक्रीटीकरण करता येतील आरक्षणातील म्हणजे हा विषय इतका काही सगळा सर्व काही केल्यानंतर हा विषय अजून शासन दरबारी प्रलंबित आहे. २०१० ला केलेला ठराव २०१८ पर्यंत प्रलंबित निघेल म्हणजे हा एक विषय स्पष्ट झाला. अधिसूचना पारित केलेली असून कारवाई सुरु आहे. त्याच्यामध्ये तुम्ही तसे उत्तर दिले म्हणून ती अधिसुचना त्याचाही उल्लेख सांगा साहेब अधिसुचना तुम्ही मला त्याच्यामध्ये उत्तर देताना नगरविकास विभागाने दिली खरी पण अधिसुचना काय.

**श्रीकांत देशमुख (नगररचनाकार) :-**

टी.डी.आर बाबत २९/०१/२०१६ ला शासनाचे धोरण ठरविलेले आहे. ज्यामध्ये रोड विट त्याच्या अनुषंगाने अनुज्ञेय होणारा एफ.एस.आय. रिन्सेन्टीव्ह एफ.एस.आय. त्याच्यासाठी लागणारे चार्जेस आणि कुठे द्यायचा याच्याबद्दल कन्स्ट्रक्टेड ॲमिनिटीसाठी काय द्यायच कस द्यायचं आणि त्यानंतर त्याला अमेन्टमेन्ट काय झालेली होती त्या अमेन्टमेन्टबाबत वेगळा जी.आर. काढलेला होता आणि आज ह्या जी.आर. प्रमाणे आपण टी.डी.आर जे विकास योजनेचे प्रस्ताव आहेत त्याच्यासाठी आपण अनुज्ञेय करतो. ज्यामध्ये डी.पी. रोडही येतील आणि जे कन्स्ट्रक्टेड ॲमिनिटीज आहेत त्या कन्स्ट्रक्टेड ॲमिनिटीलाही आपण त्या अनुषंगाने टी.डी.आर. देत आहोत.

**जुबेर इनामदार :-**

माझा विचारलेला प्रश्नाशी हा विषय सलग्न आहे का? आय ॲम इन नोटिफिकेशन. बिल्डींगच्या समोरचा रस्ता किती फुटाचा आहे. त्याला एक १.४ पर्यंत आपण जाऊ शकतो. बरोबर आहे साहेब.

**श्रीकांत देशमुख (नगररचनाकार) :-**

बरोबर आहे.

**जुबेर इनामदार :-**

अशाचप्रकारे नोटिफिकेशन आले. तो २९/०१/२०१६ रोजी आलेले आहे. बरोबर आहे साहेब.

**श्रीकांत देशमुख (नगररचनाकार) :-**

अगदी बरोबर.

**जुबेर इनामदार :-**

मी परत माझा आरक्षणाचा विषयावर येतो त्याच्यासाठी आम्ही फॉर्म मागविलेला आहे. सोबत शासनाकडे या नोटिफिकेशन मध्येही २०१६ च्या अजुनही तितकच स्पष्ट आहे ४.२ बरोबर आहे.

**श्रीकांत देशमुख (नगररचनाकार) :-**

बरोबर आहे.

**जुबेर इनामदार :-**

ट्रान्सफरेबल डेव्हल ॲण्ड राईट्स टी.डी.आर अगेन्स्ट कन्स्ट्रक्शन ॲमिनिटी हॉनरेबल म्हणजे मालक. पट्टाधारक परत तोच विषय आला इथे. मालक किंवा पट्टाधारक आणि ती आपण आरक्षण विकसित केला तरच त्याला तो टी.डी.आर किंवा एफ.एस.आय ह्यांचे उत्तर बरोबर आहे. म्हणजे माझ्या प्रश्नाचे याचे काही देणे घेणे नाही साहेब. फक्त दिशाभूल करण्यासाठी अशाप्रकारे उत्तर देत आहेत. येताना साहेब मी आरोप करत नाही तुम्ही आताच चार्ज घेतलेला आहे. मात्र साहेब ए.टी.डी.पी. चे अधिकारी साहेब किती गुणवान आहेत. माझा प्रश्न काय आहे, तो प्रश्न कसा डायव्हर्ट करायचा, त्याच्यासाठी कसे गोलगोल उत्तर द्यायचे हे त्यांच्याकडून शिका. साहेब ह्या प्रश्नाशी माझे काही घेणे देणे नाही. मॉडिफिकेशन डोळ्याच्या समोर असताना मी प्रश्न विचारला ३७ खाली तो पाठवला मायनर नोटिफिकेशनसाठी त्याचे काय झाले तरी त्याच्यामध्ये असा एक आतमध्ये काही तरी पिल्लू सोडणे असा तो पिल्लू आहे. याचा पुढचा प्रश्न साहेब मी तुम्हाला हा विषय नशीब आमचे चांगले आहेत तुम्ही आलात. व्यासपीठावर उपस्थित आहेत मी नरेश गिते साहेबांना हे पूर्ण प्रकरण समजवून दिलं होतं त्यांनी त्या विकासकाला टी.डी.आर दिला नाही. तुमच्या निदर्शनात आणून देतो साहेब किती मोठा घोटाळा आणि याचा काय परिणाम होऊ शकतो. तत्कालीन आयुक्त श्री. शिवमूर्ती नाईक साहेबांनी दि. २२/०२/२०११ रोजी जा.क्र.मनपा/सा.बां./८८३०/२०१०-११ अन्वये जयेश शहा रवि डेव्हलपर्स यांना सिमेंट काँक्रीटचे रस्ते विकसित करण्यासाठी विकास नियंत्रण नियमावलीच्या कोणत्या नियमाच्या अधीन राहून कार्यादेश दिलेले आहेत. साहेब प्रशासनाने मला एका वाक्यात उत्तर दिलेले आहे. मा. महासभेच्या ठरावावरुन विकासकाला

परवानगी देण्यात आलेली आहे. महासभेचा ठराव कोणता ठराव जो शासन दरबारी प्रलंबित आहे. साहेब जो विषय शासन दरबारी प्रलंबित आहे त्या विषयावर तत्कालीन आयुक्त वर्क ऑर्डर देत आहेत. त्याच्यामध्ये ए.टी.डी.पी. चे काही घेणे देणे नाही. नगररचनेला तो कन्सल्ट सार्वजनिक बांधकामाच्या लेटर हेडवर आयुक्त सही करुन देतात. तुम्ही रस्ते बांधा तुम्हाला वाटेल ते करा नियमावली गेली चुलीत. साहेब हा त्याला गटर व रस्ते तुम्ही विकसित करा आम्ही तुम्हाला त्याचा टी.डी.आर देऊ. त्या पत्रामध्ये इतकही नमुद केल नाही की शासनाकडे प्रलंबित असलेला विषय आल्यानंतर तुम्ही हे सुरु करा किंवा आम्हाला तुम्हाला देता येईल. बरोबर आहे देशमुख साहेब तुमच्या विभागाने उत्तर दिलेले आहे. मा. महासभेचा ठराव विकासकाला परवानगी देण्यात आलेली नाही साहेब हे रस्ते कुठले आहेत ते ही सांगतो. कदाचित तुम्ही आल्यानंतर नगररचना विभागाचे जे कार्यालय आहे तिथे तुम्ही गेला असाल. एका बाजूला एक रस्ता आहे काँक्रीटचा दुसऱ्या बाजूला तो कच्चा रस्ता आहे. का पक्का होत नाही कारण त्याला टी.डी.आर देण्यात येत नाही. तो आता खर्च करणार नाही. हा काही करणार नाही कारण सगळ त्याचे सिध्द होत आलेले आहे आणि सातत्याने येणारे जितके काही आयुक्तांनी याचा पदभार सांभाळला त्यांच्या समक्ष आणून दिलेला आहे. रवि डेव्हलपर्स अनधिकृत बांधकामाचा मास्टर १६-१६, १८-१८ माळे त्यांनी बांधले. त्याच्यावरती २६० च्या नोटिस त्याला कार्यपध्दत अवलंबून प्रत्येक कारवाई करण्यात आली. काकाणी साहेबांनी त्याला बऱ्याच बांधकामाला बांधकाम तोडक कारवाई सुध्दा केलेली आहे. अशा व्यक्तीला महापालिका अजून मदत करते एक असा विकासक ज्यांनी ह्या शहरामध्ये अनधिकृत बांधकाम केले. जो नियम तोडतो जो नियम मोडतो पालिकेला जुमानत नाही ऐकत नाही किंमत ठेवत नाही त्याला पालिका त्याचे संरक्षण करायच अजून प्रयत्न करत आहे अशा प्रकारे उत्तर देऊन दिशाभुल करायचे उत्तर मला देण्यात आलेले आहेत साहेब. अशा परिस्थितीत प्रशासनाने काय भुमिका घेतली पाहिजे साहेब दिलेला त्याचा पूर्णपणे टी.डी.आर. जितके आजपर्यंत दिलेले सगळे उपटून काढा. सगळे रद्द करा. साहेब ते तुमच्या अधिकारात आहे. न्यायालयात धाव घेतो न्यायालयात त्याला मॅनेज करण्यासाठी मदत करण्यात आली ते सुध्दा माझ्याकडे ह्या प्रश्नोत्तराच्या ह्या चर्चेमध्ये मी तुम्हाला सिध्द करुन दाखवीन. पालिकेने कुठे कुठे त्याला मदत केलेली आहे. साहेब ३०/७ च्या नंतर म्हणजे त्याला २२/२/२०११ ला सार्वजनिक बांधकाम विभागाचे लेटर हेडवर त्याचा पालिका पाठपुरावा करीत होती नंतर वर्कऑर्डर देण्यात आली. ३१/०१/२०११ रोजी सार्वजनिक बांधकामने ८१४० त्याच विकासकाला रवि डेव्हलपर्सला पत्र देऊन रस्त्यावर बांधकामासाठी परत एक नविन वर्क ऑर्डर दिली. सार्वजनिक बांधकामाला हे अधिकार कोणी दिले. साहेब अधिकार आहेत का? सहाय्यक संचालक साहेब तुमच्यापेक्षा अनुभवी माणूस आमच्याकडे नगररचनेमध्ये आजपर्यंत आलेला नाही. हे अधिकार सार्वजनिक बांधकामाला नगररचना विभागाने असे दत्तक दिले तस काय.

**श्रीकांत देशमुख :-**

ह्या सर्व प्रकरणांची फाईल मला पाहावी लागेल की ह्यानंतर कमिशनरने कोणत्या बेसवर त्यांना अनुज्ञेय केले होते. सार्वजनिक बांधकामाचा प्रस्ताव कसा पाठवला होता आणि सार्वजनिक बांधकामाने कोणत्या अधिकाराअंतर्गत हे सर्व केलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

सर असा अर्थ झाला माझ्या प्रश्नाला उत्तर नाही. महापौर मॅडम हा विषय प्रलंबित ठेवा पुढच्या सभेमध्ये घेईन परत हरकत नाही कारण बरीच मोठी फाईल आहे. प्रत्येक पानावर चर्चा आहे.

**मा. उपमहापौर :-**

इनामदार साहेब मुळात हा जो प्रस्ताव महासभेसमोर आला तो योगायोगाने आपणच सत्तेत होतात आणि आपल्याच माध्यमातून हा ठराव झाला होता आणि त्यानंतर ज्या झालेल्या घटना आहेत जो घटनाक्रम आहे त्यात एक गोष्ट स्पष्ट झालेली आहे की जेव्हा प्रकरण तक्रार निहायपर्यंत आलं आणि त्याच्यामुळे ज्या लोकांना त्याठिकाणी प्रवास करावा लागतो. त्याची परिस्थिती अत्यंत बीकट होती. मागे तात्कालीन आयुक्त डॉ. नरेश गिते साहेबांना सांगितल की साहेब आपण मुख्यालय सोडून इकडे तिकडे बसता त्याच्यापैकी ५० वेळा ते नगररचनेच्या कार्यालयात बसला असाल एक दिवशी तिकडे जेवढे लोक त्या आर.बी. केवल जमतात ते पालक त्यांना घेऊन तुमच्याकडे येतो. आपण आयुक्त आहात रोज तो रस्ता बघता निदान त्या रस्त्या संदर्भात काय करा. तक्रार जर वादात आहे मंत्रालयात अडकलेल आहे. तक्रारीत आहे तर निदान आपण महापालिकेने तो रस्ता बनवावा. अशी त्यांना विनंती केलेली त्यांनी ती यस केलेली आता आपल्याला संबंधित खात्याने उत्तर दिलेले आहे. लेखी आहे ते तुम्हाला पटल नाही तो भाग वेगळा. परंतु संबंधित अधिकाऱ्यांनी काय सांगितले की मला ती फाईल पण अभ्यासावी लागेल. आता आपला मूळ उद्देश काय आहे ते सांगा मग त्या पध्दतीने उत्तर देतील.

**जुबेर इनामदार :-**

ठीक आहे. मा. आयुक्त महोदय विकास नियंत्रण नियमावली मधला भाग दोन ९ चा ४ ट्रान्सपोर्टेशन कराधाम ए स्पष्ट आहे फोटो रोड आणि स्ट्रीट प्रपोस्ट लेआऊट नाही साहेब ही नगररचनाकाराने माझा फिल्ड नटबोल्ट बनवायचे मला विचारा किती तिर कुठला मारायचा हे चटकन जाणून घेतो. पण माझा विषय नाही फक्त थोडा अभ्यास करायचा प्रयत्न केलेला आहे. प्रपोस रोड आणि स्ट्रीट यांच्यासमोर स्पष्ट आहे म्युनिसिपल कार्पोरेशन म्हणजे म्युनिसिपल कार्पोरेशन व्यतिरिक्त कोणी दुसऱ्याला विकसित करु शकत नाही. हा नियमावलीचा भाग आहे नियमावलीमध्ये कुठलाही बदल करायचा अधिकार तुम्हाला नाही म्हणजे प्रशासनाला नाही बदल करायचा असेल तर एम.आर.टी.पी. अंतर्गत कार्यपध्दत अवलंबुन ३७ कडून हरकती सुचना मागवा नंतर परत महासभेच्या मंजुरी ह्या वैती साहेब बोलले बरोबर आहे साहेब हा ठराव आपणच केला आपल्याला शहराचे रस्ते विकसित करुन घ्यायचे होते आपली निधी नाही लागली पाहिजे ह्याच दृष्टीकोनातून आम्ही तो ठराव बहुमतांनी मी सुरुवातीलाच बोललो साहेब माझ्या भाषणामध्ये मी सुरुवातीला त्याचा उल्लेख केला महापौर मॅडम आम्ही त्याच्यामध्ये उल्लेख केला ३७ खाली मायनर मॉडिफिकेशनसाठी शासन दरबारी पाठवा शासनाला त्याचा निर्णय घेऊ द्या कारण तुमचा आणि माझा निर्णय चालू शकत नाही. महापालिकेची इमारत विकायला आम्ही ठराव आणला होता साहेब हे बरोबर वाचल असेल तुम्ही बरोबर आहे ना साहेब.

**श्रीकांत देशमुख :-**

या नियमावलीत जे मेन्शन केलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

म्हणजे याचा अर्थ ३७ खाली ते करणे गरजेचे होते. ३७ खाली झालेल नाही याचा अर्थ तो रस्ता किंवा वर्क ऑर्डर देण्यात आलेले आहे. तो चुकीचा होता याचा अर्थ तोच लावला जाईल. ती स्टडी तुम्ही तुमच्या कार्यालयामध्ये जाऊन करणार आहात साहेब. सभागृहामध्ये मी जाहिर पध्दतीने सर्वांना समजू द्या की कशाप्रकारे घोटाळे निरव घोटाळा तसाच झाला होता पी.एन.बी. चा लोकांनी दुसऱ्याला दिला दुसऱ्याने देऊन टाकल तुम्ही मदर कॅपॅसिटीची लोक तुम्हाला त्याची कल्पनाच नाही.

**श्रीकांत देशमुख :-**

हा ठराव मागच्या वेळेस झालेला आहे त्यानुसार जी कारवाई झालेली आहे शासनाकडे पाठविलेला आहे. त्याच्या संबंधित आपला प्रश्न आहे त्यामुळे ती फाईल पाहिल्याशिवाय मी तुम्हाला काही बोलू शकत नाही.

**जुबेर इनामदार :-**

साहेब प्रलंबित आहे शेवटचा माहिती अधिकार सुध्दा माझ्याकडे आहे. अजून ते शासन दरबारी आहे. त्याच्यावरती निकाल लागूच शकत नाही. माझी पहिली मांग हीच राहणार साहेब तुमच्याकडे जे कार्यादेश दिलेले आहेत त्याला तुम्ही रद्द करा. आणि रद्द केले की त्याच्याने त्याला दिलेल्या जितक्या टी.डी.आर आहेत तो त्याचा टी.डी.आर जिथे-जिथे वापरलेला आहे त्याला तुम्हाला तो रद्द करुन घ्यायला लागेल. आता हा जो सत्कार केला साहेब आपल्या विधी विभागाचा सत्कार करा. त्यांना बोलवा त्यांचा सत्कार करा. त्यांच्या अभिप्रायसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने त्यांच्याकडे प्रस्ताव पाठवून दिला. हे असे असे उद्योग आम्हाला करायचे आहेत. तुमचे काय मत आहे. विधी विभागाच्या मॅडमने एवढा मस्त अहवाल दिला सर्व काही त्यांचा सारांश तयार करुन एकच वाक्य आहे. शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे. त्याचा अर्थ काय झाला हे कळत नाही म्हणजे सार्वजनिक बांधकाम विभागाने डिपार्टमेन्टली मुव्हमेन्ट कुठल्या विषयाला किती सुंदर पध्दतीने केला. जमेल तितकी लोक तुमचे अधिकारी अडकू शकतील. अशाप्रकारे तो असा रचत गेले. विधी विभागाने साहेब उत्तर दिलेले आहे. साहेब त्यामधल्या काळामध्ये परत १६/०९/२०११ रोजी परत नगररचना विभागाने परत शासनाला एक रिमाईंडर त्याच विषयावर काय केल बाबा तुम्ही एका बाजूला दुसऱ्या महिन्यामध्ये कार्यादेश देतात आणि परत एक पत्र पाठवतात ९ व्या महिन्यामध्ये की आम्ही तुमच्याकडे ठराव पाठवलेला आहे. त्यांचा काहीतरी निकाल लावा. तो ११ ला पाठवला तो २०१८ पर्यंत झालेला नाही. आमदार आपल्या बरोबर सध्या नाहीत. आमदार आहेत ह्या शहराचे आमदार नरेंद्र मेहतांनी प्रश्न उत्तराच्या माध्यमातून हा विषय इथे ह्या सभागृहामध्ये मांडला होता. १८/०४/२०१३ चे इतिवृत्तांत आहेत त्याच्यामध्ये ह्याच रस्त्याच्या विषयावर जसे वैती साहेब बोलले तो अर्धवट लोकांना त्याची गैरसोय होते इथे उपस्थित होते ते बोलले ठराव आम्ही पाठवला तो मंजूर होऊन येईल. मिनिटस आहेत ते वाचायला काढल तर भरपूर लांब विषय होईल त्याचे मिनिट्स आहेत तुम्हाला ठराव तिथे प्रलंबित असताना तुम्ही असा वर्क ऑर्डर दिला कसा? तो विषय न्यायप्रविष्ठ झालेला आहे. साहेब न्यायप्रविष्ठ झाला. त्याच्यावरती तेव्हा आपले केलेले न्यायाधीशने तुम्ही बरोबर केलेले

आहे हे काही चुकिचे केले की बरोबर केलेले आहे असा कुठे ऑर्डर दिला नव्हता असा कुठेही उल्लेख गेलेल्या मी घेतलेल्या माहितीमध्ये कुठेच नाही तुम्हालाही माहिती नाही साहेब कितीही पाने उलटली ना देवाची शप्पथ सांगतो.

**प्र. नगरसचिव :-**

प्रश्नोत्तराची वेळ संपलेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

मग परत पेंडींग राहिला.

**प्र. नगरसचिव :-**

पिठासीन अधिकाऱ्यांना सांगा. त्याचा पिठासीन अधिकारी निर्णय देतील.

**जुबेर इनामदार :-**

माझा प्रश्न पूर्ण झालेला नाही. मला अर्ध्या तासाचा वेळ कमी पडलेला आहे याच्यामध्ये महापौर मॅडम शहराच्या निगडीत हा विषय आहे. प्रशासनाचे काय चाललेले आहे. प्रशासन काय करु शकते. कुठपर्यंत जाऊ शकते. हा इथे स्पष्ट होऊन जाईल. मला त्याचा टाईम तरी वाढवून द्या. नाहीतर हा माझा अधिकार आहे कार्यपध्दत आहे पुढच्यावेळी होईल साहेब.

**श्रीकांत देशमुख :-**

पुढच्या सभेपर्यंत त्याची माहिती गोळा करुन हे करुन घेऊया...........

**जुबेर इनामदार :-**

म्हणजे पुढच्या सभेमध्ये ही चर्चा परत.......

**श्रीकांत देशमुख :-**

किंवा त्याच्यापूर्वी माझे हे तयार झाले तर मी आपल्याला लेखी उद्यापर्यंत करुन देतो.

**मा. महापौर :-**

तुम्हाला माहिती अधिकारी देणार परत हा विषय.

**जुबेर इनामदार :-**

त्यांना माहिती देऊ द्या.

**मा. महापौर :-**

विषय नाही येणार सभेमध्ये, आपल्याला माहिती देऊन टाकणार.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम, अधिनियमात मला प्रश्न विचारायचा अधिकार कुठल्या अधिनियमात आहे. मला सांगा आता मी माझ्यावर येईन उघड्याने सांगा त्याच्यामध्ये किती तासाचा उल्लेख आहे. त्याला समय सिमा नाही. म्हणजे चांगल्या विषयावर चर्चा करण्यासाठीच आणला आहे तुम्ही.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य आता संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितल की ह्या विषयात ते माहिती घेतात आपल्याला प्रकरणामुळे नागरिकांची निश्चित गैरसोय होते. ही गैरसोय कशी दूर करता येईल. हे आयुक्त साहेब आपण बघा तेथुन रोज अपघात त्या रस्त्यावरती होत असतात अर्धवट काम झालेले आहे. आणि नगररचनेकडून आपल्याला पूर्ण माहिती मिळणार त्यानुसार आपण ह्या विषयावर परत चर्चा करा.

**जुबेर इनामदार :-**

पुढच्या सभेमध्ये चर्चा करायची अनुमती महापौरांनी सांगावी.

**मा. उपमहापौर :-**

प्रश्न पूर्ण झाल्यानंतर आपण तो प्रश्न संपवू.

**जुबेर इनामदार :-**

पुढच्या सभेमध्ये प्रश्न कन्टीन्यु राहील ना महापौर मॅडम.

**श्रीकांत देशमुख :-**

याची माहिती घेऊन आपल्याला पुढच्या सभेपूर्वी मी लेखी कळविण्याचा प्रयत्न करतो.

**जुबेर इनामदार :-**

मला लेखी कळविल्यानंतर सुध्दा चर्चा करायचा अधिकार आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

आपण त्यांना वेळ दिलेली होती अर्धा तास भरपूर आहे. ह्या विषयासाठी परंतु त्यांनी तसे लांबलचक हनुमानची शेपटी कशी असते तशी त्यांनी काढलेली आहे. माझी यांना विनंती आहे की अर्धा तास सफिशियंट आहे.

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

स्टोरीचा आणि हनुमान चालीसाचा काय संबंध.

**धृवकिशोर पाटील :-**

यांना वेळ दिलेली होती हा विषय इथे संपलेला आहे. नविन महासभेमध्ये नविन विषय येतील.

**अनिल सावंत :-**

सन्मा. धृवकिशोर पाटील यांनी हिंदुंच्या कुलदैवतेचा अपमान केलेला आहे. त्यांनी सभागृहाची माफी मागावी.

(सभागृहात गोंधळ)

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम मी कोणत्याही हिंदु दैवतांची टिका केलेली नाही की मी काही चुकीचे काम केलेले नाही. तरी आपल्याला वाटत असेल मी चुकीचे बोललो आहे तर हे शब्द मी मागे घेतो. परंतु हा विषय पुन्हा चर्चेला येणे नाही विषय संपलेला आहे. आपण दुसरा विषय घ्या.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम माझा प्रश्न संपलेला नाही.

**मा. महापौर :-**

आपल्याला माहिती देणार नगररचनाकार अधिकारी.

**जुबेर इनामदार :-**

माहिती सभागृहामध्ये दिली माझा प्रश्न संपत नाही. सचिव महोदय कायद्याच्याबाबत बोलायचं.

**प्र. नगरसचिव :-**

महापौरांनी सांगितलं.

**मा. महापौर :-**

पुढचा विषय घ्या.

**गिता जैन :-**

महापौर मॅडम, एक मिनिट ह्याच विषयाला धरुन आयुक्त साहेब असाच एक विषय दोन सभांपूर्वी पण घडलेला होता आणि माझे लेटर आहे ते तुम्हाला साहेब मी एक महिना, दिड महिना झाला ते लेटर दिलेले आहे. त्या महासभेनंतर अजून तुम्ही त्याचा जवाब दिलेला नाही. ते डि.सी. रुल निगडीत आहे. आणि परत आपण तशी काही चुक करु नये म्हणून मी लेटर दिलेले आहे. पण त्याचा जवाब मला अजून भेटलेला नाही. मग परत मला पण असे परत प्रश्न आणायचा आणि तेव्हा सभेत तुम्ही उत्तर देणार का?

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम, सचिव महोदय प्रश्न विचारायचा जो अधिनियम आहे मला सांगा वाचून काय आहे. प्रश्न विचारायचा अधिकार पालिका सदस्याला नियमाद्वारे विहीत केलेल्या शर्तीच्या अधीन राहून घ्या. अधिनियमाच्या अंमलबजावणी किंवा शहरातील महापालिकेचा ह्या संबंधित कोणतीही बाबी संबंधी प्रश्न विचारता येतील अर्धा तास, एक तास, दोन तास, चार तास, आठ तास याचा उल्लेख कुठेच नाही.

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर पिठासीन अधिकारी आहेत त्यांच्या नियमात ते काम करतील. त्यांनी तुम्हाला वेळ दिलेली होती आणि याच्यामध्ये असे सुध्दा म्हटले आहे मॅडम अर्धा तास द्या, एक तास द्या किंवा पूर्ण दिवस द्यावा तर तुम्ही अर्धा तास दिलेला आहे. वेळ सफिशियंट दिलेली आहे. त्यांनी ते काम स्पष्टपणे केलेले आहे. त्याच्यामुळे त्यांना ही सभा आहे ती आणखीन पोसपॉन करायची किंवा मोठी करायची त्याच्यामुळे त्यांनी नुसत गोलगोल बसून तेच प्रश्न विचारतात.

**जुबेर इनामदार :-**

उपविधीमध्ये अर्ध्या तासाचा उल्लेख आपण जाणून बूजून कारण दुसरे कामकाज आपल्याला करायचे असतात ज्याचा प्रश्न पूर्ण होत नाही. तोपर्यंत तो पूढच्या महासभेत प्रलंबित राहतो.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलते महत्वाचे विषय ह्या सभागृहामध्ये मिरा भाईंदर मधले महत्वाचे विषय आपण इथे सभागृहात मांडणार आहोत. गेल्या अर्ध्या तासापासून बघतो सत्ताधाऱ्यांची अशी अवहेलना झालेली आहे की चोरांच्या उलट्या बोंबा म्हणजे करायचे त्यांनी २०१० मध्ये आणि परत तोच कार्यगृह पूढे काढायचा. आणि इथे बोंबा मारायच्या का म्हणजे सभागृहाचा वेळ वाया घालवायचा.

प्रश्नावली कुठे तरी दिशाभूल करायची. महापौर मॅडम मला तुम्हाला विनंती आहे यांचा अर्धा तास झालेला आहे. त्यामुळे सभागृहाचे कामकाज सुरु करावे.

**मा. उपमहापौर :-**

आपल्याला अपेक्षित उत्तर मिळाल नाही हे आम्ही मानतो. हे सभागृह आपल्याला उत्तर देईल गरजेचे नाही ह्या सभागृहातच प्रत्येक प्रश्नाचे उत्तर आपल्याला मिळेल कायदेशीररित्या आपण महासभेसमोर ते उत्तर मागितलेले आहे ते मिळण आणि देण सभागृहाचे काम आहे. परंतु जेव्हा संबंधित अधिकारी उठून सांगत आहेत की, पुढील महासभेच्या आत मी उत्तर देऊ शकतो तर ते तुम्हाला उत्तर मिळाल म्हणजे उत्तर मिळाले असे होईल आणि आपण आपल्या सभाशास्त्रात २० मिनिटाचा टाईम देतो त्याचा अर्थ असा असतो की ह्या सभेसमोर बरीच कामकाजाची लिस्ट आहे. ह्या लिस्टवर देखील चर्चा करायची आहे. जेव्हा संबंधित डिपार्टमेंटने आपल्याला सांगितले की आम्ही उत्तर मागवून देतो उत्तर देतो. परत परत तो प्रश्न कन्टीन्यु ठेवण्याचे कारण नाही. जर आपल्याला अस म्हणायचे असेल माझा प्रश्न पूर्ण झाला नाही आणि तो मला पुढच्या सभेत घ्यायचा आहे. जर त्याचे लेखी उत्तर आपल्याला सादर होणार असेल तर परत त्याच्यावरती चर्चा करायची आवश्यकता पडणार नाही. पण आपणाला लेखी उत्तर आधी मिळेल हे निश्चित. म्हणून पुढील कामकाजाला सुरुवात करावी.

**स्नेहा पांडे :-**

अगर लेखी उत्तर इसी तरह से गोलमाल रहेगा तो अगर हम सॅटीसफाईड नही है तो हम अगले महासभा में प्रश्न तो पूछेंगे ना।

**मा. उपमहापौर :-**

उत्तर देने की जिम्मेदारी डिपार्टमेन्ट की है।

**स्नेहा पांडे :-**

लेकीन हम सॅटीसफाईड नही है तो हम अगली महासभा में पुछेंगे ही प्रश्न।

**मा. उपमहापौर :-**

जो बात सही है वह आपके सामने रख दिया है।

**प्र. नगरसचिव :-**

आजच्या महासभेसाठी लक्षवेधी आलेली आहे. एकूण ७ लक्षवेधी आलेल्या आहेत. पहिली लक्षवेधी आहे दिनेश तेजराज जैन. अनधिकृत फेरिवाल्यांवर कारवाई करणेबाबत सोमवार दि. २६/०२/२०१८ रोजीच्या महासभेत लक्षवेधी घेणे ही दिनेश तेजराज जैन यांची लक्षवेधी आहे. सेम विषय अश्विन कासोदरिया यांचा आहे. त्याच विषयावरती अनिल रावजीभाई विराणी यांनी देखील लक्षेवधी दिलेली आहे. ह्याच विषयावरती सिमा कमलेश शहा यांनी एक लक्षवेधी दिलेली आहे. ह्याच विषयावर श्रीम. वंदना संजय भावसार यांनी एक लक्षवेधी दिलेली आहे आणि अनिल सावंत यांनी एक लक्षवेधी दिलेली आहे. त्याचा विषय आहे मिरा भाईंदर क्षेत्रात विविध सेवा पुरविण्या-या कंपन्या करत असलेले खोदकामाबाबत तसेच धृवकिशोर पाटील यांनी दिलेल्या लक्षवेधीचा विषय आहे. रिलायन्स एनर्जी यांच्या अनधिकृत सबस्टेशन अनधिकृत खोदकाम अनधिकृतपणे केबल बाबत. ह्या ७ लक्षवेधी मी मा. पिठासीन अधिकारी यांच्याकडे सुपुर्द करतो.

**मा. महापौर :-**

आजच्या सभेत ७ लक्षवेधी आलेल्या आहेत. त्यापैकी अनिल सावंत यांची व धृवकिशोर पाटील यांची रिलायन्स एनर्जीची लक्षवेधी आहे त्या दोन्ही लक्षवेधी एकच असल्यामुळे एकत्र करुन स्विकारण्यात येत आहे. त्यावर प्रथम अनिल सावंतने चर्चा करावी नंतर इतरांनी चर्चा करावी.

**अनिल सावंत :-**

लक्षवेधी स्विकारल्याबद्दल धन्यवाद. लक्षवेधी बद्दल मागच्या मिटींगमध्ये सुध्दा मॅडम चर्चा झाली होती. महापौराचा अधिकार आहे कुठची लक्षवेधी घ्यायची कुठची नाही. पण ज्या लक्षवेधी येतात त्याची एक एक प्रत सर्व सदस्यांना द्यावी अशी सदस्यांची मागणी होती ते काहीच करत नाही. त्यांनी मागच्यावेळी हो म्हणून सांगितल होत देतो म्हणून. का नाही देत लक्षवेधीची एक प्रत द्यायची ना. मग कळेल ना. काही अडचण आहे का द्यायला. लक्षवेधीची कॉपी संदस्यांना द्यायला काही अडचण आहे का? महापौर मॅडम दिली पाहिजे सर्वांना समजेल ना सभागृहामध्ये विषय येत आहे त्याच्यावर सभागृहामध्ये चर्चा होत आहे.

**मा. महापौर :-**

तुम्ही तुमची चर्चा करावी काय बोलायचे आहे........

**अनिल सावंत :-**

लक्षवेधी देणार नाही तुम्ही सदस्यांना?

**मा. महापौर :-**

ते नंतर ठरवू.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम लक्षवेधी आहे मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रात विविध सेवा पुरविणाऱ्या कंपन्या करत असलेल्या खोदकामाबाबत विविध कंपन्या मग ते रिलायन्स असेल, महानगर असो, टेलिफोन एक्सचेंज, केबल ऑपरेटर्स त्या ठिकाणी विविध खोदकाम करतात आणि महापालिकेकडे परवानगी मागण्याची प्रोसीजर काय आहे? हे मला पाहिजे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून की फक्त इंटेमिनेशन सफिशियंट की परवानगी पाहिजे त्यांनी पैसे भरले पाहिजे. अगोदर महापालिकेची परवानगी घेतली पाहिजे. सार्वजनिक बांधकाम खाते काय म्हणत आहे हे मला उत्तर पाहिजे सार्वजनिक बांधकाम खात्याकडून. एवढी वाईट परिस्थिती आहे रिलायन्सवाले म्हणतात की आम्ही पैसे भरले परवानगी घेतली आहे. परवानगी दाखवत नाही कुठल्याही लोकप्रतिनिधीला माहिती नसते. शहरातल्या आपले आमदार यांना रात्रीचे फिरून त्या रिलायन्सवाल्यांना पकडावे लागते. एक १६ लाखाचा आर्थिक भुर्दंड महापालिकेला पडणार होता तो त्यांच्यामुळे पालिकेला ते उत्पन्न झालं. परंतु असे किती करोडचे आहेत अशी किती काम पेंडींग आहेत. आज शहरामध्ये बघा महापालिकेने रस्ता खोदला की ताबडतोब खोदायला येतात त्याची परवानगीचे काय परवानगी गरजेची आहे. जरा सार्वजनिक बांधकामला विचारा म्हणजे सदस्यांना पण कळेल उगाच वादविवाद होणार नाही. मागचा विषय पण रोवला गेला इथे सभागृहामध्ये अभिनंदनाचा ठराव मांडला गेला खाली मोर्चा आला. सभागृहाला नेमकी वस्तुस्थिती काहीही कळलेली नाही. काय झाल नक्की का नाही झाल. पेपरच्या माध्यमतून बातम्या कळतात की रिलायन्सवाल्यांनी केस केली ते म्हणतात महापालिकेने केस केली. हे प्रत्येक ठिकाणी वादविवाद होत आहेत आणि जे लोकप्रतिनिधींनी केले आमदारांनी केले त्याच करण प्रत्येक नगरसेवकाला करणे काही शक्य नाही. जाऊन त्याला किडन्याप करायचं पोलिस स्टेशनला घेऊन जायचं. आणि पोलिस केस करायची लोकांना उत्तर नगरसेवकांना द्यावे लागत आहेत. याच्याबाबतीत पालिकेचे काय धोरण आहे पालिकेने आज रस्ते खोदकामासाठी किती पैसे ह्या वर्षामध्ये जमा केले आहेत आणि कुठे कुठे किती खर्च केलेले आहेत. तो मुद्दा विषय याच्यामध्ये आहे. जरा सार्वजनिक बांधकाम खात्याला बोलवा म्हणजे ते क्लिअर होईल. जास्त उगाच डिस्कस करणे धृवकिशोरला पण बोलायचे आहे.

**मा. महापौर :-**

दोनो का बोल दिजीए बाद में उत्तर उनको साथ में बुलाके देंगे।

**अनिल सावंत :-**

बुलालो फिर एक्सप्लेनेशन हो जाएगा। माझा हाच विषय आहे आणि त्याच्यामध्ये पालिकेचा जो बजेट आहे. पॅचवर्कसाठी आहे ते आपण पालिकेच्या निधीमधून खर्च करतो की त्यांनी दिलेल्या निधीमधून खर्च करतो. याचाही उल्लेख होत नाही आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम लक्षवेधी म्हणजे शहरामध्ये ज्या काही अशा घटना घडतात त्याचे लक्ष वेधणे हा त्याच्यामागचा इन्टेशन असतो. मग एका अधिकाऱ्याला बोलवून क्रॉस क्वेशनिंग करुन हे काय केल हे कस करता हे प्रश्न चुकीचा आहे आणि आपण नगरसेवक आहोत कोणतीही बाजू मांडण्याचा अगोदर त्याची माहिती आपण घेतली पाहिजे पण त्याची माहिती आपण घेत नाही. आता परमीट एखादा रस्ता खोदायचा आहे तर ती परमिशन कशी घ्यावी लागते. आपले काम आहे की ह्या अधिकाऱ्यांना विचारणे. मॅडम विषय असा आहे की जसे आता अनिल सावंत साहेबांनी सांगितल रस्ते खोदकाम खुप मोठा विषय आहे. मा. आयुक्त साहेब आपण जर लक्ष दिल तर बर होईल. तुमच फाईल बघण्याचे काम चालू आहे. आणि हा जो इश्यू आहे हा इश्यू जर सॉल्व्ह झाला तर महापालिकेच नुकसान होणार नाही. महापालिकेचा आर्थिक फायदा होईल जस यांनी सांगितल की रिलायन्सवाले, टाटा कंपनीवाले कोणतेही कंपनीवाले फक्त लेटर टाकतात परमिशन फक्त मागतात आणि ते विसरुन जातात आणि आपले सर्व रस्ते खोदतात. आपण जातो त्यांना विचारतो की तुमच्याकडे परमिशन आहे का? हो साहेब आहे ना. चिठ्ठी दाखवतात. त्याच्यामध्ये फक्त आपल्या महापालिकेला केलेले पत्र दिलेले असते आणि फक्त ॲक्नॉलेजमेंट रिसिव्ह करणे म्हणून परमिशन नसते आणि आपले डिपार्टमेन्ट त्या आलेल्या इंटिमेशन लेटरचे इमिजिएटली ॲक्शन न घेतल्यामुळे ते लोक काम करतात आणि निघुन जातात. साहेब कधी कधी अस असत की १० फुटाची परवानगी घेतात आणि खोदतात २० फुट २५ फुट पण आपले कर्मचारी लक्ष देत नाही त्याच्यामुळे साहेब आपले खुप मोठे नुकसान झालेले आहे आणि आताच मागे आयुक्तांनी सांगितले की आपला आर्थिक इन्कमचा सोर्स वाढवायचा आहे. साहेब हा पण एक सोर्स आहे. याच्याकडे आपले लक्ष नाही. आपल्या

अधिका-यांचे पण लक्ष नाही दुसरे साहेब सबस्टेशन रिलायन्सचे आपण बांधतो त्यावेळेला बांधतात कुठेही बांधतात. साईट मार्जिनमध्ये बांधतात, रस्त्याच्यामध्ये बांधतात, कसलीही परमिशन नाही. साहेब एखाद्या सोसायटीला किंवा एखाद्या कॉम्पलेक्सला वॉचमन केबीन जर बांधायची असते तर त्याला परवानगी घ्यावी लागते. पण हे रिलायन्सवाले परवानगी अजिबात घेत नाही. जसे जावई आहेत तस जावईचे काम करतात बिनधास्त बांधतात. रस्त्याच्या कडेला बांधतात रस्त्याच्यामध्ये बांधतात बिल्डींग साईटला बांधतात साहेब आपण त्यावेळेला बिल्डींगला ओ.सी. देतो त्यावेळी आपली फायर ब्रिगेडची गाडी फिरते की नाही हे चेक करतो पण तो रिलायन्स सबस्टेशन हा गुन्हा पण त्याला माफ आहे. ते बघत नाही. सर आपले वॉर्ड ऑफिसर गरिब माणसाने काही जर केलं तर लगेच त्याचे तोडतात. रिलायन्स सबस्टेशन कधीच तोडले नाही आणि ही रिलायन्सला सेवा नाही साहेब प्रॉफिट मेकिंग इन्ट्युशन आहे. ही इथे आपण जर अर्ज केला की मला रिलायन्सचे मीटर पाहिजे साहेब एवढी लांबलचक चेकलिस्ट असते हे सगळे डॉक्युमेंट पुर्तता करा. मग मी तुम्हाला देतो आणि एक दिवस जर डिले आला तर लाखो रुपये इंटेक्स चार्ज करते मग अशा प्रॉफीट मेकींग इन्ट्युशनला आपण का त्यांना सपोर्ट करायचा का त्यांचे अनधिकृत बांधकाम साहेब एखादी घर जर आपण इललिगल बांधतो परमिशन नाही घेत साहेब त्याच्यावरती आपण शास्ती लावतो. दोनपट, तीनपट टॅक्स लावतो. पण कोणत्याही रिलायन्सच्या सबस्टेशनची परवानगी नाही काही काही सबस्टेशनला टॅक्स पण नाही आणि शास्ती पण लावण्यात आलेली नाही. साहेब मला सांगा किती करोडो रुपये नुकसान झाले. एखाद्या बिल्डरने बिल्डींग बांधली एक फ्लॅट इललिगल बांधला अख्या बिल्डींगचा नागरिकांना तीनपट टॅक्स भरावा लागतो काही संबंध नाही त्या लोकांचा पण त्यांना भरावा लागतो. मग ह्या रिलायन्स कंपनी आपला काय जावई आहे का? का आपण त्याला टॅक्स लावत नाही. का आपण त्याला शास्ती लावत  नाही. साहेब त्याने डकची परवानगी घेतली त्या डकमध्ये फक्त रिलायन्सला बरोबर टाटाची पण आयडीयाची पण आहे. आणि इतर लाईन पण त्याच्यामध्ये गेलेल्या आहेत. परवानगी घेता फक्त एक माणूस आणि टाकतो ४-४ माणंस पालिकेचे नुकसान आणि तो माणूस सगळ्यांकडून पैसे घेतो. मी महापालिकेची परवानगी आणतो. परवानगी घेतो फक्त एकच आणि टाकतो चार केबल साहेब असे अनेक इश्युज आहेत रिलायन्स कंपनीचे त्याच्यात माझी तुम्हाला विनंती आहे की ह्या रिलायन्स कंपनीचे सगळे सबस्टेशन अधिकृत आहेत की अनधिकृत आहेत साहेब हे चेक करा. सगळ्यात पहिला त्याच्यानंतर जर अधिकृत असतील तर त्यांना टॅक्स लागला की नाही ते चेक करा जर अनधिकृत असतील तर त्याच्यावरती शास्तीसह कारवाई करा. त्यांनी जे डक टाकले आहेत हे डक पण चुकीचे टाकलेले आहेत. त्यांनी आपल्याकडे मागणी केली ४ डकची करतात. ४० डक आपण याची पण इन्क्वायरी लावली पाहिजे. साहेब माझी तुम्हाला विनंती आहे. लक्षवेधीच्या माध्यमातून आपण रिलायन्स कंपनीला आणि इतर कंपनीला ज्या डकची परमिशन दिलेली आहे जे रस्ते खोदकामासाठी परमिशन दिलेली आहे त्यांची सर्वांची चौकशी करा. आणि त्याचबरोबर त्यांचा सबस्टेशन सुध्दा अशी मागणी तुमची माझ्याकडे आहे. सबस्टेशन करिता. धन्यवाद मॅडम.

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त महोदय तुमच्या फक्त निदर्शनास आणून देऊ इच्छितो यालाच निगडीत विषय आहे ऑप्टीकल केबल एकच डकमधून ब-याच कंपनीच्या लोक समंजस पध्दतीने ते करुन घेतात साहेब नियमावलीमध्ये आपल्याकडे त्याची तरतूद आहे आणि आपण त्यांच्यावरती साहेब तेवढ्याच प्रकार त्यांच्याकडून शुल्क आकारु शकतो. सुधारित नियमावलीमध्ये ३१ चा ५८ लेईंग ऑप्टीकल फायबर अंडरग्राऊंड बाय कंपनीस ऑथराईज बाय द स्टेट गर्व्हमेन्ट सेलरी परमीटेड ऑफ ऑन लॅन्ड पोलींग अंडर द ड्युरीशन ऑफ द गर्व्हमेन्ट ऑफ महाराष्ट्र म्युनिसिपल कार्पोरेशन ॲन्ड एनी अदर ऑथीरीटी ऑर ओनर. इफ परमीटेड बाय द पर पिरेड ऑफ ३० अवर्स ऑन लाईसन्स व्हेजीस सबजेक्ट टू कंडीशन प्रिस्काईब आय द स्टेट गर्व्हमेन्ट ॲन्ड सबजेक्ट टू फॉर देअर स्पेशल कंडीशन ऑफ द म्युनिसिपल कमिशनर. साहेब तुम्हाला भरपूर अधिकार आहेत. त्याला काय साहेब हे १००-१०० मीटर आपल्याकडून याची परमिशन घेतात. पूर्ण शहराला असे डम्पींग करुन टाकले आहे. नविन रस्ता आज केला उद्या खोदकाम करत आहेत. अनियम त्रास आहे. ते टिकत नाही. हा रस्ता आपण चांगला करायचा त्याच्यावर त्यांनी डब करायचे साहेब करतात गरज असेल द्यायला पाहिजे. क्षेत्र निश्चित करता येईल ना साहेब हे याच्यासाठी करतात की त्यांना टाटालाही द्यायचं आयडीयालाही द्यायचं रिलायन्सलाही द्यायच बाकीच्या कंपन्यांना त्या चेंबरमधून जंक्शन साहेब यांच्यावरती तुम्ही चौकशी करा याला काय अंकुश लावता येईल ते बघा शुल्क उभारता येईल पालिकेला ते बघा.

**दिप्ती भट :-**

दोन मिनिट ही लक्षवेधी आहे म्हणून याच्यावरती लक्ष देणे गरजेचे आहे हे २०१० पासून केस आहे आणि आजही प्लॉटमध्ये रिलायन्स एनर्जीने जी लोकांची जागा आहे आर.जी. ची त्याच्यामध्ये सबस्टेशन बांधलेले आहे. तर विधी मॅडमने आजपर्यंत कारवाई केली नाही आपल्याला विनंती आहे की ते सबस्टेशन रिलायन्सचे आपण कशाला ते आर.जी. मध्ये दोन माळ्याचे बांधुन सांभाळून ठेवलेले आहे. त्याच्यावरती कारवाई करण्यात यावी ते आर.जी. प्लॉटमध्ये बांधलेले आहे. दोन मिनिटे तोच विषय होता बाकी मला काही बोलायचे नाही आणि मला काही एक एक वर्षापासून महानगर गॅसने परमिशनसाठी ॲप्लीकेशन दिले आहे. लोकांचा तिथे गॅस लाईन टाकायला आपण परमिशन नाही देत तर आपल्याला विनंती आहे की बांधकामाला सांगुन ते परमिशन क्लियर करुन परमिशन देण्यात यावी ते लाईन क्लियर करतील.

**मा. उपमहापौर :-**

ठिक आहे सन्मा. महापौरांच्या परवानगीने जी लक्षवेधी आता सभागृहासमोर आली ह्या सभागृहाचे आमचे सहकारी नगरसेवक स्थायी समितीचे सभापती धृवकिशोर पाटील साहेब आणि अनिल सावंत साहेब यांच्या दोघांच्या लक्षवेधी आहेत. निश्चितपणे लक्षवेधीचा उल्लेख धृवकिशोर पाटील साहेबांनी सांगितला की लक्ष वेधण्यासाठी असते आयुक्त साहेब आपल्याला ह्या संदर्भात एक विनंती करतो की रिलायन्सच्या माध्यमातून रिलायन्सने टाटाने सगळ्यांचा आयुष्यात आमच्या प्रकाश जरी आणला तरी ती एक बिझनेस ओरेन्टेड कंपनी आहे ते बिझनेस करतात आणि कायदेशीर तरतुदी आहेत की त्यांनी परवानगी घेतलीच पाहिजे आणि जे काम अकस्मात एखादी गोष्ट असेल लाईट गेली आहे फॉल्ट भेटत नाही किंवा ४-६ ठिकाणी त्याने खड्डे खोदणे हे क्रमप्राप्त आहे हे गरजेचे आहे. परंतु व्यवसायिक कारणासाठी एवढ्या मोठ्या पध्दतीने खड्डे खोदणे आणि त्याला अनुसरुन दुसराही व्यवसाय करतात. एक परवानगी घ्यायची आणि ४ ठिकाणी १० ठिकाणी काम सुरु करायची ह्या संदर्भात आयुक्त साहेब संबंधित खात्याकडून आपण माहिती घ्यावी निश्चिपणे ह्या माध्यमातून ह्या शहराचे उत्पन्नाचे स्तोत्र मोठे होणार आहे. तर ह्या संदर्भात आपण सगळी माहिती संकलीत करुन यांच्याकडून आपल्याला जसे आपल्याकडून मोठे मोठे चार्जेस घेतात दोन महिन्यांचे बील भरले नाही तर आपली लाईट कापतात तर तसा ह्यांना देखील कम्पलेन्ट करुन आपले उत्पन्नाचे स्तोत्राखाली त्या कंपनीला आणावे अशी विनंती करतो.

**स्नेहा पांडे :-**

कमिशनर साहेब एक और भी सुचना है की आज शहर में देखने जाऐंगे तो रस्तो के खड्डे खोद के ऐसी बिकट परिस्थिती हुई है की चलना तक मुश्कील हुआ है। तो परमिशन देने से पहले उन पर समय सिमा निर्धारीत करे की इतने दिनो में करता है और नही होता है। तो उनसे दंड वसुल किया जाए और दुसरी बात जिस नगरसेवक को वॉर्ड में खोदकाम का चालू है उनको एक लेटर दिया जाए की ऐसा-ऐसा परमिशन दिया जा रहा है और इतने दिनो में काम पुरा होगा तो अगर वह काम बंद रखते है तो हम कम से कम पालिका को इन्फॉर्म करे और उनसे दंड वसुला जाए। ऐसी सुचना हर परमिशन अगर वह लेते भी है खोदकाम के बाद नगरपालिका टॅक्स का काम बराबर करती नही इसका भी विशेष ध्यान दिया जाए। अंडर ग्राऊंड ड्रेनेज के काम पिछले मे जुन से हो गए लेकिन आज तक उस में पॅच नही हुआ है और ३-४ महिने से नगरसेवक लगातार फॉलोअप कर रहे है। जिसको कॉन्ट्रॅक्ट मिला था कॉन्ट्रॅक्टर को फिर भी काम नही हो रहा है। तो कमिशनर साहब इसमें जरा ध्यान दिजीए।

**धृवकिशोर पाटील :-**

मतलब मॅडम आप हमारे बात से सहमत है।

**स्नेहा पांडे :-**

आपके बात से सहमत है इसी लिए तो बोलते है।

**धृवकिशोर पाटील :-**

मतलब जो लक्षवेधी हमने लाई है वह बराबर है।

**स्नेहा पांडे :-**

उसकी बहुत जरुरत है। आपका बहुत बहुत धन्यवाद।

**धृवकिशोर पाटील :-**

आपने भी लाई है और हमने भी लाई है। लास्ट मिटिंग मे हमने यह टॉपीक उठाया था तब आप लोगो की भुमिका थोडी अलग थी।

**स्नेहा पांडे :-**

हमारी भुमिका हमेशा सबके लिए होती है। हमारा विचार जनता के सुविधा के लिए हम आपके साथ है।

**धृवकिशोर पाटील :-**

खाली तुमच्या सहकारी पक्षाने आणखी एक मोर्चा आणला होता. आणि त्याचा विरोध केला होता.

**स्नेहा पांडे :-**

तो मोर्चाचा विषय वेगळाच होता.

**प्रविण पाटील :-**

एका कर्मचाऱ्याला मारल म्हणून मोर्चा आणलेला. रस्ते खोदले होते म्हणून नव्हता आणला.

**धृवकिशोर पाटील :-**

सभागृहासमोर माहितीसाठी मोर्चेची गरज नाही ना छोटोशी गोष्ट होती.

**अनिल सावंत :-**

ती छोटी गोष्ट नाही ती मोठी गोष्ट आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

ह्या भुमिकेशी सगळे सभागृह सहमत आहे. आयुक्त साहेब आणि हा खरा इश्यु आहे तो खुप मोठा इश्यू आहे. आपले आर्थिक नुकसान जे रिलायन्स कंपन्यांनी केल त्याला धडा शिकवला पाहिजे आणि ही जर सेवा यशस्वी बसवली सगळी प्रॉफीट मेकींग इश्यु पण आहे आणि सर आपल्या महानगरपालिकेच्या आवारात एक खुप मोठा भला मोठा पिलर उभा केला रिलायन्स कंपनीने त्याचे साहेब भाडे पण ते देत नाही आणि आपल्याला इंटरनेट विकत घ्यावे लागते. ॲक्च्युअली त्या लोकांना आपल्याला इंटन्स देणे बंधनकाकर आहे. प्रत्येक इंडस्ट्रीज जर आपण लाईन टाकायला घेतो तर २ जी.बी. अशी काहीतरी आहे प्रत्येक दर मागे किंवा असे काही तरी २ जी.बी. आपल्याला ती सेवा दिली पाहिजे आणि आपण सुध्दा ती सेवा घेत नाही आणि आपण ते पैसे देऊन बाहेरुन इंटरनेट घेतो त्याची पण साहेब तुम्ही चौकशी लावा. आणि सर तुम्हाला शेवटची विनंती आहे की त्या लोकांना सर्व परमिशन बंद करा. फक्त एमरजन्सी काही लाईटचा फॉल्ट झाला असेल तर द्या आणि सिंगल विंडो सिस्टम जर केली तर कदाचित याच्यामध्ये आणखीन भर पडू शकतो.

**रोहिदास पाटील :-**

महापौर मॅडम एक लक्षवेधीचा भाग आहे. आयुक्त साहेब आपण महापालिकेच्या वतीने विद्यार्थ्यांना सोयीच्या दृष्टीने अनेक ठिकाणी वायफाय सेवा दिल्या. गावकऱ्यांनी त्याच कौतुक केल अधिकाऱ्यांना त्यावेळी जे सदस्य होते सगळ्यांनी त्या गोष्टीचा आनंद ही झाला. आजची स्थिती अशी आहे की वायफाय सेवा परिक्षेचा काळ चालू आहे आणि वायफाय सेवा बंद आहे. काही ठिकाणी महिन्यांपासून बंद आहे काही ठिकाणी दोन महिन्यांपासून बंद आहे. महापौर मॅडम तुम्ही तत्काळ निर्देश द्यावेत की ती वायफाय सेवा तत्काळ सुरु होणे गरजेचे आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम, ह्या संपूर्ण प्रकारची चौकशी आपण आयुक्तांना सांगुन करालच काही ठिकाणी तर अशी परिस्थिती आहे फायबर केबलचा जो उल्लेख केला मिरा भाईंदरचा जो मुख्य रस्ता आहे जुना पेट्रोल पंपच्या बाजूला त्या नाल्याच्या तोंडावरच फायबर केबल आलेले आहे. त्यामुळे पूर्ण चॉकअप तो नाला जवळ जवळ दिड ते दोन महिने तसाच उघडा पडलेला आहे. ह्या सर्वांची तुम्ही चौकशी करा आम्ही आमचे सहकारी धृवकिशोर पाटील साहेबांनी सांगितले की लक्षवेधी म्हणजे शहराचे लक्ष वेधून घेण्यासाठी असते त्यांना हे पण माहिती पाहिजे की लक्षवेधी आणि प्रश्न विचारण्याचा जो हक्क आहे तो विरोधी पक्षांना असतो. तुम्ही सत्तेत आहात हा रितसर विषय तुम्ही विषयपत्रिकेवर आणला पाहिजे होता.

**मा. उपमहापौर :-**

कोणीही लक्षवेधी मांडू शकतो असे काही नाही. ज्या आवश्यक बाब आहेत त्या बाबतीत कोणीही...........

**अनिल सावंत :-**

पण तुम्ही सत्तेत आहात तुम्हाला अधिकार आहे महापौरांना विषय देऊन तो रितसर विषयपत्रिकेवर घ्या. हा अधिकार आहे ना लक्षवेधी विरोधी पक्षांचा हक्क आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

अनिल सावंत साहेबांचे बरोबर आहे. परंतु हे खूप मोठे आर्थिक नुकसान मागच्या आयुक्तांनी एक पत्र दिलेले होते की दरवाढीचे प्रस्ताव आम्ही तुम्हाला सादर केले तुम्ही ते मंजूर करुन द्या कारण की आपल्याला आर्थिक धोरण सांभाळायचे आहे आणि म्हणून ही लक्षवेधी आणून त्यावेळी मी टाईप केली होती पण अनावधानाने गिते साहेब गेले आणि पवार साहेब आले...........

**ज्योत्सना हसनाळे :-**

महापौरांच्या परवानगीने बोलते मॅडम अस आहे की लक्षवेधी हा विषय रिलायन्सच्या बाबतीमध्ये आणला अधिक चांगला विषय होता. विरोधकांनी आणला किंवा आज सत्ताधाऱ्यांनी आणला तो महत्वाचा नसुन शहराच्या संदर्भामध्ये जो विषय आहे तो फार महत्वाचा आहे. आज रिलायन्स एनर्जी आणि टाटा कंपनीने जे काही कार्यालये विभागामध्ये चालविलेले आहेत तसच एक आमच्या विभागात एक प्रश्न आलेला आहे की टाटा कंपनीने परवानगी मागितली दुसऱ्या ठिकाणची म्हणजे मांडवी पाडा क्षेत्रामध्ये परवानगी मागितली केबल टाकण्यासाठी आणि ती त्यांनी टाकली माशाच्या पाड्याला तर अशा पध्दतीने बांधकाम विभागाने त्यांना परवानगी पण दिली. सदर बाबतीत कार्यकारी अभियंता आपले शहर अभियंता बारकुंड साहेब आणि खांबित साहेब यांच्या निदर्शनास आणली त्यांनी ती परवानगी रद्द केली परंतु जानकरने तिथे जाऊन टाटा एनर्जीला पत्रव्यवहार केला आणि पुन्हा टाकून घेतली सर मला ह्याच्याबद्दल उत्तर पाहिजे. ह्या ठिकाणी की जानकरने त्याठिकाणी लाईन टाकण्यास परवानगी कशी दिली.

**दिनेश जैन :-**

महापौर मॅडम रिलायन्स का जैसे बहुत अच्छा विषय लिए धृवकिशोरजीने जो जरुरत थी मिरा भाईंदर के लिए विषय लाने की लेकिन जो भी हम परमिशन देते है खोदकाम के किसीको भी तो सभी नगरसेवक का एक व्हॉटसअप गृप बना हुआ है तो उस परमिशन की कॉपी अगर वह व्हॉटसअप गृप में डाल दे तो कितना परमिशन दिया, कितना खोदने का दिया तो वह वहाँ के स्थानिक नगरसेवक को एक माहिती रहेगी उसकी वजह से उसको पता चलेगा की भाई यह गलत खोद रहा है या सही खोद रहा है। और दुसरी बात ऐसी है की मैंने भी आज एक लक्षवेधी डाली थी फेरिवाले के विषय के उपर वह भी गंभीर है लेकिन में आपसे रिक्वेस्ट करता हूँ की आनेवाले महासभा में उसका विषय लाके उसका निवारण करे।

**ज्योत्सना हसनाळे :-**

महापौर मॅडम माझ्या प्रश्नाचे उत्तर अजून दिले नाही. जानकरला जरा बोलवा त्यांनी परवानगी कशी दिली ते जरा विचारा. माझा प्रश्न असा आहे की परवानगी देता एका ठिकाणची लाईन टाकली जाते केबल टाकली जाते दुसऱ्या ठिकाणी आयुक्त साहेबांनी उत्तर दिलं तरी चालेल.

**मा. आयुक्त :-**

माहिती घेऊन तुम्हाला कळविण्यांत येईल.

**ज्योत्सना हसनाळे :-**

त्याच्यावरती कारवाई होणार का जर चुकीची लाईन टाकली असेल तर?

**मा. आयुक्त :-**

व्हॉयलेशन झाले असेल तर कारवाई होईल.

**ज्योत्सना हसनाळे :-**

ठिक आहे.

**राजेंद्र जैन :-**

महापौर मॅडम केबल की बात हो गई रिलायन्स की बात हो गई जब कल तो हो गया अभी नकी बात कर लेते है। पुरे भाईंदर में पेडो के रस्ते से क्रॉसींग में कई सारे केबल लगे हुए है। बारकुंड साहब से बात किया जानकर साहब से बात किया उन्होंने कहाँ हमने कोई परमिशन नही दी। सालो साल से उधर लगे हुए है उसका हम कुछ टॅक्स नही लेते है ना कुछ करते है ना परमीशन है। इसके उपर कोई कारवाई की जाए और उसका पैसो वसुल किया जाए।

**मा. आयुक्त :-**

चेक करके कारवाई करेंगे।

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७५, **दि. २८/०८/२०१७, १६/१०/२०१७ रोजींच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**रोहिदास पाटील :-**

दि. २८/०८/२०१७ व दि. १६/१०/२०१७ रोजींच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मर्लिन डिसा :-**

महापौर मॅडम मला एक सांगायचे आहे हे जे इतिवृत्तांत आहे याच्यात एवढ्या चुका आहेत स्पेलिंग मिस्टेक स्पील ओव्हर आहे तिथे स्पीड ओव्हर लिहीलेले आहे आणि कितीतरी अनेक चुका आहेत जे टायपिस्ट आहेत........

**मा. उपमहापौर :-**

पेज नंबर सांगा लगेच सुधारणा करु.

**मर्लिन डिसा :-**

सगळीकडे आहेत.

**मा. उपमहापौर :-**

पूर्ण चेक करा.

**मर्लिन डिसा :-**

हे कोणी बुक रिडींग करत नाही का?

**मा. उपमहापौर :-**

चुक दुरुस्त होईल.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम सचिव साहेबांना माझा एक प्रश्न आहे. सदस्यांचा इतिवृत्तांत आहे ते सदस्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये काय तरतूद आहे कधी द्यायला पाहिजे?

**प्र. नगरसचिव :-**

शक्य तितक्या लवकर म्हटलेले आहे.

**अनिल सावंत :-**

रुल काय आहे?

**प्र. नगरसचिव :-**

तसा रुल नाही शक्य तितक्या लवकर असे म्हटलेले आहे.

**अनिल सावंत :-**

पृष्ठ काढा जरा ४५९ नियम काढा.

**प्र. नगरसचिव :-**

मला माहिती आहे.

**अनिल सावंत :-**

“न” काय म्हणतो बघा. ४५९ प्रकरण २ न वाचा.

**प्र. नगरसचिव :-**

नगरपालिका सचिवाने प्रत्येक सभेत उपस्थित असलेल्या पालिका सदस्यांची नावे आणि अशा सभेतील कामकाज ह्या संबंधितचे एक कार्यवृत्त सभेच्या दुसऱ्या दिवशी किंवा त्यानंतर शक्य तितक्या लवकर तयार केले पाहिजे आणि ते ह्या प्रोव्हिजनसाठी तरतुद करण्यात आलेल्या पुस्तकात ठेवले पाहिजे आणि त्यावर नंतरच्या सभेच्या अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिकाऱ्याने सही केली पाहिजे.

**अनिल सावंत :-**

तुम्ही अर्धवट वाचू नका. नंतरच्या सभेच्यामध्ये मागील सभेचे इतिवृत्तांत देऊन ते फाईनल केले पाहिजे.

**प्र. नगरसचिव :-**

म्हणून म्हटल ना हे इतिवृत्तांत लवकरात लवकर शक्य तितक्या लवकर म्हटलेले आहे.

**अनिल सावंत :-**

मागच्या सभेचे इतिवृत्तांत पुढच्या सभेमध्ये यायला पाहिजे. तिथे तशी आहे सचिव विभागाला काम काय आहे. मग असे इतिवृत्तांत होणार नाही ना. उपमहापौर साहेब त्याच्यामुळे होत काय महापौर मॅडम आपण सुध्दा लक्ष द्याव ही आशा करतो.

**मा. महापौर :-**

इतिवृत्तांत मंजूर.

**प्रकरण क्र. ७५ :-**

**दि. २८/०८/२०१७** व **दि. १६/१०/२०१७ रोजींच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**ठराव क्र. ७५ :-**

दि. २८/०८/२०१७ व दि. १६/१०/२०१७ रोजींच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील अनुमोदक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७६, **भाईंदर (पूर्व) नवघर आरक्षण क्र. १०९ या जागेत तरण तलाव बांधणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.**

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम सचिव साहेब याच्यामध्ये सर्व निवडणूका निरंक, सर्व नियुक्त्या निरंक, मध्यप्रश्न निरंक, विनंती अर्ज निरंक, स्थायी परिवहन विशेष समितीचे ठराव निरंक मग निरंक काय? स्थायी समितीचे ठराव का नाही देत महासभेला. काही विषय महासभेशी निगडीत असतात.

**प्र. नगरसचिव :-**

जे शिफारस केले जातात तेच ठराव येणार महासभेपूढे.

**अनिल सावंत :-**

तशी प्रोव्हिजन आहे का? अधिनियमामध्ये असेल तर सांगा ना.

**प्र. नगरसचिव :-**

सर्वच ठराव हे महासभेपूढे येत नाही. स्थायी समितीचे किंवा विशेष समितीचे.

**अनिल सावंत :-**

येत नाही पण त्याचे प्रोव्हिजन काय आहे. अधिनियमामध्ये आहे का? तसे की तुम्ही तुमच्या मनाने ठरवले आहे.

**मा. उपमहापौर :-**

आपल्या आतापर्यंत चौथी महानगरपालिका आले त्यांच्या प्रथांप्रमाणेच चाललोय.

**अनिल सावंत :-**

पण याच्यामध्ये निरंक म्हणू नका. ठराव झाले आहेत मग आम्ही मागणी करु ठरावांची.

**प्र. नगरसचिव :-**

सभागृहापुढे ठेवलेले नाहीत म्हणून निरंक म्हटले आहेत.

**अनिल सावंत :-**

मग सभागृहापुढे ठेवायला पाहिजेत ना. सदस्यांनी ठेवले पाहिजेत. स्टॅन्डिंग कमिटीमध्ये सर्व सदस्य असतात. महासभेपूढे सर्व ठेवले पाहिजेत.

**मा. उपमहापौर :-**

सर्व पक्षाचे सदस्य आहेत. त्यांनी शिफारस केली तरच पूढे पाठवता येते.

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम स्थायी समितीमध्ये सर्व पक्षाचे सदस्य आहेत आणि तौलानिक संख्याबळाप्रमाणे तुमच्या पक्षाचे पण सदस्य आहेत. त्याच्यामुळे तुमच्या सदस्यांनी आलेले ठराव तुम्हाला अवगत केले पाहिजे.

**अनिल सावंत :-**

झालेले ठराव आम्हाला मिळतच नाही. महासभेचे किंवा स्थायी समितीचे विचारायला गेलो तर सांगतात महापौरांनी सही नाही केली. सभापतींनी सही नाही केली.

**दिप्ती भट :-**

उपमहापौर साहेब एक सांगते कारण की स्थायी समितीचे आणि महासभेचे जे ठराव आहेत आपण जे डिटेल त्याच्यामध्ये हे करता की हे मंजूर आहे. पण आम्ही मागायला जातो तेव्हा सचिव साहेब

आम्हाला नाही बोलतात. आणि लेखी पत्र द्या ते हे चुकीचे आहे कारण की एक महिन्यानंतर आम्हाला त्याच्या ठरावाची कॉपी भेटते. आम्हाला लोकांना काही उत्तर द्यायचे असतात.

**मा. उपमहापौर :-**

लेखी पत्र द्यायचे कारणच नाही. ही पध्दतच आहे की मागचे इतिवृत्तांमध्ये त्या सदस्याला पाठवायचे असते.

**दिप्ती भट :-**

पण सचिवांनी सांगितले आहे तस आम्ही पत्र दिलेले आहे. एक महिन्यानंतर आम्हाला लेखी उत्तर भेटली आहेत.

**मा. उपमहापौर :-**

ज्या सदस्यांना आपण पाठवतो तुमचे जे स्थायी समितीचे सदस्य आहेत त्या पक्षाचे त्यांनी ही आपल्या इतर सदस्यांना द्यावेत ना त्याची माहिती.

**दिप्ती भट :-**

साहेब पण आम्हालाच नाही दिली त्यांना कशी देणार माहिती.

**मा. उपमहापौर :-**

इतिवृत्तांत बरोबर येणार.

**दिप्ती भट :-**

महासभेचे पण नाही देत आणि स्थायी समितीची पण नाही देत.

**मा. उपमहापौर :-**

इतिवृत्तांतात बरोबर येणार ठराव पुढचा विषय पुकारलेला आहे.

**दिप्ती भट :-**

पण एवढे फटाफट वाचतात. आम्हाला काही कळतच नाही. मग आम्ही कसे लोकांना सांगणार मग तुम्ही आम्हाला ठरावाची कॉपी देत जा.

**जुबेर इनामदार :-**

सचिव महोदय पोटाचा प्रश्न आहे.

**मा. उपमहापौर :-**

आपण त्यांच्या सभेला येतात. त्यावेळेला हे सगळे विषय चर्चा करतो इनामदार साहेब आणि त्या सभेलाही महापौर असतात.

**जुबेर इनामदार :-**

सचिव महापौरांवर टाकतात म्हणून हा विषय बरोबर नाही. सचिव तुम्ही आम्हाला ठरावाची प्रती का देत नाही. म्हणे महापौरांकडे सहीला आहे. मला अधिनियमामध्ये असे दाखवा कुठे महापौरांची सही लागते ठरावावर, ठराव वाचुन कायम करायला असतो. सद्या कुठे लागतात.

**मा. उपमहापौर :-**

ठरावाची ज्या पिठासिन अधिका-याच्या उपस्थित जी सभा चालते त्या पिठासन अधिका-यांची सही लागते. आपण अनुभवी आहात.

**जुबेर इनामदार :-**

मान्य आहे, साहेब तुमचा बोललेले प्रवचन आम्ही मान्य करु. मात्र त्याचा आम्हाला कायद्यात आहे तस सांगा. कायद्यात बोला साहेब.

**मोहन म्हात्रे :-**

**मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेत भाईंदर (पूर्व) येथे गोपीनाथ मुंडे क्रिडा संकुल यामध्ये तरण तलाव सुरु करुन नागरीकांकरीता खुला केलेला आहे.**

**सन 2017-18 या वर्षाच्या अर्थसंकल्पात "तरण तलाव बांधणे व सुशोभिकरण करणे " या लेखाशिर्षात रु.2.00 कोटी रकमेची तरतुद करण्यात आलेली असुन सदर लेखाशिर्षातुन यापुर्वी राष्ट्रीय महामार्ग क्र.8 वर लोढा ॲमिनिटी ओपन स्पेसच्या जागेत तरण तलाव बांधणे कामाच्या खर्चास मा.महासभेने प्रशासकिय व आर्थिक मान्यता दिलेली आहे . तथापि सदर कामाबाबत पुढील प्रक्रीया करण्यात आलेली नाही.**

**तरी प्रथमत: सदर काम अर्थसंकल्पा तील तरतुदीनंतर हाती घ्यावे ते पूर्ण करावे त्यानंतर आरक्षण क्र.109 या जागेत तरण तलावाचा विचार करण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.**

**हसमुख गेहलोत :-**

माझे अनुमोदन आहे.

**दिनेश नलावडे :-**

सर्वप्रथम मी महापौर मॅडम आपल अभिनंदन ह्यासाठी करतो की हा विषय तुम्ही दोन महिन्यांपूर्वी आलेला परंतु बाजूला ठेवला पण ह्या महासभेत आणलात महासभेत आणून देखील परत विचार करण्यात यावा असा ठराव परत ह्या ठिकाणी येतो. महापौर मॅडम मी आपल्याला सांगतो ह्या शहरामध्ये २०११ च्या गणनेनुसार लोकसंख्या ८ लाख ९ हजार त्याच्यानंतर ही पाच सहा वर्षे आणि आजची लोकसंख्या गेली १५ लाखावरती महापौर मॅडम ह्या शहरामध्ये महानगरपालिकेतर्फे किती तरणतलाव निर्माण केलेली आहेत. फक्त एक तरण तलाव आहे. स्पोर्टस कॉम्पलेक्समध्ये ती अजून सुरु नाही तर आज सर्व साधारण मी महापौर मॅडम आपले लक्ष वेधू इच्छितो की ह्या शहरामध्ये जे व्यवस्थित ज्यांचे आर्थिक बाजू मजबूत आहे ते क्लबमध्ये जाऊन त्यांची मुल वगैरे तिकडे तरणतलावामध्ये जाऊन पोहायला शिक्षण घेतात. सर्वसाधारण लोक जे आहेत गोरगरिब जनता आहे मध्यम वर्ग त्यांच्यासाठी महानगरपालिकेतर्फे तरण तलाव होणे फार गरजेचे आहे का त्याच्यामुळे आपण ह्या शहरामधून काही घेत नाही का? पण त्यांच्यासाठी तरतूद आज हा विषय आल्यानंतर पुन्हा कुठला विचार करायचा बाकी आहे. महापौर मॅडम हा लोढा कॉम्पलेक्समध्ये २०१७-१८ साठी तरतुद केलेला विषय होता. महानगरपालिकेने तरण तलाव सुशोभिकरण करण्यासाठी तरतुद केलेली आहे. त्या तरतुदीमध्ये उपमहापौर साहेब आमदार सरनाईक साहेबांच्या निधीमधून एक कोटीचा निधी आहे. महानगरपालिकेचा एक कोटीचा निधी आहे राखीव आहे. तो निधी गेल्या २०१७ च्या शिर्षकाखाली खर्च झालेला नाही. मग तो आता २०१८-१९ मध्ये हा विषय आलेला आहे. तर भल्या आजच्या महासभेमध्ये मंजूरी का मिळू नये हे मला विशेष वाटतेय काय कारण आहे. महापौर मॅडम आम्हाला माहिती नाही हा विषय तुम्ही पास करणार परंतु लोकांची दिशाभूल करण्यासाठी मग हा विषय आज महासभेमध्ये आणला का तरण तलावासाठी पेपरमध्ये आले सर्व काही झाल मला उत्तर कळत नाही की हा विषय येवून परत अगोदर विषय घेतला नाही आणि आज विषय आला तर तरतूद करायची, तरतूद ऑलरेडी आहे. २०१७-१८ मध्ये तरतूद केलेली आहे आणि तीच तरतूद आता परत आपल्याला ठेवायची आहे. नविन तरतुद करायची २०१८-१९ ची तरतुद करायची गरज नाही मॅडम तरतूद अगोदर झालेली आहे. मग ह्याला आज मंजुरी का मिळू नये. जर आपल्याकडून उत्तर आले मॅडम तर आमचे जरा समाधान होईल.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम नवघरमध्ये तलाव नको अशी पालिकेची किंवा सत्ताधाऱ्यांची भूमिका आहे का? तिथे तलाव नाही बांधायचा प्रशासनाने अंदाजपत्रक तयार केलेला आहे आणि आर्थिक आणि प्रशासकीय फक्त मान्यता द्यायची आहे. मग तिथे परत गोलगोल करुन हा विषय पुढे ढकलतात की तलाव तिथे नाही बांधायचा कारण काम तिथले लोक काय टॅक्स भरत नाही. त्यांना सोयी सुविधा नकोत का?

**दिनेश नलावडे :-**

दाटीवाटीची वस्ती आहे. महापौर मॅडम आपल्याला सांगतो हा विषय आयुक्त साहेबांनी दिलेला आहे. पहिले आयुक्त डॉ. नरेश गिते साहेबांमार्फत हा विषय आला. मा. आयुक्त साहेब महापौर मॅडम माझी एक विनंती आहे सभागृहाला आणि आपल्या सर्वांना की शहराचा विकास करताना सत्ताधारी म्हणून विचार नाही केला पाहिजे. ह्या शहराचा विकास झाला पाहिजे. ह्या इच्छेने आपण विषय आणा आणि हे विषय आणल्यानंतर त्याचे विकास कार्याचे कामे सत्ताधाऱ्यांची आहेत. परंतु अशा पध्दतीने गोलमाल करुन दिशाभुल करुन विषय आणायचा आणि पुढे ढकलायचा इथे योग्य वाटत नाही महापौर मॅडम जरा आपण विषयाला आम्हाला उत्तर दिल तर बर पडेल. आपण जरा विषय द्या.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम ३०/०३/२०१५, २३/०३/२०१५ रोजीची तहकुब सभा ह्या सभेत आयुक्त महोदय आम्ही ठराव करुन दिलेले प्रकरण ८२, ठराव क्र. ९० मौजे महाजनवाडी सर्व्हे क्र. १०७ एक पै ८,१,२,३,४,१०९,२३, २४,२५,२६,२७,२८,११० पाच पै ह्या जागेमध्ये नागरी सुविधा क्षेत्रात भुखंडावर तरण तलाव आर्ट गॅलरी बांधणे कामास मान्यता देणे. ॲमिनिटी ओपनचे नागरी सुविधा क्षेत्रामध्ये हा तरण तलाव विषयी ठराव झाला. सत्ताधाऱ्यांनीच केलेला. आज त्याची काय दिलेल्या गोषवाऱ्यांमध्ये जागेचा वाद निर्माण झाला स्पष्टीकरण तरी द्याना की काय झालं. कारण की गोषवाऱ्यामध्ये नाही कोणाकडे उत्तर आहे का?

**सुरेश खंडेलवाल :-**

साहेब ह्याची जरा माहिती द्यायला बोलवा ना अधिकाऱ्यांना.

**दिनेश नलावडे :-**

साहेब जरा अधिकारी साहेबांना बोलवून उत्तर मागितल तर बर पडेल. प्रभात ताई हा विषय एका वॉर्डाचा नाही हा नवघरचा विषय आहे. सर्वसामान्य जनता तिथे आहे. ही सगळ्यांची मागणी झाली पाहिजे एकच तरणतलाव होते. गोरगरीब जनतेसाठी याची मागणी आज इथे हा विषय आलेला आहे. त्याच्यामध्ये महापौर मॅडम, आपण धडपड करा आणि ह्या विषयाला मंजूरी घ्या. हा तुमचा आमचा सगळ्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे.

**जुबेर इनामदार :-**

खरतर असा होता आम्ही गोषवारा ठराव सुध्दा करुन आणला नाही. आम्हाला वाटलं तुम्ही करणार.

**सुरेश खंडेलवाल :-**

साहेब बोलवल का? महापौर मॅडम विषय असा आहे की जागेचा जो वादाचा विषय आता ह्याच्यामध्ये गोषवाऱ्यामध्ये प्रशासनाने दिलेला आहे. पहिले अधिकाऱ्यांना बोलवून क्लिअर करुन घ्या. लोढा कॉम्पलेक्समध्ये जागेचा फक्त आपल्याच तलावाला आहे. बाकीचे तलाव ओ.सी. सर्व परवानगी त्याचे अजून चालूच आहे. म्हणून जरा पहिले डिटेलमध्ये जरा माहिती द्यायला लावा की आता जागेचा कुठला वाद आहे. आता नुकताच त्याला ओ.सी. देण्यात आलेली आहे. लोढाला जागेचा वाद असुन सुध्दा आपल्या ॲमिनिटी ओपन स्पेसला जागेचा वाद आहे बाकीचे सर्व परवानगीचे चालू आहे. आता नुकताच त्यांनी ओ.सी. करुन घेतलेली आहे. विचारा टाऊन प्लानिंग डिपार्टमेन्टला मग ते आपले ओपन ॲमिनिटी स्पेस हँड वर्क करत नाही. त्याच्यामध्ये त्यांनी वाद निर्माण करुन टाकला आहे आणि बाकीच दुसरं कारभार चालू आहे साहेब जरा त्यांना सांगा.

**मा. महापौर :-**

माहिती द्या.

**दिपक खांबित :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो लोढा ॲक्वा इथे जे ॲमिनिटी ओपन स्पेस आहे ह्याच्यामध्ये आपण एक शाळेला परमिशन दिलेली होती. त्या ॲमिनिटी ओपन स्पेसमध्ये परंतु हा वाद न्यायालयामध्ये गेल्यामुळे आणि स्थगिती असल्यामुळे तिकडचा काम बंद आहे. आणि त्याच जागेमध्ये ५० टक्के ओपन जागा ठेवायची आहे. त्याच्यामध्ये स्वीमिंगपूल बांधण्यासाठी आपण इस्टीमेट तयार केले होते. त्याला महासभेने मंजूरी दिलेली आहे. परंतु हा वाद कोर्टामध्ये असल्यामुळे आम्ही त्याचा पुढचे टेंडरमध्ये काढून प्रोसिजर केली नव्हती.

**सुरेश खंडेलवाल :-**

मग साहेब आपला लिगल डिपार्टमेंट काय करतो. विषय असा आहे की साहेब आपले जे ॲमिनिटी ओपन स्पेसला ते बिल्डर घेवून जातो कोर्टामध्ये आणि त्याचे बाकीचे विषय क्लिअर करुन आणतो. मग ह्याचा होणार काय? साहेब विषय असा आहे.

**दिनेश नलावडे :-**

खंडेलवालजी तो विषय संपुष्टात आला तुम्ही आता जो विषय घेता ना हा तर कोर्टामध्ये वाद आहे. गोषवाऱ्यामध्ये आपल्याला विषय आलेला आहे. त्या संदर्भामध्ये तुम्ही उत्तर द्या.

**सुरेश खंडेलवाल :-**

विषय असा आहे की कोर्टामध्ये बिल्डरला जाण्याचा जो मार्ग आपण मोकळा करुन ठेवतो ना मी त्याच्यासाठी बोलतो. विषय असा आहे की पाच हजार मीटरचा ओपन ॲमिनिटीज स्पेस होता अडीच हजार अडीच हजार दोन पार्ट होते. त्याच्यामध्ये आपण एफ.एस.आय. त्याला एकचमध्ये देवून टाकली म्हणून आता बिल्डर कोर्टामध्ये विषय असा आहे कोर्टामध्ये जाण्याचा रिझन काय सर्वांना माहित आहे का नाही आपण जे ॲमिनिटी ओपन स्पेस साहेब पहिले आपल्याला डेव्हलप करुन घ्यायची असते नंतर बिल्डरला परवानगी द्यायची असते. पण आपण ते न करुन घेता बिल्डरचा मार्ग मोकळा ठेवता तो जातो कोर्टामध्ये आपण कोर्टामध्ये बस फिरत राहायचं आणि त्यांनी त्याची बिल्डींग बांधून त्याचे एफ.एस.आय. वापरुन त्यांनी त्यांची ओ.सी. मोकळा. आता करायच आपण सध्या आमचे म्हणणे एकच आहे.

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम आज खंडेलवालजी जे बोलत आहेत ठीक आहे तो वाद कोर्टामध्ये आहे. आताचा त्याचा वाद आहे चालू आर्थिक वर्षामध्ये २०१८-१९ च्या आर्थिक वर्षात त्याला मंजुरी द्या आणि आता जो गेल्या वर्षाचा आपला २०१७-१८ चा जो आहे त्याला मंजुरी द्या ना उपमहापौर साहेब.

**सुरेश खंडेलवाल :-**

मा. आयुक्त महोदय विषय असा आहे.

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम हा विषय पुढे ढकलायचा विषय कारण काय?

**सुरेश खंडेलवाल :-**

नलावडे साहेब मी तुमच्या बरोबर आहे पण मला असे विचारायचे आहे आयुक्त महोदय की आता खांबित साहेबांनी जसे सांगितल की कोर्टामध्ये न्यायालयामध्ये मॅटर आहे पण मला असे विचारायचे आहे की न्यायालयाने काहीतरी स्थगिती आदेश दिलेला आहे का? न्यायालयामध्ये मॅटर कोणी पण घेवून जाऊ शकतो. पण न्यायालयाचा असा आदेश आहे का की तुम्ही तरण तलाव बांधू शकत नाही. असे काही असेल तर आम्हाला दाखवा आम्हाला सांगा. साहेब इसकी ऑर्डर नही है। विषय असा आहे की कोर्टामध्ये आहे, न्यायप्रविष्ठ आहे. फक्त तेवढे सांगून मोकळा मला फक्त असं विचारायचं आहे की आपल कोर्टामधून स्टे ऑर्डर आली आहे की तुम्ही त्या जागेवरती तरण तलाव बांधायचे नाही.

**दिपक खांबित :-**

जे ॲमिनिटी ओपन स्पेस आहे त्याच्यावरती शाळेला परमिशन दिलेल आहे त्याच्यावर स्थगिती आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

शाळेच्या परमिशनला स्थगिती आहे ना. तरण तलावाला कुठे स्थगिती आहे?

**दिपक खांबित :-**

ॲमिनिटी ओपन स्पेस तिच आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

साहेब अस नाही अर्ध बघा कस आहे माहिती आहे की हे जे विषय आहेत ना आयुक्त साहेब मला एकच म्हणायचे आहे की त्या शाळेला जी परमिशन दिली होती त्याला स्थगिती आहे. पण आपण तरण तलाव किंवा महासभेचा आपला जो धोरण आहे त्याला स्थगिती कुठेच नाही. फक्त न्यायप्रविष्ठ आहे म्हणून आपण सोडल आहे. चला ठिक आहे मी मानतो पण बाकीचे तिचे जी परवानगी आहे. तुम्ही लोढाला थांबवली का? तो आपला कोर्टामध्ये जाऊन त्यांनी आपल्याला ओल्डाप केले आणि बाकीच काम चालुच आहे. तर त्याच्यामध्ये कुठे ते आपण अंकुश ठेवणार आहेत.

**दिपक खांबित :-**

साहेब तपासून घेऊ एकदा.

**सुरेश खंडेलवाल :-**

ह्या विषयावर आयुक्त महोदय निट चौकशी करुन की लोढा जे जे आपण परवानगी किंवा टाऊन प्लानिंग डिपार्टमेंटने त्याला जे जे सहकार्य केलेले आहे ते आपल्याला आपले जे ओपन स्पेस आहे ना ते का मुळे रखडलेला आहे त्याची आपण जरा चौकशी करुन मग त्याच्यापुढे हे डिसीजन द्या. न्यायप्रविष्ठ आहे हे सांगुन आपण मोकळ होऊ शकत नाही.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम खंडेलवाल साहेबांनी जे सांगितले ही वस्तुस्थिती आणि त्यांनी मोहनजीने मांडलेला ठराव परस्पर भिन्न आहेत. एका बाजुने आपण बिल्डर कोर्टामध्ये आहे हे आपल्याला स्टे मिळालेला आहे म्हणून भांडतो आणि ह्या ठिकाणी पालिकेचा फंड डायर्व्हट करुन तिथे तरण तलाव बांधतो. म्हणजे एकप्रकारे त्याला आपण मदत करतो. ठरावामध्ये त्यांनी काय म्हटले आहे हा फंड ट्रान्सफर करायचा. लोढा ॲक्वामध्ये ठराव बघा.

**सुरेश खंडेलवाल :-**

आमचा विषय एवढाच आहे. ठरावाला धरुन बोलतोय मी.

**मा. उपमहापौर :-**

ठराव मुळात काय आहे बघितला का? तुम्ही नीट ऐकलं नाही.

**अनिल सावंत :-**

ठरावामध्ये सांगा काय म्हटले आहे. मान्यता असेल तर आम्ही चर्चा करत नाही.

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम, ठरावाला भारतीय जनता पार्टीचा विरोध नाही. भाईंदर पूर्व इथे तरण तलाव झाला पाहिजे ह्यावरती दुमत पण नाही. आणि भाईंदर पुर्वेला ऑलरेडी तरण तलाव आपण दिलेला आहे. स्पोर्टस् कॉम्पलेक्सने तरण तलाव सुरु आहे नलावडे साहेब तुमच्या माहितीसाठी सांगतो.

**दिनेश नलावडे :-**

मी बोललो एकच चालू आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम प्रत्येक विषयावरती एका सदस्यांनी एक लिमिटेड स्पीडमध्ये बोलले पाहिजे त्यांनी आपली बाजू मांडली पाहिजे तरच पुन्हा कॉस्ट शेरींग आणि हे कोर्टासारखं नाही ना. एकदा त्यांनी बाजू मांडली तर त्यांनी बसायला पाहिजे. आता आम्ही बोलतो तुम्ही ऐकून घ्या. महापौर मॅडम विषय असा आहे की भाईंदर पूर्व इथे नवघर इथे तरण तलाव बांधण्यासाठी भारतीय जनता पार्टीच ऑब्जेक्शन नाही. ठरावामध्ये स्पष्ट म्हटले आहे त्यानंतर आरक्षण क्र. १०९ ह्या जागेत तरण तलावाचा विचार करण्यात यावा असे स्पष्ट म्हटले आहे. म्हणजे आमचा विरोध याच्यामध्ये नाही. फक्त प्रशासनाने जी वस्तुस्थिती आपल्याला गोषवाऱ्यामध्ये दिलेली आहे ती चुकीची दिलेली आहे. जुबेरजी, अनिल सावंतजी, नलावडे साहेब तथापि सदर जागेबाबत वाद निर्माण झाला आहे. सदर कामात पुढील प्रक्रिया करण्यात आलेली नाही. ज्यावेळी सभागृह मंजुर करते. इथे तरण तलाव बांधला पाहिजे. आणि जर वाद निर्माण होतो तो वाद प्रशासनाने महासभेपुढे आणला पाहिजे. आणला पाहिजे की नाही आणला पाहिजे. आणला पाहिजे पण आणला नाही. सभागृहाने विरोधी पक्ष आणि सत्ताधाऱ्यांना आपापसामध्ये लावून दिलेली आहे आणि तुम्हाला कळत नाही. भांडतो इथे आपण काय गरज आहे भांडायची आम्ही विरोध केला नाही आणि ह्याच्यामध्ये स्पष्ट म्हटले आहे की जिथे जो प्रकार चालला आहे मा. आयुक्त साहेब खंडेलवालजी जे व्यवस्थितपणे तुम्हाला मुद्देसुदपणे बाजू मांडलेली आहे ॲक्च्युअली याच्यामध्ये जर डीपमध्ये आपण विचार केला चौकशी केली साहेब ह्याच्यामध्ये बिल्डरने चुकीचे केलेले आहे. आपल्या इथे तो तरण तलाव बांधुन देऊ शकतो. आणि तो जर बांधून देत नसेल तर त्याची परवानगी स्टॉप केली पाहिजे. त्याची ओ.सी. कॅन्सल केली पाहिजे आणि साहेब त्यांना परवानगी देताना त्यांना जास्त एफ.एस.आय. दिलेला आहे. अशी आमची माहिती आहे. म्हणून साहेब तुम्ही चौकशी करा आणि इथे तरण तलाव झाला पाहिजे याबद्दल दुमत नाही. परंतु जे आपण काम पहिले हाती घेतले आहे ना ते पूर्ण करा पहिले. नाहीतर ते पण काम अर्धवट आणि हे पण अर्धवट काम राहायला नाही पाहिजे. आम्ही ठराव केलेला आहे आणि बाजूने केलेला आहे. जर यांचा ठराव असेल तर ठराव करावा.

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम ठराव होईल आम्हाला ही माहिती आहे. ज्यावेळेला हा विषय आलेला आहे. ह्या महासभेत मंजुरी मिळेल परंतु धृवकिशोरजी जे बोलले की तिकडे वाद होता आणि तो प्रशासनाने महासभेत द्यायला पाहिजे होता. धृवजी गेल्या टर्ममध्ये कोणाची सत्ता होती ह्याठिकाणी हा ज्यावेळेला तरण तलाव तिकडे मंजुर झाला शिवसेना, बी.जी.पी सत्तेत होती ना तेव्हा का नाही हा विषय आणला महासभेमध्ये. .तुम्ही आज का मांडत आहेत की सभेपुढे आणायला पाहिजे होता. वाद आणि तुम्ही आज बोलता धृवजी दुतोंडी बोलू नका. इमानदारीने बोला तुम्हाला तर विषय पास करायचा नाही महापौर मॅडम मी एकच बोलतो. मा. आयुक्त साहेब आज आपल्या प्रशासनातर्फे हा विषय आलेला आहे. आज मला एवढेच द्या कारण मा. आयुक्त साहेब की हा विषय पुढे ढकलण्याचा कारण काय? मला याचे उत्तर द्या. आम्हाला उत्तर द्या.

**अनिल सावंत :-**

ठरावाची कॉपी तर द्या.

**स्नेहा पांडे :-**

महापौर मॅडम मैं प्रशासन से पुछना चाहती हूँ की न्यायप्रविष्ठ है तो प्रशासन की तरफ से गोषवारा क्या आया।

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम नवघरच्या जनतेला रस्त्यावरती उतरावे लागेल भेदभाव कराल तर भाईंदर पूर्वची जनता रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही. विषय येऊन जर तुम्ही पुढे चालढकल करत असाल तर नवघरची जनता पक्ष बघणार नाही कुठलाच अन्याय होत असेल तर जनता रोडवरती उतरेल.

**स्नेहा पांडे :-**

महापौर मॅडम गोषवारा प्रशासन की तरफ से आया है। अगर यह विषय न्यायप्रविष्ठ है तो उसमें हम काम नही कर सकते तो प्रशासनने ऐसा विषय लाया ही क्यों? तो यहाँ कर सकते है और महासभा सर्वानुमते मंजूर करती है अगर तो प्रशासन वहाँ पे तरण तलाव बांध सकता है क्या? यह उनसे जवाब पुछीए आप ऐसे विषय क्यों लाते है जो कर नही सकते। हम लोग महासभा में परमिशन भी देंगे तो प्रशासन बांध सकती है क्या हम लोग लढते है।

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

काही तरी गौडबंगाल आहे. हा फंड ट्रान्सफर करण्याचा विषय आहे असा आमचा स्पष्ट आरोप आहे.

**मा. महापौर :-**

तुमचा ठराव असेल तर मांडा.

**प्रविण पाटील :-**

महापौर मॅडम तुमचा उद्देश आहे तोच समजत नाही आम्हाला. एका वेळेला ठराव करता एका बाजूला बिल्डरची बाजू घेता की विरोधात बोलता तुमच्या ठरावाच्या किंवा ह्या विषयाचा उद्देशच समजत नाही आम्हाला.

(सभागृहात गोंधळ)

**दिनेश नलावडे :-**

आम्हाला कारण द्या महापौर मॅडम ह्या ठरावाचे काय आम्हाला उत्तर द्या.

**धृवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेत भाईंदर पूर्व येथे गोपिनाथ मुंडे क्रिडा संकुल ह्यामध्ये तरण तलाव सुरु करुन नागरिकांकरिता खुला केला आहे. भाईंदर पूर्व येथील नागरिकांसाठी गोपिनाथ मुंडे क्रिडा संकुलामध्ये तरण तलाव बांधून नागरिकांकरिता खुला केला आहे. साहेब २०१७-१८ ह्या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरण तलाव बांधणे व सुशोभिकरण करणे ह्या लेखाशिर्षात रुपये दोन कोटी रक्कमेच्या तरतुद करण्यात आलेली असून सदर लेखाशिर्षातून यापूर्वी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ८ वर लोढा ॲमिनिटी ओपन स्पेसच्या जागेत तरण तलाव बांधणेच्या कामास मा. महासभेने प्रशासकीय व आर्थिक मान्यता दिलेली आहे. तथापी सदर कामावर पुढील प्रक्रिया करण्यात आलेली नाही. तरी प्रथम सदर काम अर्थसंकल्पीय तरतुदीनंतर हद्दी घ्यावे ते पूर्ण करावे त्यानंतर आरक्षण क्र. १०९ ह्या जागेत तरण तलावाचा विचार करण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**दिनेश नलावडे :-**

सभापती महोदय मग ह्याच्यात तो विषय का नाही आला. मग हा विषय आणला मंजुरीसाठी मा. आयुक्त आपल्या प्रशासनाकडून मंजुरीसाठी हा विषय आलेला आहे. चुकीचे मार्गदर्शन ते करत आहेत. फक्त मंजुरीसाठी विषय आला.

**जुबेर इनामदार :-**

खरतर महापौर मॅडम आम्हाला वाटल होत प्रशासनाने एवढा सुंदर गोषवारा दिलेला आहे. आम्ही ठराव सुध्दा आणलेला नाही.

**प्रविण पाटील :-**

महापौर मॅडम एक गोष्ट सांगतो म्हणजे ह्या शहरामध्ये एकमेव असलेल स्व. गोपिनाथ मुंडे म्हणजे स्पोर्ट्स कॉम्पलेक्समध्ये तरण तलाव आहे. ते आपण ठेक्याने दिले आहे. बरोबर आणि त्याचे भाव जरा बघा काम आहेत त्या तरण तलावमध्ये जाण्याचे आपण एखादी सुविधा या शहराला देतो ती सर्वसामान्य नागरिकांना गरिबांना देण्यासाठी देतो. आज सर्वसामान्य गरिब माणूस त्या तरण तलावामध्ये जाऊ शकत नाही. सात ते आठ, दहा हजारापर्यंत भाव आहेत. तरण तलावाचे बारा हजार भाव आहेत आज फक्त पोहायचे १२ हजार सर्वसामान्य गरीब माणूस देऊ शकत नाही. आज हा विषय आम्ही आणलेला आहे त्यांनाही पक्क माहित आहे. त्या लोढाच्या ओपन ॲमिनिटी स्पेसमध्ये असा ठराव झाला. अशी परिस्थिती आहे की तिथे तरण तलाव होऊ शकत नाही. मा. आमदार प्रताप सरनाईक यांनी १०९ आरक्षणामधील जी जागा आहे त्या जागेची पूर्ण माहिती घेतली. महानगरपालिकेमध्ये आर्थिक प्रशासकीय मंजुर करुन बजेटमध्ये त्याची तरतुद करुन घेतली. मागच्या सभेमध्ये आणि आजच्या तारखेला मा. आयुक्त गिते साहेबांनी ह्या आजच्या सभेमध्ये तो सगळा अभ्यास करुन ठराव मांडलेला आहे. आम्हालाही वाटल की हा सर्वानुमते ठराव होईल. परंतु आज इथे बघितल्यानंतर अस जाणवल की भाईंदर पूर्वेला किंवा नवघरच्या विभागात तरण तलाव होऊ द्यायचे नाही असा तुमचा मानस दिसतो. म्हणजे जाणूनबुजून काही तरी खोड घालण्याचा प्रयत्न आहे. सत्ताधारी तुमच्याकडून होत आहे असे समजत मला. गरज काय आहे त्या विषयाला खोड घालण्याची. तुम्हाला आर्थिक तरतूद मा. आमदार प्रताप सरनाईक साहेब माझा फंड द्या. आमदार फंड द्यायला तयार आहेत. फंड काही तरी महानगरपालिकेची आहे. बजेटमध्ये तरतुद आहे आणि सर्व मा. आयुक्तांनी प्रशासनाने सर्वांनी विचार करुन हा प्रस्ताव आणला आहे मॅडम म्हणून आजचा हा ठराव आपण ह्याच्यामध्ये कुठल्याही प्रकारचे राजकारण नाही. ह्यामध्ये सर्वसामान्य गरीब जो माणूस किंवा

सर्वसामान्य विद्यार्थी आहे ते सगळे त्याच्यामध्ये त्याचे उपभोग घेतील म्हणून मॅडम आपल्याला विनंती आहे आणि सत्ताधाऱ्यांना पण विनंती आहे की हा ठराव किंवा केलेला ठराव परत मागे घेऊन हा प्रस्ताव मंजूर करुन घ्यावा अशी आपल्याला विनंती आहे.

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम सर्व सभागृहाची भावना लक्षात घ्या आणि हा विषय मंजुरीला घ्या. तुमच्या अधिपत्याखाली मंजुरीला घ्या.

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम सन्मा. सदस्य आपले मित्र प्रविण पाटील यांनी सांगितले की तिथे ७ हजारचा रेट आहे. मॅडम १२ हजारांचा रेट आहे. फक्त पाच हजार रुपये म्हणजे महिन्याला फक्त ॲप्रॉक्सीमेटली ४८० रुपयाच्या आसपास आहे. स्विमींग पुलचा फक्त ५ हजार रुपये आहे तरण तलावाचा.

**प्रविण पाटील :-**

स्विमींगसाठी देतच नाही. माहिती घ्या आपण ठराव केलेला आहे तो.

**धृवकिशोर पाटील :-**

जर तुम्ही सन्मा. नगरसेवक आहात तर तुम्ही ह्याच्यामध्ये आवाज उठवायला पाहिजे.

**प्रविण पाटील :-**

आवाज उठवतो ना. म्हणून पर्यायी रस्ता दिला तुम्हाला.

**धृवकिशोर पाटील :-**

आपल्याला वाटते चुकीच काम करतो तर यांनी तक्रार केली पाहिजे मॅडम. १२ हजार रुपये रेट नाही आणि हा सर्वसामान्य लोकांना परवडणार आहे आणि जर तुम्हाला तसे वाटत असेल तर ह्या कॉन्ट्रॅक्टरला विचारा ना तुम्ही जास्त पैसे घेता म्हणून.

**प्रविण पाटील :-**

तो ठराव आपणच केला आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्तांना अधिकार दिलेले आहेत. तुम्ही आणि भारतीय जनता पार्टी आणि शिवेसना ह्या दोघांनी केलेला आहे आणि त्यावेळी म्हणून आयुक्तांना अधिकार दिलेले आहेत.

**प्रविण पाटील :-**

आपण शब्द आला त्याच्यामध्ये.

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम साधकबाधक चर्चा झालेली आहे. कृपया ठराव मंजुर करावा.

**दिनेल नलावडे :-**

ह्या जागेत कसलाही वाद नाही मग हा विषय पुढे ढकलला जातोय जाणूनबुजून.

**प्रविण पाटील :-**

ह्याचा अर्थ असा आहे की तुम्हाला तरण तलाव होऊ द्यायचा नाही.

**दिनेश नालवडे :-**

स्पष्टपणे आरोप आहे की सत्तेचा गैरवापर चालू आहे आणि लोकांमध्ये भेदभाव करुन हा अन्याय लोकांवरती तुम्ही लादता आहे. जनतेवरती आणि ती जनता हे सर्व बघत आहे मॅडम.

**प्रविण पाटील :-**

हा विषय तुम्ही घेतला तुम्ही आज धुडकावत आहेत.

**दिनेश नलावडे :-**

नवघरची जनता तुम्हाला देखील महापौर मॅडम विचारेल की महापौर मॅडम कुठे जात नाही सगळ्या एरियामध्ये जातात त्या-त्या ठिकाणी प्रश्न विचारला जाईल.

**सुरेश खंडेलवाल :-**

महापौर मॅडम विषय आहे की तरण तलाव नवघरमध्ये होणार आणि आम्ही करुन देणार. तुम्हाला मी वचन देतो महापौर मॅडम हमारे सन्मा............

(सभागृहात गोंधळ)

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम तुमच्या हातामध्ये आहे. हा प्रश्न तुम्हाला विचारणार. तुमच्या हातात आहे पास करायचा की नाही.

**सुरेश खंडेलवाल :-**

हमारे सन्मा. सदस्य को यह गलतफहमी है की नवघर रोड में तरण तलाव बनाने में हमारा किसी भी तरह का कोई विरोध नही है।

(सभागृहात गोंधळ)

**दिनेश नलावडे :-**

विषय असा आहे ठराव फक्त मंजुरीसाठी आणावा.

**सुरेश खंडेलवाल :-**

विषय ऐसा है की यही विरोध होता तो आपने अधिकार में इस सब्जेक्ट को महासभे में लाया है। विरोध नही है इनको समझ में नही आ रहा है। करेंगे नवघर रोड पे तरण तलाव बनेगा बनेगा।

(सभागृहात गोंधळ)

**दिनेश नलावडे :-**

खंडेलवालजी महापौरांचा तुम्ही अधिकार घेतला का बोलायला.

**सुरेश खंडेलवाल :-**

बनेगा मतलब हमारी सब की इच्छा है।

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य डॉ. नरेश गिते साहेबांच्या निवेदनावरती आपण चर्चा करत आहेत. त्यांच्या निवेदनास स्वयंस्पष्ट म्हटलेले आहे की तरतुद लोढा ॲक्वाच्या तिकडच्या ह्याच्यामध्ये मंजुर केली होती आणि आता ही तरतुद ह्या ठिकाणी आहे त्याची आर्थिक प्रशासकीय तरतुद मागच्या सभेला घेतलेली आहे. आमच्या ठरावात कुठेही असा उल्लेख नाही की नवघरच्या ह्या रिझर्व्हेशनमध्ये तरण तलाव असू नये. काय लिहीलेले आहे प्रथमतः सदर काम अर्थसंकल्पातील तरतुदीनंतर हाती घ्यावे ते पूर्ण करावे.

**अनिल सावंत :-**

महाजनवाडीच म्हणत आहेत तुम्ही. महाजनवाडीला बिल्डर बांधून देणार तिकडे पैसे घालू नका. पालिकेचा पैसा बिल्डरच्या घशात कशाला घालता तुम्ही.

**मा. उपमहापौर :-**

ज्या कारणासाठी एका वेळेला तुम्ही त्या बिल्डरसाठी भांडत होता आज त्याच्या विरोधात.

**अनिल सावंत :-**

पालिकेचा पैसा बिल्डरच्या घशात का घालता तुम्ही.

(सभागृहात गोंधळ)

**सुरेश खंडेलवाल :-**

आपण जी तरतुद केलेली आहे. मी पहिले पण बोललो की लोढामध्ये जे आपण ॲमिनिटी ओपन स्पेसचा आहे. ते का नाही बनवलं त्याचे काय झाले.

**मा. उपमहापौर :-**

आर्थिक प्रशासकीय मंजुरी महासभेने दिलेली आहे. आणि आता पुन्हा महासभेकडे तरतुद बदलण्यासाठी परवानगी मागतो.

**जुबेर इनामदार :-**

ज्या महासभेने तरतुद केली की आर्थिक प्रशासकीय मंजुरी खंडेलवाल साहेबांनी तेव्हा त्याचा विरोध केला होता. धृवकिशोर साहेब इथे बसलेले आहेत त्यांनी सुध्दा विरोध केलेला आहे.

**मा. उपमहापौर :-**

ती चुक त्यांना आता लक्षात आली आहे म्हणून ते समर्थन करतात. स्पोर्टस कॉम्पलेक्सचा तरण तलाव किंवा एक महाजनवाडीचा तरण तलाव किंवा नवघरचा एक तरण तलाव असा भाग राहिलेला नाही. ह्या शहरामध्ये सुसज्य असे ५ ते ६ तरण तलाव बांधण्याचा आमचा मानस आहे आणि तो आम्ही पूर्ण करणार.

**प्रविण पाटील :-**

मग कशाला विरोध करता? पालिकेच्या ताब्यात जागा आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

आम्ही कराच्या हितामध्ये निर्णय घेतला आहे. हा ठराव तुम्हाला मान्य नसेल तर तुमचा ठराव मांडा तुम्ही.

**दिनेश नलावडे :-**

उपमहापौर साहेब तुम्ही ७ नाही तुम्ही १० तरण तलाव बांधा. पण आज विषय महापौर मॅडम विषय सभागृहात आल्यानंतर.................

**प्रविण पाटील :-**

विरोध तुम्हीच करता तरण तलावाला आम्ही नाही करत. तरण तलावाला विरोध तुमचा आहे असे स्पष्ट सांगा.

**मा. महापौर :-**

ह्या विषयाला खूप टाईम झालेला आहे. ठराव असेल तर ठराव करा नाहीतर मी मंजुर करते.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब परत एकदा तसेच होत आहे. सत्ताधारी प्रशासनाचा गोषवारा वेगळा आहे. ठराव वेगळा होत आहे. एका बाजूला त्याच्यामध्ये मा. आयुक्तांनी काय म्हटले आहे. भविष्यात सदर काम विकासक प्रमाणपत्राच्या तरतुदीनुसार विकासकाकडून देखील बांधून घेणे शक्य होणार आहे तर तुम्ही विकासकांनी बांधून घेणार आहे.

**मा. उपमहापौर :-**

महासभेने मान्यता दिलेली आहे घ्या ना.

**अनिल सावंत :-**

प्रशासकीय मंजुरी दिलेली नाही. गोषवाऱ्याप्रमाणे नवघरचा तरण तलाव आहे. नवघरच्या तरण तलावाला मान्यता दिलेले आर्थिक व प्रशासकीय.

**प्रविण पाटील :-**

गोषवाऱ्यामध्ये ह्या तलावाला मान्यता दिलेली आहे. तो महाजनवाडीचा तलाव नाही.

**अनिल सावंत :-**

तुमचा विरोध स्पष्ट दिसून येतो. मग तुम्ही स्पष्टपणे कबुल करा की नवघरच्या तरण तलावाला भाजपाचा विरोध आहे. मान्य करतो आम्ही. लोकांची दिशाभूल करु नका.

**मा. उपमहापौर :-**

तुमचा ठराव मांडा. तुमच्या ठरावाच्या विरोधात करणारच आहोत. मग तुमचा ठराव मांडा. आमचा विरोध दिसेल तुम्हाला आम्ही मतदान करणार आहोत. मांडा ठराव.

**अनिल सावंत :-**

तुम्ही कबूल करा तुमचा विरोध आहे.

**दिप्ती भट :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलते दोन शब्द जरा क्लिअर करायचे आहेत. मा. आयुक्त साहेब आम्ही हाऊसमध्ये सगळे नगरसेवक बसले आहोत. आम्ही काही पण काम देतो की कुठले पण काम पास होतात ती पर्सनल लेव्हलवर, पर्सनल पार्टी की पर्सनल लोक बनवतात कारण की आता दोन तीन वेळा अस ऐकल की आम्ही तलाव बांधू, आम्ही करु, आम्ही करु म्हणजे कुठल सगळ्यांनी हाऊसने करणार आहेत. पैसे कुठून येणार आहेत. सत्ताधारी असे चुकीचे नाही बोलत हे चुकीचे शब्द आहेत. नगरपालिकेचे लोकांचे टॅक्सचे पैसे आहेत. महापौरांचे पर्सनल पैसे नाहीत.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सचिव साहेब पुढचा विषय घ्या. तुम्ही पत्र देऊन टाका.

**अश्विन कासोदरिया :-**

महापौर मॅडम हमारे साथ भी नगरसेविका बोल रही है की पहिले की सभा में जो पानी का लाईन डालने का ठराव पास हूआ था स्वयंम बता रहे है की मैंने पास करवाया था।

(सभागृहात गोंधळ)

**दिनेश नलावडे :-**

**मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेत भाईंदर (पुर्व) नवघर गुरुद्वाराजवळ आरक्षण क्र .109 मैदानासाठी राखीव आहे . सदर जागेत तरण तलाव बांधण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीची मागणी असुन सदर ठिकाणी तरण तलाव बांधल्यास सदर भागातील मुलांना तसेच रहीवाशांना चांगली सोय उपलब्ध होऊ शकेल . सदर कामासाठी रु .1,99,33,395/- एवढ्या रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.**

**सन 2017-18 या वर्षाच्या अर्थसंकल्पात ‘तरण तलाव बांधणे व सुशोभिकरण करणे ” या लेखाशिर्षात रु.2.00 कोटी रकमेची तरतुद करण्यात आलेली असुन सदर लेखाशिर्षातुन यापु र्वी राष्ट्रीय महामार्ग क्र.8 वर लोढा नागरी सुविधा केंद्राच्या जागेत तरण तलाव बांधणे कामाच्या खर्चास मा .महासभेने प्रशासकिय व आर्थिक मान्यता दिलेली आहे . तथापी सदर जागेबाबत वाद निर्माण झाल्याने सदर कामाबाबत पुढील प्रक्रीया करण्यात आलेली नाही , भविष्यात सदर का म विकास हक्क प्रमाणपत्राच्या तरतुदीनुसार विकासकाकडुन देखील बांधुन घेणे शक्य होणार आहे . त्यामुळे ‘तरण तलाव बांधणे व सुशोभिकरण करणे” या लेखाशिर्षातुन भाईंदर (पुर्व) नवघर आरक्षण क्र.109 या जागेत तरण तलाव बांधणे कामाच्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**अर्चना कदम :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सचिव महोदय दोन ठराव आले आहेत मतदान घ्या.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७६ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. मोहन म्हात्रे, अनुमोदन श्री. हसमुख गेहलोत. दुसरा ठराव सुचक श्री. दिनेश नलावडे, अनुमोदन श्रीम. अर्चना कदम.

**अनिल सावंत :-**

सचिव साहेब ठराव वाचा. पत्रकार आहेत, जनता आहे त्यांना कळू द्या जरा.

**प्रविण पाटील :-**

गोल गोलरानी इतका इतका पानी. म्हणजे ठराव काय दोन्ही एकच आहे.

**मा. उपमहापौर :-**

थोडासा गोंधळ कमी केलात तर सगळ्यांच्या लक्षात येईल आणि हा हट्ट वारंवार करु नका.

**प्रविण पाटील :-**

पुढच्या सभेमध्ये आमचा ठराव आणणार.

**प्र. नगरसचिव :-**

प्रथम मी दुसरा ठराव मतदानास टाकतो. सुचक श्री. दिनेश नलावडे यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. मोहन म्हात्रे यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्री. मोहन म्हात्रे यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ५६, विरोधात ३०, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. श्री. मोहन म्हात्रे यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजूर करण्यांत येत आहे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम आरक्षण क्र. १०९ मध्ये तरण तलाव करण्यावर बरीचशी चर्चा झाली. ठीक आहे. आपल्या काही आर्थिक बाबी घेता किंवा काही प्रशासकीय बाबी होतात. त्यानुसार हा ठराव तिथेच तरण तलाव बांधण्यावर मंजूरी..........

(सभागृहात गोंधळ)

**मॉरस रॉड्रीक्स :-**

मा. आयुक्त साहेब मी एक विनंती करतो जे आता तलाव बांधायचे आहेत म्हणाले उपमहापौर एक नाही २ नाही १० बांधू मी सांगतो १० बांधू हरकत नाही. पण हे जे भाड्याने देतात हे गैरव्यवहार आहे ह्याला निमुल्य दोन रुपये फक्त एन्ट्री असते. मुंबईला फक्त २ रुपये एन्ट्री असते. हे दहा हजार आणि पंधरा हजार घेणे चुकीचे आहे. असे तलाव कोणालाही भाड्याने देऊ नये आणि दिले ते ही कॅन्सल करावे. जे ठेकेदारांना दिले असतील ते ही कॅन्सल करावे. आपण म्हणतो मुंडे साहेबांचे नाव देतो. उद्या शिवाजी महाराजांचे नाव देणार ती कशाला आपण देतो नाव ना आपले गर्व्हमेंटचे आपली महानगरपालिकेची तर त्याचे काय विनामुल्य भाडे घ्यायचे असते कारण ती आपली एरिया आपल्याला स्वच्छता ठेवायला लागते.

त्यात बॉर्डर घालायला लागते. सर्व खर्च निघायला पाहिजे म्हणून नामुल्य भाडे घेतले पाहिजे. हेच मला सांगायचे आहे. धन्यवाद.

**प्रकरण क्र. ७६ :-**

**भाईंदर (पूर्व) नवघर आरक्षण क्र . १०९ या जागेत तरण तलाव बांधणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.**

ठराव क्र. ७६ :-

**मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेत भाईंदर (पूर्व) येथे गोपीनाथ मुंडे क्रिडा संकुल यामध्ये तरण तलाव सुरु करुन नागरीकांकरीता खुला केलेला आहे.**

**सन 2017-18 या वर्षाच्या अर्थसंकल्पात "तरण तलाव बांधणे व सुशोभिकरण करणे " या लेखाशिर्षात रु.2.00 कोटी रकमेची तरतुद करण्यात आलेली असुन सदर लेखाशिर्षातुन यापुर्वी राष्ट्रीय महामार्ग क्र.8 वर लोढा ॲमिनिटी ओपन स्पेसच्या जागेत तरण तलाव बां धणे कामाच्या खर्चास मा.महासभेने प्रशासकिय व आर्थिक मान्यता दिलेली आहे . तथापि सदर कामाबाबत पुढील प्रक्रीया करण्यात आलेली नाही.**

**तरी प्रथमत: सदर काम अर्थसंकल्पातील तरतुदीनंतर हाती घ्यावे ते पूर्ण करावे त्यानंतर आरक्षण क्र.109 या जागेत तरण तलावाचा विचार करण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.**

**सुचक :- श्री. मोहन म्हात्रे अनुमोदन :- श्री. हसमुख गेहलोत**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजू यशवंत | |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | परेरा कॅटलीन एन्थोनी | |
| ५ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ५ | नलावडे दिनेश दगडु | |
| ६ | जैन गीता भरत | ६ | शिर्के अनंत गेणू | |
| ७ | पाटील प्रभात प्रकाश | ७ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| ८ | रॉड्रीकस मोरस जोसेफ | ८ | सावंत अनिल दिवाकर | |
| ९ | सिंह मदन उदितनारायण | ९ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| १० | भानुशाली वर्षा गिरधर | १० | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| ११ | यादव मिरादेवी रामलाल | ११ | घरत तारा विनायक | निरंक |
| १२ | शाह रिटा सुभाष | १२ | कदम अर्चना अरुण | |
| १३ | हसनाळे ज्योत्सना जालींदर | १३ | पाटील अनिता जयवंत | |
| १४ | गोहिल शानू जोरावर सिंह | १४ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १५ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | १५ | भट दीप्ती शेखर | |
| १६ | भोईर सुनिता शशिकांत | १६ | गुप्ता कुसुम संतोष | |
| १७ | पाटील वंदना मंगेश | १७ | भोईर भावना राजू | |
| १८ | सोंस नीला बर्नाड | १८ | पाटील धनेश परशुराम | |
| १९ | रावल मेघना दिपक | १९ | शेख रुबीना फिरोझ | |
| २० | मोकाशी दिपाली आनंदराव | २० | डिसा मर्लिन मर्विन | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २१ | जैन सुनिता रमेश | २१ | सपार उमा विश्वनाथ | |
| २२ | नाईक विविता विवेक | २२ | परदेशी गिता हरीश | |
| २३ | भावसार वंदना संजय | २३ | सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन | |
| २४ | बेलानी हेमा राजेश | २४ | पाटील नरेश तुकाराम | |
| २५ | भोईर विणा सुर्यकांत | २५ | शेख अमजद गफार | |
| २६ | सोनार सुरेखा प्रकाश | २६ | पाटील वंदना विकास | |
| २७ | मुखर्जी अनिता बबलू | २७ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| २८ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २८ | भोईर कमलेश यशवंत | |
| २९ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | २९ | अहमद साराह अकरम | |
| ३० | म्हात्रे मोहन गोपाळ | ३० | बांड्या एलायस दुमिंग | |
| ३१ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३२ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| ३३ | तिवारी अशोक सूर्यदेव | | | |
| ३४ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | | |
| ३५ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ३६ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३७ | कांगणे मीना यशवंत | | | |
| ३८ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ३९ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ४० | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |
| ४१ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ४२ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ४३ | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| ४४ | थेराडे संजय अनंत | | | |
| ४५ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ४६ | जैन राजेंद्र भवरलाल | | | |
| ४७ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ४८ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ४९ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ५० | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ५१ | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | | |
| ५२ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ५३ | खंडेलवाल सुरेश जगदीश | | | |
| ५४ | पांडेय पंकज सूर्यमणि | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५५ | भोईर गणेश गजानन | | | |
| ५६ | पारधी सुजाता यशवंत | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७७, **मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र. १७८ या जागेतील इमारतीवर पहीला मजला बांधणे कामाबाबत.**

**दिनेश जैन :-**

**मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पुर्व) येथील मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र.178 (मैदान) या ठिकाणी शासनामार्फत विशेष निधी अंतर्गत इमारत बांधण्यासाठी रु .1.89 कोटीच्या कामास मान्यता दिल्यानुसार विहीत प्रक्रीया करुन इमा रतीचे काम सुरु आहे. सदर कामात प्रत्यक्षात जागेवर फुटींग ऐवजी पायलिंग करावी लागल्याने जागेवर तसा बदल करुन काम करुन घेण्यात आलेले आहे. सदर बदल करुन तयार केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येत आहे. सदर इमारतीवर पहील्या मजल्याचे तसेच तळ मजल्यावरील उर्वरीत कामे करावयाची असुन सदर कामासाठी रु.2,04,25,967/- एवढा खर्च अपेक्षित आहे . तरी सदर कामासाठी तयार केलेल्या सुधारीत रू.3,93,25,967/- रकमेच्या अंदाजपत्रकास सुधारीत प्रशासकीय व आर्थिक मान्यता देयात येत आहे . तसेच सदर काम मुळ कामाच्या कंत्राटदाराकडून करून घेण्यास देखिल मान्यता देण्यात येत आहे . विशेष निधी व्यतिरिक्त होणाऱ्या खर्चासाठी सन 2018-19 या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतुद करण्यात यावी.**

**राईगांव येथे विशेष निधीतून Multi Purpose Hall बांधणे कामासाठी रू.2.00 कोटी रकमेचा निधी मंजूर झाला असून सदर कामाच्या सुधारीत अं दाजपत्रकास मान्यता देण्यात येत आहे . तथापी सदर ठिकाणी पहिला मजला बांधावयाचा असून सदर कामासाठी रू .2,00,46,875/- रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.**

**सदर अंदाजपत्रकीय खर्चास तसेच सदर कामाच्या एकूण रू.4,00,46,875/- रकमेच्या सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय आर्थिक मान्यता देण्यात येत आहे . तसेच सदर काम मुळ कामाच्या कंत्राटदाराकडून करून घेण्यास देखिल मान्यता देण्यात येत आहे . विशेष निधी व्यतिरिक्त होणाऱ्या खर्चासाठी सन 2018-19 या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात यावी.**

**विनोद म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त महोदय तत्कालीन आयुक्त नरेश गिते साहेब प्रशासकीय अधिकारी यांच्या स्वाक्षरीने आलेला गोषवारा यांच्यामध्ये सार्व. बांधकाम विभागाने अपेक्षित खर्च तो वाढीव खर्च म्हणजे दोन कोटीला मंजुरी विशेष निधी आणि त्याच्यावर १,७१,९७,०४९/- रुपये असा खर्च अपेक्षित गोषवाऱ्यामध्ये दिलेला आहे. ते साडे चार कोटीवर कसे गेले. प्रथमतः साहेब थोडासा इतिहास सांगतो. मिरारोडमध्ये दोनच आरक्षण मैदान आहेत. एक अल्ला अजरद ग्राऊंड आणि एक हा १७० नंबरचे आरक्षण आणि १७८ नंबरचा शासनाने पैसे दिले आमदारांना आपले फलक लावायचे होते. इमारत तयार करुन त्या आरक्षणामध्ये त्या क्षेत्रातल्या मुलांनी खेळण्यासाठी तो आरक्षण मैदान त्या परिसरामध्ये तुम्ही फिरकाल ना साहेब कमीत कमी दोन अडीज लाखाची लोकसंख्या आहे. दोन आरक्षण आहेत फक्त. अल्ला अझरत जो ग्राऊंड १७० चा आरक्षणचा उल्लेख केला त्याच्यामध्ये तीन साडे तीन एकरचा आरक्षण होते साहेब अर्धा एक पेक्षा जास्त जागा भुयारी गटारचे एस.टी.बी. तयार करण्यासाठी घेण्यात आली. शिल्लक काय राहिले दोन अडीच एकर हा १७८ नंबरचे आरक्षण आहे साहेब ह्याला विकसित करुन घेण्यासाठी आम्ही भरपूर सट्टा पट्टा

केल्या. लोकांनी त्याच्यामध्ये वाद आहेत न्यायालयाचे त्या व्यक्तीला तत्कालीन आयुक्त सुरेश काकाणी साहेब मध्यस्थी करुन मुलांना खेळण्यासाठी फक्त लेव्हल करुन दिले. मातीचा भराव करुन दिला की मुलांना खेळण्यासाठी जागा पाहिजे. शहराच्या आमदारांनी नरेंद्र मेहता साहेबांनी याच्यामध्ये सामाजिक कम्युनिटी हॉल प्रस्तावित केले. जागा नाही मुलांना खेळायला आणि भव्य दिव्य एक मोठा हॉल म्हणजे तो ही हॉल त्या ग्राऊंडच्या मधोमध आम्ही आयुक्तांना पत्रव्यवहार केले त्यांना समजून सांगायचा प्रयत्नही केला. आता कदाचित काही अडचणी त्यांच्याही सध्या असतील त्या अडचणींमुळे ते सुध्दा गेले अशा परिस्थितीत त्या पूर्ण ग्राऊंडचा सत्यानाश करुन टाकला साहेब ह्या शहरामध्ये मला सांगा किती कम्युनिटी हॉल उभे करणार, किती तरी हॉलचा आपल्याकडे मंजुरीचे विषय आलेले आहेत. विषय असा आहे साहेब वास्तु तयार करणे वाईट नसते विषय नाही. हे वास्तु तयार केल्यानंतर त्याचा डागडुजी त्याची देखरेख हे सगळे काही करावे लागते साहेब. हे सगळे करायला ही पैसा आर्थिक बाबी लागतात. तेवढा मनुष्यबळ नाही तुमच्याकडे आता आस्थापनाचा खर्च ४५ टक्केच्या वर गेलेला आहे. अशा परिस्थितीत ह्या जागेवर मुलांना खेळण्यासाठी ह्या मोबाईलच्या जगामध्ये त्यांना खेळण्यासाठी जागा पाहिजे. त्या जागेचा सर्वनाश करुन तिथे एक कम्युनिटी हॉल झाला. उभा राहिला वास्तु पालिकेची तयार झाली. मंजुरी कितीची घेतली. मा. महासभा दि. ४/१२/२०१५ प्रकरण क्र. ११० ठराव क्र. ८९ मिरारोड पूर्व नयानगर आरक्षण क्र. ७८ खेळाचे मैदान राज्यशासनाने प्राथमिक मुलभूत सोयी सुविधा योजनेअंतर्गत मल्टीपरपज हॉल बांधण्याच्या रुपये २.१ म्हणजे दोन कोटी आणि एक लक्ष रक्कमेचा काम प्रस्तावित असल्याने सदर ठिकाणी स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सामाजिक सभागृह बांधण्याची आवश्यकता असा विषय त्यांनी दिलेला आहे. बांधण्यात आले किती रुपयाचा आज साडे चार कोटी रुपयाचा शासनाला हे इतकी कळकळ असेल तर त्यांनी द्यावे ना निधी महापालिकेचा कर बोझा तसाच वाढून टाकला आहे. पाणी पुरवठ्यामध्ये पैसे कमी आहेत. पाणी पट्टी वाढवली हे सर्व काही समोर असताना पालिकेच्या अर्थसंकल्पावर अधिक बोजा आम्हाला नको आहे. एक तर प्रथमतः साहेब सार्व. बांधकाम विभागाने जितकी निधी उपलब्ध होती तितकाच बांधकाम प्रस्तावित करायला हवा. का जास्त केला आणि आज ह्यांनी ठराव मांडला आहे. साडे चार कोटी रुपयाचा त्यांची आर्थिक प्रशासकीय इस्टीमेटची कॉस्ट कोणी काढली. सार्वजनिक बांधकामने काढून दिलेली नाही. दिली असती तर गोषवारा असता प्रशासनाचा विषय आहे तो माझा खाजगी असू शकतो. मी कसे त्याचे कॅल्क्युलेशन करणार. ते माझे काम नाही. त्यासाठी आपण तंत्र अभियंतांना नेमले आहे. साहेब अशा प्रकारे सगळा गोलमोल कारभार जो आहे तो तुमच्या कार्यकाळामध्ये चालु ठेवू नये. अर्थसंकल्पामध्ये कुठल्याही प्रकारची तरतुद करायची गरज नाही. शासनाला सांगा अजुन थोडीशी मेयरची नजर ठेवा. भरपूर पैसा आहे. पारदर्शक कारभार चालवता असे फक्त बोलतात नाही तर दिल्लीवरुन गल्लीपर्यंत फक्त खोट आणि खोट बोलणार आहेत. अशाप्रकारे कामकाज करणाऱ्यांचा विषयाला बळी पडू नये त्या विषयावरती मी ठराव मांडणार आहे.

**स्नेहा पांडे :-**

महापौर मॅडम, आपकी परमिशन से बोल रही हूँ। गोषवारा प्रशासन का आता है की पहिला मजला बांधनेबाबत और अंदर विषय ऐसा है की २ कोटी ऑलरेडी मंजुर था फिर भी कम पड रहा है। १ कोटी ७१ लाख देना है कितना बडा क्षेत्रफळ है वह २ कोटी में क्या क्या काम मंजुर थे अपने और नही हो पाए है। उर्वरीत काम आगे ले रहे है। इन सब चिजो का उल्लेख ही नही रहता है और बहुत सारे मेंबर यहाँ उस हाऊस के नए है। जिनको जानकारी नही होती है की कहाँ पे यह बांधकाम चल रहा है और २ कोटी में क्या क्या परमिशन था क्या क्या काम आप लोगो ने लिया था वह कैसे उर्वरीत रह गया। उसके उपर कोई गोषवारे में चर्चा नही रहती है और अलग ही इस्टीमेट आ जाता है और उसकी आर्थिक प्रशासकीय मंजुरी और ठराव पे ठराव हो रहे है। इसका कोई मतलब नही सभा चलाने का प्रशासन को इतना तो नॉलेज होना चाहिए की जिस विषय लेके आ रहे है उसकी पुरी माहिती रहनी चाहिए। मेंबरो को तो उनके सामने हम चर्चा कर पाऐंगे। इसके लिए प्रशासन जिम्मेदार है उनको उनसे आप जवाब लिजीए।

**मा. महापौर :-**

ठिक है आप बैठ जाईए।

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम आयुक्त साहेब पुन्हा तोच प्रकार प्रशासनाचा वेगळा गोषवारा यांचा ठराव वेगळा ह्या ठरावामध्ये तर बरीचशी कामे घुसवली आहेत. शहरात विकासाची काम व्हायला पाहिजे. कॉन्ट्रॅक्टर सुध्दा फिक्स करुन टाकला तोच कॉन्ट्रॅक्टरला काम द्या आणि हे सभागृहाच्या माथी काय चाललेले आहे यांचे सगळे ठराव विखंडीत करायला पाठवा राज्य शासनाकडे.

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम मिरारोड पूर्व आरक्षण क्र. १७८ या जागेवर हॉल बांधणे आमदारांना काही स्वप्न पडल नव्हतं परंतु तेथील नागरिकांनी आमदारांना विनंती केली की आमच्या ह्या पूर्ण नयानगर परिसरामध्ये कम्युनिटी हॉल नाही तिथे कम्युनिटी हॉल बांधा म्हणून आमदारांनी विषय घेतला आणि हा हॉल सुरु झाल्यानंतर तिकडच्या लोकांची मागणी आणखीन वाढली. सर फक्त ग्राऊंड फ्लोअर नको आणखीन तिथे फर्स्ट फ्लोअर पाहिजे आणि म्हणून हे सुधारित अंदाजपत्रक आणलं.

**जुबेर इनामदार :-**

साहेब तुम्ही त्या भुखंडाची पाहणी करा त्याचे चित्र त्याचे धोरण समोर दिसेल.

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम सभापती महोदय काय सांगत अहेत. आमदार साहेबांना विनंती केली आणि त्यांनी ऐकल मग आमदार साहेबांना सगळी जनता विनंती करेल मग ही महासभा आपल्याला पाहिजे तरी कशाला. जर आमदार साहेबांना

(सभागृहात गोंधळ)

**दिनेश नलावडे :-**

सभापती महोदय तुम्ही विषय काय बोलता आणि विषय काय मांडता.

**धृवकिशोर पाटील :-**

तिथे कम्युनिटी हॉल बांधणे गरजेचे आहे. त्यामुळे हा प्रस्ताव आणलेला आहे. आम्ही आमचा ठराव केलेला आहे. जर त्यांना विरोध असेल तर त्यांनी तो ठराव करावा.

**जुबेर इनामदार :-**

झालेल्या बांधकामाला विरोध करुन काही फायदा होत नाही. म्हणून आम्ही त्याला विरोध केलाच नाही मी काय बोललो त्याच्यात तुमचे लक्ष नाही. तुमच लक्ष फक्त एक बाजूना केंद्रीत असतं खर्चाची बाब दोन कोटीचे प्रस्तावित काम ४.५ कोटीवर कस जाणार आणि साहेब प्रशासनाने सुध्दा गोषवारा देताना १ कोटी ७१ लाखाचा दिला आहे. हा निधी शासनाकडूनच घ्या. त्यांना सांगा आमच्याकडे पैसे नाहीत. तुम्ही दिले म्हणून आम्ही केले तुमच्या आमदाराने चुक केली आहे. त्याच्यात सुधार तुम्ही करा.

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम आमदार खुप जागरुक आहेत आणि आमदारांनी महापालिकेचा फायदाच केलेला आहे. ते मागच्या मिटींगमध्ये दाखवून दिलेले आहे. १६ लाख रुपये त्यांनी महापालिकेला फायदा करुन दिला. शुटिंगमध्ये ५ लाखाचा फायदा करुन घेतला.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

तुमचा ठराव असेल तर मांडा.

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम आता फक्त ग्राऊंड फ्लोअर आहे त्याच्यामुळे हे बजेट वाढलेले आहे. म्हणून हे सुधारित अंदाजपत्रक आणलेले आहे.

**अनिल सावंत :-**

आमदारांनी फायदा केल्याचे सांगत आहेत. नुकसान केल ते पण सांगा. पालिकेचे २५ लाख रुपये बाकी आहेत.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम पर्सनल एलिगेशन कोणी करु नये आणि मला हे कळत आहे की विरोधी पक्षाला आमदारांच्या नावाने सभागृह चालवता येत नाही. प्रत्येक वेळा ते आमदारांचे नाव घेतात.

**जुबेर इनामदार :-**

**मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पुर्व) येथील मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र.178 (मैदान) या ठिकाणी शासनामार्फत विशेष निधी अंतर्गत इमारत बांधण्यासाठी उपलब्ध २ कोटी रुपये प्रशासकीय मान्यतेनुसार विहित प्रक्रिया पुर्ण करुन इमारतीचे काम सुरु करण्यात आले . सदर इमारतीच्या तळ व पहिल्या मजल्यावर उर्वरीत काम करण्यासाठी १,७१,९७,०४९ रुपये खर्च अपेक्षित आहे. सदर काम पूर्ण करण्या साठी २०१८-१९ या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतुद करणे आवश्यक आहे असा प्रस्ताव प्रशासनाने मंजूरीसाठी मा. महासभेमध्ये प्रस्तावित केलेला आहे.**

**मिरा भाईंदर महानगरपालिका सार्व . बांधकाम विभागाने उपरोक्त कामाचा अंदाजपत्रक तयार करताना उपलब्ध निधी अनुसारच बांधकाम क्षेत्र प्रस्तावित करावयाचे होते . विशेष निधी अंतर्गत प्रस्तावित बांधकामाला मनपाची निधीची अपेक्षा राखणे योग्य नाही. तसेच पुढील काम पुर्ण करण्यासाठी शासनाकडून वाढीव निधीची मागणी करावी. मनपाच्या २०१८-१९ च्या अर्थसंकल्पावर याचा भार टाकू नये असा मी ठराव मांडत आहे.**

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

दोन ठराव आलेले आहेत सचिव साहेब मतदान घ्या.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७७ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. दिनेश जैन, अनुमोदन श्री. विनोद म्हात्रे. दुसरा ठराव सुचक श्री. जुबेर इनामदार, अनुमोदन श्री. हरिश्चंद्र आमगावकर. प्रथम मी दुसरा ठराव मतदानास टाकतो. सुचक श्री. जुबेर इनामदार यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. दिनेश जैन यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्री. दिनेश जैन यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ५७, विरोधात ३०, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. श्री. दिनेश जैन यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजूर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ७७ :-**

**मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र . १७८ या जागेतील इमारतीवर पहीला मजला बांधणे कामाबाबत.**

ठराव क्र. ७७ :-

**मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पुर्व) येथील मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र.178 (मैदान) या ठिकाणी शासनामार्फत विशेष निधी अंतर्गत इमारत बांधण्यासाठी रु .1.89 कोटीच्या कामास मान्यता दिल्यानुसार विहीत प्रक्रीया करुन इमारतीचे काम सुरु आहे . सदर कामात प्रत्यक्षात जागेवर फुटींग ऐवजी पायलिंग करावी लागल्याने जागेवर तसा बदल करुन काम करुन घेण्यात आलेले आहे. सदर बदल करुन तयार केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येत आहे. सदर इमारतीवर पहील्या मजल्याचे तसेच तळ मजल्यावरील उर्वरीत कामे करावयाची असुन सदर कामासाठी रु.2,04,25,967/- एवढा खर्च अपेक्षित आहे . तरी सदर कामासाठी तयार केलेल्या सुधारीत रू.3,93,25,967/- रकमेच्या अंदाजपत्रकास सुधारीत प्रशासकीय व आर्थिक मान्यता देयात येत आहे. तसेच सदर काम मुळ कामाच्या कंत्राटदाराकडून करून घेण्यास देखिल मान्यता देण्यात येत आहे . विशेष निधी व्यतिरिक्त होणाऱ्या खर्चासाठी सन 2018-19 या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतुद करण्यात यावी.**

**राईगांव येथे विशेष निधीतून Multi Purpose Hall बांधणे कामासाठी रू.2.00 कोटी रकमेचा निधी मंजूर झाला असून सदर कामाच्या सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येत आहे . तथापी सदर ठिकाणी पहिला मजला बांधावयाचा असून सदर कामासाठी रू .2,00,46,875/- रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.**

**सदर अंदाजपत्रकीय खर्चास तसेच सदर कामाच्या एकूण रू.4,00,46,875/- रकमेच्या सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय आर्थिक मान्यता देण्यात येत आहे . तसेच सदर काम मुळ कामाच्या कंत्राटदाराकडून करून घेण्यास देखिल मान्यता देण्यात येत आहे . विशेष निधी व्यतिरिक्त होणाऱ्या खर्चासाठी सन 2018-19 या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात यावी.**

सुचक :- श्री. दिनेश जैन अनुमोदन :- श्री. विनोद म्हात्रे

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजू यशवंत | |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | परेरा कॅटलीन एन्थोनी | |
| ५ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ५ | नलावडे दिनेश दगडु | |
| ६ | जैन गीता भरत | ६ | शिर्के अनंत गेणू | |
| ७ | पाटील प्रभात प्रकाश | ७ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| ८ | रॉड्रीकस मोरस जोसेफ | ८ | सावंत अनिल दिवाकर | |
| ९ | सिंह मदन उदितनारायण | ९ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| १० | भानुशाली वर्षा गिरधर | १० | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| ११ | यादव मिरादेवी रामलाल | ११ | घरत तारा विनायक | |
| १२ | शाह रिटा सुभाष | १२ | कदम अर्चना अरुण | |
| १३ | हसनाळे ज्योत्सना जालींदर | १३ | पाटील अनिता जयवंत | |
| १४ | गोहिल शानू जोरावर सिंह | १४ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १५ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | १५ | भट दीप्ती शेखर | |
| १६ | भोईर सुनिता शशिकांत | १६ | गुप्ता कुसुम संतोष | |
| १७ | पाटील वंदना मंगेश | १७ | भोईर भावना राजू | निरंक |
| १८ | सोंस नीला बर्नाड | १८ | पाटील धनेश परशुराम | |
| १९ | रावल मेघना दिपक | १९ | शेख रुबीना फिरोझ | |
| २० | मोकाशी दिपाली आनंदराव | २० | डिसा मर्लिन मर्विन | |
| २१ | जैन सुनिता रमेश | २१ | सपार उमा विश्वनाथ | |
| २२ | नाईक विविता विवेक | २२ | परदेशी गिता हरीश | |
| २३ | भावसार वंदना संजय | २३ | सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन | |
| २४ | बेलानी हेमा राजेश | २४ | पाटील नरेश तुकाराम | |
| २५ | भोईर विणा सुर्यकांत | २५ | शेख अमजद गफार | |
| २६ | सोनार सुरेखा प्रकाश | २६ | पाटील वंदना विकास | |
| २७ | मुखर्जी अनिता बबलू | २७ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| २८ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २८ | भोईर कमलेश यशवंत | |
| २९ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | २९ | अहमद साराह अकरम | |
| ३० | म्हात्रे मोहन गोपाळ | ३० | बांड्या एलायस दुमिंग | |
| ३१ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३२ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३३ | तिवारी अशोक सूर्यदेव | | | |
| ३४ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | | |
| ३५ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ३६ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३७ | कांगणे मीना यशवंत | | | |
| ३८ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ३९ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ४० | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |
| ४१ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ४२ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ४३ | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| ४४ | थेराडे संजय अनंत | | | |
| ४५ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ४६ | जैन राजेंद्र भवरलाल | | | |
| ४७ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ४८ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ४९ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ५० | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ५१ | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | | |
| ५२ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ५३ | व्यास रवि वासुदेव | | | |
| ५४ | खंडेलवाल सुरेश जगदीश | | | |
| ५५ | पांडेय पंकज सूर्यमणि | | | |
| ५६ | भोईर गणेश गजानन | | | |
| ५७ | पारधी सुजाता यशवंत | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र. ७८, **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नागरी सुविधा क्षेत्रा च्या भूखंडावर बुध्द विहार बांधणे बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.**

ज्योत्सना हसनाळे :-

**मिरा भाईंदर शहरामध्ये बौद्ध समाजाची फार पूर्वीपासुन वस्ती असून त्यांची अनेक वर्षापासूनची बौद्ध समाजाकरीता शहरात बुद्ध विहार बांधणेबाबतची मागणी होती . त्याप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेत कम्युनिटी हॉल चे आरक्षण असून सदर आरक्षणाच्या जागा ताब्यात घेवून अथवा नागरी सुविधा क्षेत्राच्या भुखंडावर बुद्ध विहार बांधयात यावा . त्याप्रमाणे बुद्ध विहार**

**बांधण्यासाठी वास्तुविशारदाकडून नकाशे, आराखडे तयार करु न सदर नकाशे मंजुर करुन त्यानुसार सन 2018-19 या वर्षाचे अंदाजपत्रकीय अर्थसंकल्पात सदर कामासाठी तरतुद करावी व बुद्धविहार बांधणेच्या कामाच्या अनुषंगाने लागणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे . मा. आयुक्त यांनी सर्व पदाधिकारी यांना विश्वासात घेवून काम पूर्ण करावे यासाठी सर्व अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहेत असा मी ठराव मांडत आहे.**

**दौलत गजरे :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रविण पाटील :-**

महापौर मॅडम बौध्द विहार बांधण्याची मागणी ह्या शहरात कित्येक वर्षापासून होत आहे. एक चांगला विषय आणला आहे. परंतु बुध्द विहार बांधत असताना आमची एक सुचना आहे की नवि मुंबई किंवा पुण्याचा ज्याप्रमाणे बुध्द विहार बांधलेले आहे जेणेकरुन फक्त बुध्द विहार नसताना त्याच्यामध्ये बुध्दांनी सांगितलेले संदेश किंवा त्या व्यतिरिक्त असलेले त्यांच्या व्हिडीयो क्लिप किंवा जे परिपूर्ण असलेले बुध्द विहार असावे अशी तुम्हाला सुचना आहे.

**मा. उपमहापौर :-**

मुळात ठरावच असा आहे की ते आयुक्तांना अधिकार दिला आणि आपल्या सगळ्यांच्या सुचना विचारात घ्याव्यात असा स्पेसिफीक उल्लेख आहे. त्यामुळे सगळ्यांच्या सुचनांचे स्वागत.

**जुबेर इनामदार :-**

आरक्षणामध्ये बांधायचे आहे की नागरी सुविधा क्षेत्रामध्ये बांधुन घ्यावी.

**ज्योत्सना हसनाळे :-**

मा. महापौर मॅडम ज्या-ज्या नगरसेवकांनी ज्या-ज्या सुचना केल्या असतील त्यांना अनुसरुन घेऊन मग हे करण्यात यावे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ७८ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नागरी सुविधा क्षेत्राच्या भूखंडावर बुध्द विहार बांधणे बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.**

ठराव क्र. ७८ :-

**मिरा भाईंदर शहरामध्ये बौद्ध समाजाची फार पूर्वीपासुन वस्ती असून त्यांची अनेक वर्षापासूनची बौद्ध समाजाकरीता शहरात बुद्ध विहार बांधणेबाबतची मागणी होती . त्याप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेत कम्युनिटी हॉल चे आरक्षण असून सदर आरक्षणाच्या जागा ताब्यात घेवून अथवा नागरी सुविधा क्षेत्राच्या भुखं डावर बुद्ध विहार बांधयात यावा. त्याप्रमाणे बुद्ध विहार बांधण्यासाठी वास्तुविशारदाकडून नकाशे, आराखडे तयार करुन सदर नकाशे मंजुर करुन त्यानुसार सन 2018-19 या वर्षाचे अंदाजपत्रकीय अर्थसंकल्पात सदर कामासाठी तरतुद करावी व बुद्धविहार बांधणेच्या कामाच्या अनुषंगाने लागणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे . मा. आयुक्त यांनी सर्व पदाधिकारी यांना विश्वासात घेवून काम पूर्ण करावे यासाठी सर्व अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहेत असा मी ठराव मांडत आहे.**

**सुचक :- श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे अनुमोदक :- श्री. दौलत गजरे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र. ७९, **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दर्जेदार शैक्षणिक सुविधा विकसित करणेकरीता शैक्षणिक प्रयोजनाचे ठिकाण योजनेतील आरक्षित भुखंड वितरीत व विकसित क रणेकरीता धोरण ठरविणेबाबत.**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सदर विषयाबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३१ नूसार तदर्थ समिती गठीत करण्यात यावी. सदर समिती मध्ये मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभापती, स्थायी समिती, मा. सभागृह नेते, मा. विरोधी पक्षनेते, मा. सर्व गटनेते, मा. आयुक्त यांचा समावेश राहील. सदर समितीस शहर अभियंता, उप-आयुक्त (शिक्षण), कार्यकारी अभियंता (बांधकाम), विधी अधिकारी, प्रशासन अधिकारी यांनी याकामी सहाय्य करावे असा मी ठराव मांडत आहे.

**अश्विन कासोदरीया :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ७९ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दर्जेदार शैक्षणिक सुविधा विकसित करणेकरीता शैक्षणिक प्रयोजनाचे ठिकाण योजनेतील आरक्षित भुखंड वितरीत व विकसित करणेकरीता धोरण ठरविणेबाबत.**

**ठराव क्र. ७९ :-**

सदर विषयाबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३१ नूसार तदर्थ समिती गठीत करण्यात यावी. सदर समिती मध्ये मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभापती, स्थायी समिती, मा. सभागृह नेते, मा. विरोधी पक्षनेते, मा. सर्व गटनेते, मा. आयुक्त यांचा समावेश राहील. सदर समितीस शहर अभियंता, उप-आयुक्त (शिक्षण), कार्यकारी अभियंता (बांधकाम), विधी अधिकारी, प्रशासन अधिकारी यांनी याकामी सहाय्य करावे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८०, **मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-2014 मध्ये दुरुस्ती करणेबाबत.**

**मदन उदित नारायण सिंह :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण ) नियम-2014 मध्ये अजुन बऱ्याच पदांची दुरुस्ती करणे बाकी आहे . प्रशासनाने सर्व दुरुस्तीचे प्रस्ताव एकत्रित करुन फेरप्रस्ताव सादर करावा असा मी ठराव मांडत आहे.**

**ज्योत्सना हसनाळे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ८० :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण ) नियम-2014 मध्ये दुरुस्ती करणेबाबत.**

**ठराव क्र. ८० :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण ) नियम-2014 मध्ये अजुन बऱ्याच पदांची दुरुस्ती करणे बाकी आहे . प्रशासनाने सर्व दुरुस्तीचे प्रस्ताव एकत्रित करुन फेरप्रस्ताव सादर करावा असा मी ठराव मांडत आहे.**

**सुचक :- श्री. मदन उदितनारायण सिंह अनुमोदक :- श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८१, **आगरी समाज उन्नती संस्थेस जागा देणेबाबत फेरप्रस्ताव सादर करणेबाबत.**

**रोहिदास पाटील :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना क्र. टीपीएस-**1296/847/**सीआर-**162/96/**युडी-**12,** दि.**14/05/97** अन्वये मंजूर करण्यात आलेली असून दि.**15/07/97** पासून अंमलात आलेली आहे . वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र . टीपीएस-**1298/941/**सीआर-**89/98/**युडी-**12,** दि.**25/08/2000** अन्वये मंजूर झालेली असून दि .**15/10/2000** पासून अंमलात आलेली आहे . मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र . टिपीएस-**1208/1346/**प्र.क्र.**267/08/**नवि-**12,** दि.**29/08/2009** अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आ .क्र. **122** हे आरक्षण **"Playground & Social Forestry"** [खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण ] या नावाने प्रस्तावित असून मंजूर विकास योजनेप्रमाणे सदर आरक्षणाचे एकूण क्षेत्र **46700.00** चौ.मी. आहे. यापैकी **35182.60** चौ .मी. महानगरपालिकेच्या ताब्यात असून सदर आरक्षणातील **2.0** एकर जागा आगरी समाज उन्नती संस्था यांना भाडेतत्वावर देणेसाठी व भाडे निश्चित करणेबाबत मा . महासभेची मंजूरी आवश्यक असल्याने यापुर्वी तत्कालीन महासभेस दि .**20/07/2011** रोजी गोषवारा सादर केला होता . त्याअनुषंगाने दि.**29/07/2011** (दि.**20/07/2011** ची तहकूब सभा ) रोजीच्या मा. महासभेने सदर प्रकरणी महाराष्ट्र नगररचना अधिनियम **1966** च्या कलम **37(1)** अन्वये आरक्षणात फेरबदल करणेचा प्रस्ताव शासनाकडे सादर करणेसाठी ठराव क्र. **42** अन्वये मंजूरी दिलेली आहे. सदर ठरावाप्रमाणे नियमाप्रमाणे सर्व वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन मंजूरीसाठी मा . शासनास पत्र क्र . मनपा/नर/**4104/2011-12,** दि.**28/03/2012** अन्वये सादर करणेत आला असता सदर प्रकरणी अनुषंगाने मा . शासनाने शासन निर्णय क्र. टिपीएस-**1213/1813/**प्र.क्र. **231/13/**नवि-**12,** दि.**30/01/2014** अन्वये सदर फेरबदलाचा प्रस्ताव नामंजूर केलेला आहे.

**आगरी समाज उन्नती संस्था यांनी 2 एकर जागा मिळणेबाबत महापालिकेस फेरविनंती केलेली असल्यामुळे आरक्षण क्र.122 खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण या आरक्षणाच्या एकुण 46700 चौ.मी. क्षेत्रामधून विकास योजना रस्त्यालगतचे 6000 चौ.मी. क्षेत्र हे या आरक्षणातून वगळून 40700 चौ.मी. क्षेत्र खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण या आरक्षणासाठी कायम ठेवणेसह यामधून वगळलेले 6000 चौ.मी. क्षेत्र आगरी भवन या प्रायोजनासाठी आरक्षित करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 नुसार फेरबदलाची कार्यवाही करणेसह त्या अनुषंगिक सर्व वैधनिक कार्यवाही पूर्ण करून अंतिम मंजुरीसाठी प्र स्ताव शासनास सादर करणेसाठीचे सर्व अधिकार सदरचा प्रस्ताव शासनाकडून मंजुर झाल्यानंतर अटीशर्ती ठरविण्या करीता प्रस्ताव पुन्हा मा. महासभेत ठेवण्यात यावा व पुढील कार्यवाहीकरीता मा . आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेकरीता हि मा . महासभा मंजुरी देत आहे.**

**प्रभात पाटील :-**

माझे अनुमोदन आहे

**प्रविण पाटील :-**

महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो विषय चांगला आहे. उद्देश चांगला आहे. त्या शहरामध्ये भुमीपुत्र ह्या शहराचा आगरी कोळी भंडारी काही लोक आहेत ह्या शहरामध्ये आगरी भवन व्हावे असं ह्या शहरातील आगरी समाजाच्या नगरसेवकांची आणि सर्व सामान्यांची मागणी आहे. गेल्या कित्येक

वर्षापासून ही मागणी होत आहे. परंतु एखाद्या संस्थेला जागा द्यायची आहे आगरी समाजाला जागा द्यायची आहे. ह्या शहरामध्ये हजारो एकर जागा आहे पण शोधून शोधून जागा कुठली शोधली जी वादग्रस्त जागा आहे. म्हणजे जेणेकरुन मुळ उद्देश असा आहे की गोलगोल फिरवायचं परत सांगायच की आम्ही तुम्हाला जागा देतो पण अस अस आहे. मागचा इतिहास असा आहे तर ह्याच जागेच ह्या सभागृहामध्ये बरेच नगरसेवक असे आहेत तर मागे आपण प्रस्ताव शासनाला पाठवला होता लिहीलेल आहे. फेटाळलेला आहे प्रस्ताव परत पाठवायचा. परत फेटाळायचा म्हणजे परत फिरवण्याचा काम आता होत आहे मॅडम. आपण सगळे समाजाचे इथे नगरसेवक आहोत मी सगळ्या नगरसेवकांना विनंती करतो तुम्हाला जर जागा द्यायची असेल तर चांगली जागा द्या. हे फिरवण्याचे काम तुम्ही बंद करा. ह्या शहरामध्ये सुविधा भुखंड आहे. किती तरी सुविधा भुखंड आहेत. जेणेकरुन आपण दुसऱ्या समाजाला दिलेले आहेत. मग वादग्रस्त जागा का देता मॅडम ह्याच्यावर उपमहापौर साहेब आपण ही त्या समाजाचे आहात. तुम्ही ही होतात आणि ह्या समाजाला जर जागा द्यायची असेल ही वादग्रस्त जागा न देता आम्ही सुचवतो किंवा प्रशासनाकडून जागा मागून घ्या असे भुखंड मागून घ्या. म्हणजे जेणेकरुन आम्हाला पटकन त्या ठिकाणी आगरी समाजाला भवन बांधता येईल. काका आपण ही ह्या समाजाचे नेतृत्व करता आज आगरी समाजाचे बरेच लोकांनी हजारो लाखो रुपये जमा केलेले आहेत. जेणेकरुन ह्या समाजाची एक चांगले भवन व्हावे आणि ते पैसे नाहीतर जेणेकरुन परत तुम्हाला तर माहिती आहे का १२२ मध्ये प्रस्ताव पाठवलेला होता आणि तो शासनाने फेटाळलेला आहे. मग परत परत फिरवून हिच जागा का दुसरी जागा का नाही देत. आम्हाला म्हणजे उद्देश काय आहे जागा द्यायची नाही परत काही तरी कागदी घोडे नावचायची आणि सांगायचे की बघा आम्ही पाठवलेले दाखवायचे. दुसरी जागा नाही का आपल्याकडे ह्या शहरामध्ये. द्यायचीच असेल तर दुसरी जागा द्या.

**तारा घरत :-**

महापौर मॅडम मला प्रशासनाला विनंती करायची आहे की जी पटकन उपलब्ध होईल अशी जागा आम्हाला द्यावी. आगरी समाजाला आणि मागे फेटाळले गेले हे काकांनाही माहित आहे आणि आताही परत काकांची काय इच्छा आहे मला नाही माहिती. मागे तो विषय फेटाळून हे केलेला आणि आता परत तिथे त्याच १२२ आरक्षणामध्ये मागणी करता तर आम्हाला अशी जागा द्यावी की खरोखर तिथे आगरी समाजाचे जे होईल म्हणून.

**अनिल सावंत :-**

विषय चांगला आहे. उद्देश चांगला दिसत नाही. ह्या शहरामध्ये मिरा भाईंदरचा जो विकास झाला त्यामध्ये आगरी समाजाचे फार मोठे योगदान आहे. ह्या आगरी समाजाने इतर समाजाच्या लोकांना दुधामध्ये जशी साखर मिसळते ना तसे आपल्याकडे सामावून घेतले. आज इतर समाजाचे लोक महत्वाच्या पदावर ह्या शहरामध्ये आहेत. ही आगरी समाजाची देण आहे. इतर समाजाची आज मोठमोठ्या वास्तू उभ्या राहिल्या. राहायला पाहिजेत बरोबर आहे. त्यांची मेहनत आहे सर्व आहे, वाड्या उभ्या राहिल्यात. ज्याच्यामध्ये बिझनेस पण त्यांचा चालू असतो. पण जो इथला भुमिपुत्र आगरी समाज त्याला आपण जागा देऊ शकत नाही. त्याला फक्त जागा पाहिजे आहे इमारत नको. इमारत बांधायला त्यांच्याजवळ पैसे आहेत. ते त्यांना जमा केलेले आहेत. ते आपण देत नाही. गोलगोल फिरवायचे १२२ आरक्षण एवढे मोठे अतिक्रमण आहे त्याच्यावर कधी खाली करणार ते आधि कधी जागा देणार. एकदा प्रस्ताव पाठवला शासनाने आणि फेटाळून लावला परत तथेच बांधायचा प्रस्ताव आणत आहेत. इतर ठिकाणी तुमच्याकडे एवढ्या जागा आहेत त्यातली एक जागा आगरी समाजाला द्या नाही तर समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून तुमच्याकडे एखादी इमारत उपलब्ध झालेली असेल तर ती द्या. काही तर पॉझिटिव्ह विचार करुन ह्या आगरी समाजाला न्याय मिळवून द्याव एवढीच विनंती महापौर मॅडम मी आपल्याला करतो.

**प्रविण पाटील :-**

निर्णय तुम्ही घ्यायचे आहेत. आम्ही आमचे म्हणणे मांडलेले आहे. तुम्ही काय ठरवलेल आहे तुमचा ठराव आहे आम्ही विनंती केली आहे तुम्हाला. तुमचे म्हणणे तर सांगा काय ते त्याच्याबद्दल.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

आरक्षण क्र. १२२ मध्ये मागच्या सभेमध्ये आपण ठरवलेल होत तिथे बाळासाहेब ठाकरे दालनासाठी हा प्रस्ताव आपण पाठवलेला त्याचाच निर्णय आजपर्यंत झाला नाही तर त्या जागेमध्ये आगरी समाजाला जागा द्यायच त्याचा विरोध नाही. आमचा पण ती जागा समाजासाठी भेटणारच नाही तर तुम्ही ती जागा कशाला देता मिरा भाईंदरमध्ये अनेक जागा आहेत. झटकेपट निर्णय घेऊन आणि जे जागा मिळणार समाजासाठी अशी जागा द्या. आमच्यावतीने ती जागा तिथे वादग्रस्त आहे तिथे निर्णय लागु शकत नाही. मागेच आतापर्यंत लागलेला नाही. तर तुम्ही ती जागा १२२ नंबर आरक्षण कशाला देता म्हणजे

जेणेकरुन लोकांमध्ये आम्ही काही तरी करतो. द्यायची तुमची इच्छा नाही आणि आम्ही देतो म्हणून दाखवतो. तुमची जागा द्यायची इच्छाच नाही.

**भावना भोईर :-**

महापौरांच्या परवानगीने बोलते अशी मिरा भाईंदरमध्ये एकही भूखंड नाही की आगरी समाजाला तुम्ही देऊ शकता. विदाऊट आणि ऑब्जेक्शन असल्याशिवाय असे एकही भूखंड नाही मिरा भाईंदरमध्ये. तुम्ही ह्याचे उत्तर द्य.

**तारा घरत :-**

महापौर मॅडम मी विचारते १२२ नंबर आरक्षणामध्ये बांधकामाला परवानगी मिळणार आहे का? जिथे बांधकामाला परवानगीच नाही तिथे तुम्ही आगरी समाजाचे हे कसे देता.

**भावना भोईर :-**

हा खूप गंभीर विषय आहे. असे तुम्ही करु शकत नाही. पहिली गोष्ट म्हणजे.

**तारा घरत :-**

काका आगरी समाजाने पैसे काढलेले आहेत. ते पैसे पण तुमच्याकडे जमा आहेत. ते आपण मान्यता नगरपालिकेकडून घेत नाही.

**मा. उपमहापौर :-**

अशी एक म्हण आहे की सगळ्यात जास्त कळकळ विरोधी पक्षालाच असते की तुम्हाला हे बर झाल समाजाची कळकळ ह्या मातीशी नात आमच, बांधीलकी आमची समाजासाठी काम केल पाहिजे हे सर्व करण्याची तयारी आहे आमची आणि हा विषय घेताना पूर्ण विचारात हा विषय घेतला आहे. आजपर्यंत २००२ पासून आपण वाचली टिप्पणी किती वर्षांचा प्रस्ताव पेंडींग आहे. परंतु ह्या विषयाला निर्णयापर्यंत देण्याचं काम आम्ही करणार आहोत. आताच आमचे मित्र आमगावकर साहेब बोललेत की निवडणूका नाहीत उगीच लॉलीपॉप देऊ नका त्यात तुमची गोष्टी शंभर टक्के खरी हे निवडणूकीसाठीच नाही. ह्या जनतेला ह्या शहरामध्ये अनेक आश्वासन अनेक वचन आम्ही दिलेले आहेत आणि त्या वचनाची पूर्ती करण्यासाठी हा विषय आणलेला आहे. हा विषय कसा करायचा आणि लगेच मान्यता कशी घ्यायची ही जबाबदारी आमची आहे. सत्ताधारी म्हणून त्यात तुमचे सहकार्य पाहिजे. त्यात कुठलेही राजकरण करण्याचे काम नाही.

**प्रविण पाटील :-**

उपमहापौर साहेब आपण एकदम चांगले निवेदन केले ज्यावेळेला ४ ते ७ वर्षापूर्वी ज्यावेळेला प्रस्ताव आला ना अगारी समाजाला जागा देण्याचा त्यावेळेला असे निवेदन झाले आणि त्यावेळेला टेक्नीकली बाजूने हा निर्णय झाला आरक्षण बदलल का तिकडचे? परिस्थिती तीच आहे. प्रस्ताव तोच आहे आणि आता उत्तर पण तेच देणार आहेत.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त महोदय आपल्या निर्दशनास आणून देऊ इच्छितो १२२ आरक्षण सामाजिक वनीकरण आणि मैदाने............

**प्रविण पाटील :-**

काका निवेदन करताना जरा व्यवस्थित करा. समाजाचा विषय आहे आणि नाजुक विषय आहे.

**गिता जैन :-**

आयुक्त महोदय फक्त एक विचारायचे आहे किंवा एक माहिती द्यायची आहे. १२२ आरक्षण जे आहे त्यातला काहीसा जो पार्ट आहे ते आमच्याकडून त्याचे आरक्षण आम्ही हॅन्ड ओव्हर केल होत साहेब. हॅन्ड ओव्हर करताना आम्ही मस्त बाऊन्ड्री वगैरे सर्व व्यवस्थित करुन आम्ही हॅन्ड ओव्हर केलेले आहे. ॲज युज्वल जे दुसरे आरक्षण बरोबर झाले आहे तस तिथेही अतिक्रमण झालेले आहे आणि गेल्या १० वर्षांनी आम्ही ते अतिक्रमण काढायची वाट बघत आहोत. साहेब तुम्ही तिथे बाळासाहेब करा तुम्ही तिथे आगरी समाजाचे करा काही करा पण अतिक्रमण तर काढा. गेल्या १०-१२ वर्षांनी तिथुन अतिक्रमणच काढलेले नाही.

**प्रविण पाटील :-**

म्हणजे वादग्रस्त आहे.

**गिता जैन :-**

अतिक्रमण काढायची तुम्ही हमी तरी घ्या की आता आम्ही अतिक्रमण काढतो त्यावर आम्ही मोठे मोठे प्लॅन बनवतो. तिथे हा बोलवतो ते बोलवतो. सैनिक बोलवतो आम्ही ते करुन घेऊ अस जाहिर

करतो. आणि अजून पर्यंत साहेब तो १२२ चे अतिक्रमण १२-१५ वर्षांनी अजून काही मोकळ झालेल नाही. तुम्हाला जे काही करायचे आहे ते नंतर ठरवू. पहिला अतिक्रमण काढायचे ठरवा.

**जुबेर इनामदार :-**

साहेब हा चांगला विषय आहे. १२२ चे जे आरक्षण आहे त्याचा मुळ मालक कोण? याचा शोध आधी लावा. त्याला आमच्य माहितीप्रमाणे आरक्षण ताब्यात आल नाही आणि त्याला टी.डी.आर देऊन टाकला. १२२ आरक्षण आहे ते सामाजिक वनीकरण आणि मैदान हे दोन भाग आहेत त्याचे दोन लेखाशिर्षक आहेत. सामाजिक वनीकरणाचे क्षेत्र किती ते सिध्द झालेले नाही. मैदानाचे किती ते सिध्द झाले नाही. याच्या आधी हा विषय परत म्हणजे आगरी समाजाचा नंतर परत आम्ही एक ठराव करुन पाठवलेला आहे. शासनाकडे की याचा निकाल लावून द्या. म्हणजे १०० टक्के हा वादग्रस्त राहणार सामाजिक वनिकरणाचा विषय. शासन कोणत्याही स्तरावर मंजुर करणार नाही हे १०० टक्के.

**जयंतीलाल पाटील :-**

म्हणजे अस झालेल आहे का आगरी समाजाला कुठेतरी गुड लावण्याचे काम करत आहात तुम्ही.

**जुबेर इनामदार :-**

म्हणजे याचा अर्थ हाच झाला विषय चांगला आहे. उद्देश सिध्द होत नाही.

**जयंतीलाल पाटील :-**

काका साहेब हा वादग्रस्त विषय होता की नाही. तुम्हाला माहित होतं.

**जुबेर इनामदार :-**

तुम्हाला आगरी समाजाला काहीच द्यायचे नाही आहे. फक्त त्यांचा वापर करुन घेत आहेत. ह्या शहराचे ते भुमिपुत्र आहेत. त्यांचा तो अधिकार आहे.

**मा. उपमहापौर :-**

संख्येने आम्हीच जास्त भुमीपुत्र आहोत.

(सभागृहात गोंधळ)

**रोहिदास पाटील :-**

महापौर मॅडम सभागृहात आलेला विषय मिरा भाईंदरचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. मिरा भाईंदर या सुवर्ण भुमीमध्ये जे आले त्यांना सगळ्यांना सामावून घेतलं. कोणी व्यापारी झाले कोणी व्यवसायिक झाले, कोणी उच्च शिक्षीत झाले सगळ्यांचे एकमत झाले की बाबा ह्या शहरामध्ये आगरी भवन व्हावे. आगरी कोळी ही वस्ती आधीपासूनची अनेकांची समाज भावना झाली आणि आगरी समाजाचे समाज भवन नाही हा एक विषय सुरु झाला आणि जस मॅडमने सांगितल की अनेक लोकांनी याच्यामध्ये आयुक्त साहेब अगदी सरळ हातांनी ३-४ महिन्यामध्ये जवळ जवळ दिड कोटी रुपये जमा केले. ते बँकेत ठेवले रितसर महापालिकेकडे अर्ज केला. महापालिकेने आरक्षण क्र. १२२ मधील २ एकर जागा आरक्षणामधून मिळावी म्हणून एकमताचा ठराव केला त्यांनी ३७ केले जे काही करायचं ते आणि साधारण संपूर्ण गावांची अशी अपेक्षा होती हा राजकीय विषय नव्हता याला जे शिफारस पत्र होती ती ज्या पॉलिटिकल पार्टीमधून कॉंग्रेस असू दे, राष्ट्रवादी असु दे, शिवसेना असु दे, आमदार, खासदार, मान्यवर माजी आमदार माजी खासदार अशा सगळ्यांची शिफारस पत्र जोडलेली होती. त्यामुळे हे प्रकरण नक्की मार्गी लागेल असच सगळ्यांची खात्री होती. एक ह्याचे दुर्देव होत जो निर्णय आला तो आरक्षण बदलल नाही. इतर लोकांमध्ये नाराजी झाली संताप झाला, आक्रोष व्यक्त झाला. अनावधानाने पुन्हा ह्या निवडणूका आल्या मला ह्या सभागृहाला आश्वासित करायचे आहे की शंका कुशंका त्यांच्या भावनेबरोबर आम्हाला आदर आहे की त्यांचेच पैसे त्याचे पैसे याच्यामध्ये आहेत. त्यांना बोलायला अधिकार आहे ती तळमळ त्यांना आहे हे ही खर आहे. त्यांनी जसा विषय मांडला की बाळासाहेबांचे स्मारक त्याच्याशी आम्ही त्याला संमती दिलेली आहे. आम्ही त्यांच्या बरोबरच आहेत. आजही हे सभागृह दोन्ही विषयामध्ये कुठेही डाव उजव नाही याच्यामध्ये दोघांचा भावना सद्‌भावनाच अहेत. आमच अस म्हणणे आहे आपल ते असायला पाहिजे. आपले ज्या राज्याचे मुख्यमंत्री कोणत्या कान्याकोपऱ्यात नाहीत. मुख्यमंत्री मिरा भाईंदरमध्ये येऊन १५ हजार लोकांच्या सभेमध्ये त्यांनी आश्वासन दिलेले आहे. आगरी समाजासाठी आम्ही २ एकर जागा देणार. हे मुख्यमंत्र्यांनी आश्वासित केलेले आहे ही सभा आता साहेब ६ हजार मीटर १.५ एकर जागेची मागणी करतो यांनी जी आमची भावना आहे की काही पाव गुंठ्यासाठी अर्धा एकरसाठी ते बाळासाहेबांचे स्मारक ही कुठे अडवू नये. टोटल आपला प्लॉट आहे १० एकरचा प्लॉट आहे साहेब. १० एकर प्लॉट पैकी १.५ एकर जमिन आपण आगरी समाजाला देण्याचा ठराव करतो. माझी सभागृहाला विनंती आहे आयुक्त साहेब तुम्हालाही विनंती आहे तुम्ही हे प्रकरण कस चालवायचं काय करायचे तुम्हीही मार्गदर्शन करा, सहकार्य करा. आमच्या सगळ्यांचा सद्‌भावना आहेत असायला पाहिजे असा माझा आग्रह आहे. सगळे मित्र जे

आहेत पक्षाचे पदाधिकारी आहेत त्यांचा निर्णय त्याच्या परिने ते घेतील पण आमची समाज बांधव म्हणून ही विनंती आहे आणि सभागृह नेता म्हणून ही विनंती आहे की हा ठराव एकमताने व्हावा आणि आपण विश्वास ठेवू या की मी तर अवधी पण सांगतो. तुम्हाला ६ महिन्याच्या आत त्या जागेवर ताबा घेऊन आपण कामकाज चालू करुया. त्या गावात अस दाखवूया की थोडा उशीर झाला भले उशीर झाला पण साहेब असेही आमच्या वाट्याला कधी कधी आमच्यातही मतभेद होतात. पण एवढे मोठे प्रकरण होऊन सुध्दा लोकांनी खिशातले पैसे देऊन सुध्दा कोणीही अजून त्याच्यावर ब्र शब्द काढला नाही. समाज एकसंघी आहे. माझी एवढीच भावना आहे की लवकरात लवकर निर्णय लागावा. समाज भवनच भुमीपुजन व्हावे स्वरुप यावे आणि खात्री देतो साहेब तुम्हालाही आश्चर्य वाटेल तुमच्या कारर्किदीत झाल तर लोक एवढे पैसे द्यायला तयार आहेत. त्या लोकांची याच्यामध्ये भावना आहे. आम्ही एक सांगतो की याच्यावरती आम्ही पैसे घेतलेले फक्त आगरी लोकांचेच घेतलेले आहेत. अन्य समाजांची लोकांची भावना आहे काका म्हणजे अस म्हणत आहेत की आम्हाला या मातीने साथ दिलेली आहे आमचे जे कर्तव्य आहे आम्ही शुन्यांतरीकडे उभे राहिलेलो आहोत. जास्तीत जास्त आम्ही निर्देश देऊन तुम्ही जो टाईम ठरवाल आमचा ११ कोटीचा तो बजेट आहे आणि सर्व धर्मासाठी आहे. त्यामध्ये आम्ही बहुउद्देशीय ते भवन बांधत आहोत ते एक कोणी त्याच्यात संकुचित नाही उद्देश पूर्ण पारदर्शक आहे. सर्व समाजाचा सर्व धर्माच्या लोकांना जे योग्य आहे सामाजिक त्याला आम्ही प्रयत्न करणार आहोत. असा आमचा उद्देश आहे पुन्हा एकदा मी महापौरांच्या वतीने सभागृहाच्या वतीने विनंती करतो.

**प्रविण पाटील :-**

त्या जागेवर ह्यापूर्वी पूर्ण जागेचे आरक्षण काय आहे त्याचे क्षेत्र महापालिकेच्या ताब्यात किती आलेले आहे आणि त्याच्यानंतर ह्याच सभागृहामध्ये असे ठराव झाले आहेत की, त्याच जागेवर मा. बाळासाहेब ठाकरेंचे कलादालन व्हाव असे असताना देखील त्या कला दालनाचे डी.पी.आर. तयार झाले त्याची बजेट मंजुरी झाली शासनाकडे पत्रव्यवहार झाला ह्या सभागृहाने ठराव केला आणि तो शासनाकडे पाठवला. ही सर्व असताना त्या जागेचा दुसरा वाद आहे आरक्षणाचे झोनल केव्हा होणार ते शासनाचे निर्देश आले काका हे सगळ तुम्हाला माहिती आहे सभागृहाला माहिती आहे की ह्या जागेत काय होणार होत काय आहे. काय मागणी आहे तरी पण फिरुन फिरुन तुम्ही ह्याच जागेवर मागणी कशी करता दुसरी जागा आहे.

**मा. उपमहापौर :-**

प्रविण पाटील साहेब मी तुम्हाला सांगतो आपला प्रॉब्लेम कसा झालेला आहे आपण ठराव व्यवस्थित ऐकत नाही ज्याअर्थी आम्ही ठराव आणलेला आहे त्याअर्थी याच्यामध्ये आमचे धोरण निश्चित झालेले आहे. ठरावाची मुळ प्रत आहे तुम्ही ते क्षेत्र वाचा की एकूण आरक्षित क्षेत्र किती आहे त्यातुन ६ हजार चौरस मिटरचे क्षेत्र हेच फक्त आपण आपल्यासाठी मागितलेले आहे रस्त्यालगतच ओपन क्षेत्र जे आहे त्याच्यामध्ये करायच आणि काकांनी एक शब्द वापरला की येणाऱ्या ६ महिन्यात हे निश्चित असेल याच्यात दुमत असायचे कारण नाही.

**प्रविण पाटील :-**

उपमहापौर साहेब त्या जागेचे एकत्र एकूण क्षेत्र तुम्हाला सांगतो एकूण असलेले क्षेत्र त्याच्यामध्ये बांधकाम क्षेत्र जेवढे आहे. योग्य असलेले त्याच्यामध्ये मला वाटत १५ टक्के बांधकाम योग्य क्षेत्र आहे त्याच्यावरच कलादालन बनणार होत इतर जागेवर नाही बनणार.

**मा. उपमहापौर :-**

४६७०० चौरस मिटरचे क्षेत्र आहे.

**प्रविण पाटील :-**

जे आरक्षण आहे त्याचे बांधकाम योग्य क्षेत्र १५ टक्के आहे त्याच्यावरच कलादालन बनणार होते.

**स्नेहा पांडे :-**

बांधकाम क्षेत्र १५ टक्के है।

**प्रविण पाटील :-**

१५ टक्के भेटल त्याच्याखाली कलादालनाचा प्रस्ताव आहे. प्रस्ताव १५ टक्केचाच आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब काय झाले आहे. दोन्ही विषय १२२ मध्ये मैदान आणि सामाजिक वनिकरण सोशल फॉरेस्टी हा विषय निश्चित असल्यामुळे त्याच्या मार्गदर्शनासाठी ठराव करुन शासनाकडे पाठविलेला आहे. त्याची अजून मंजूरी प्राप्त नाही. त्याच्याकडून शासनाकडून आजपर्यंत कुठलेही उत्तर आलेले नाही. म्हणून हे क्षेत्र निश्चित करणे कठीण झालेले आहे. १५ टक्केचे क्षेत्र असणार आहे काका तो कोणता? सामाजिक

वनिकरणाचा असणार आहे की मैदानाचा असणार आहे दोन्ही आरक्षण मिश्र करुन तो प्रस्ताव शासनाकडे ठरावाच्या अनुषंगाने आपण पाठविलेला आहे. त्याची माहिती अजून आपल्याकडे प्राप्त नाही. शासन उत्तर देणार नाही. तुमचा नविन डी.पी. चे काम सुरु आहे. म्हणजे याचा अर्थ असा झाला की फक्त तो विषय प्रलंबित ठेवायचा काका आरक्षण बदला. आगरीभवन झालेच पाहिजे.

**सुरेश खंडेलवाल :-**

महापौर मॅडम, जुबेर भाई बिलकुल सही बोले। अभी मैं यह बोल रहा था की सभी की पुरे सभागृह की भावना है, सभी के विचार सुने सभी की इच्छा है की आगरी भवन बनना चाहिए। आगरी समाज के लिए जगह मिलनी चाहिए। तो मेरा एक अनुरोध है की जैसे अभी काकाने बताया की सी.एम. साहब पिछली बार आये थे तो उन्होंने भी हमको सबको आश्वासन किया था की आगरी भवन के लिए जमिन देने के लिए और साथ साथ में जैसे अभी हमारे मित्रने कहाँ की आयुक्त महोदय मेरा आपसे भी निवेदन है पुरे सभागृह के माध्यम से की अभी नया डी.पी. का काम चालु है तो कही ना कही आप हम सबकी भावनाओं को नजर में रखते हुए डी.पी. के अंदर यदी संभव हो तो आगरी भवन के लिए कोई जगह ऐसा सुव्यवस्थित जो है ना की जिसमें किसी भी तरह का किसी का कोई आक्षेप ना हो तो इसको भी यदी आप विचार में करके सभी की भावनाओ का ध्यान में रखते हुए और बहुत सारे ऐसे प्रस्ताव है की ३७ के अंडर में हमने मंत्रालय में आपने भेजे है उन सभी का ध्यान रखते हुए सभी की भावना की कदर करते हुए।

**प्रविण पाटील :-**

डी.पी. चे असेल तर डी.पी. मध्ये टाका ती जागा कशाला देतात डी.पी. मध्ये दुसरे निवेदन करा. ती जागा नका देऊ.

**सुरेश खंडेलवाल :-**

डी.पी. महासभेमध्ये येणार आहे मग आपण नंतर करु.

**प्रविण पाटील :-**

एकाच जागेचे तुम्ही दोन प्रस्ताव पाठवले शासनाला पहिला प्रस्ताव आहे बाळासाहेब दालनाचा झालेला आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

जेवढे पण ३७ खाली प्रस्ताव शासनाला पाठविले आहेत ते सर्वांचे लक्ष घेऊन डी.पी. मध्ये जर होत असेल तर ते आयुक्त महोदयांना आपल्या सर्वांच्या मदतीने निवेदन करतो.

**प्रविण पाटील :-**

आयुक्त साहेब ह्या जागेचा पूर्वी शासनाकडे प्रस्ताव गेलेला आहे. हा दुसरा प्रस्ताव पाठवता ही वादग्रस्त जागा आहे.

**जुबेर इनामदार :-**

इरादा जाहिर झालेला आहे डी.पी. तयार करायचा दिड दोन वर्ष त्याच्यावर काम चालु आहे. ह्या शासनाला याची जाणीव आहे अशा परिस्थितीत शासन हस्तक्षेप करेल का कुठल्या आरक्षण बदलण्यामध्ये किंवा मिश्र आरक्षण आहे. त्याला कसा वेगवेगळा करायचा ते तसेच मार्गदर्शन देईल. तुम्हाला नविन डी.पी. होणार आहे. त्याच्यामध्ये तुम्ही बघा काय करायच. आमच्याकडे मंजुरीसाठी पाठवून द्या. म्हणून सन्मा. रोहिदास काका साहेब आरक्षण बदललं तर आगरी भवन तुमचे आज निश्चित होईल. १२२ आरक्षणाच्या अडचणीत राहिलात तो तसाच गोंधळ जो आहे तो तसाच राहणार.

**सुरेश खंडेलवाल :-**

साहेब अडचणीत राहणार नाही.

**प्रविण पाटील :-**

आमच्या नेहमी शुभेच्छा पण आहेत. पण काम होण्यासाठी शुभेच्छा असते.

**गिता जैन :-**

महापौर मॅडम आताच खंडेलवालजीने सांगितल खुप चांगला डी.पी. होणार आहे. माझ्या मनात एक विचार आला इथे आपण तुम्ही पण अर्धे एंटर आहातच तर जैन समाज अल्पसंख्यांक आहे. मग एखादा कोळी समाज तर बाबा खुप श्रीमंत आहे. ११ करोड तर जमा पण केले. आम्ही जैन तेवढे श्रीमंत नाही आहोत. म्हणून एखादा भुखंड माझी सुचना अशी आहे की जैन समाजासाठी पण करायचे नविन डी.पीमध्ये. तर माझी सुचना घ्यावी. जैन समाजासाठी पण एखादा भुखंड तिथे आरक्षण करुन ठेवावे.
(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

हे बघा आगरी कोळी समाजाचे ह्या शहराला ह्या सगळ्या लोकांना स्विकारलेले आहे. तस हे आगरी भवन जे बनणार आहे ते ही सगळ्यांना स्विकारेल. सगळे समाज तिथे पोहचु शकतील. त्याच्यामुळे सगळ्यांनी वेगवेगळे मागायची काही गरज नाही.

**गिता जैन :-**

वैती साहेब आपल्या माहितीसाठी आगरी कोळी समाजाचे जे जेवण असते ते कदाचित जैन बघत पण नाहीत. म्हणजे तुम्ही जर एखाद्या वेळी सांगितल की आगरी कोळी समाज जर.......

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

विषय डायव्हर्ट हो रहा है सबजन बैठ जाईए।

**गिता जैन :-**

माझा सांगायचा अर्थ बिलकुल असा नाही तुमचा अपमान करायचा आमच्या सांगायचा आशय असा होता की जे नॉन व्हेज तुम्ही खातात आम्ही नॉन व्हेज खात नाही म्हणून हे आम्हांस चालत नाही.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

गिताजी आप बैठ जाईए। सब लोग बैठ जायेंगे आपका ठराव होगा तो आप मांडीए।

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम ह्या ठिकाणी सर्वांची मागणी झाली. जैन समाजाची मागणी झाली मी देखील मराठा समाजासाठी मिरा भाईंदर महापालिकेत मराठा समाजासाठी महासंघ आहेत मराठा समाजाला देखील ह्या ठिकाणी आपला डी.पी. बनता आहे. त्याच्यामध्ये मराठा महासंघाला देखील जागा उपलब्ध करुन द्या कारण तशी मागणी आम्ही केलेली आहे.

(सभागृहात गोंधळ)

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम सदर जे आगरी भवनासाठी जी जागा आपण प्रस्तावित करत आहोत बाळासाहेब ठाकरे स्व. हिंदुह्द्‌य सम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे सांस्कृतिक भवन व कलादालन. कलादान उभारणेस काहीही हरकत होणार नाही आणि इथे या आरक्षणामध्ये बाळासाहेब ठाकरेंचे कलादालन होणार म्हणजे होणार या मताशी आम्ही सहमत आहोत.

**प्रविण पाटील :-**

त्याच क्षेत्रफळ निश्चित करा.

**जुबेर इनामदार :-**

क्षेत्रफळ निश्चित करुन सांगा तुमच्या अधिकारात असेल तर. दिशाभुल करायचा प्रयत्न करु नका. ठरावाच्या माध्यमातून.

**धृवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम ॲप्रोसिमेटली भेटली ४० हजार चौ. मीटर जागा याच्यामध्ये अव्हेलेबल आहे. आरक्षणामध्ये याच्यातली फक्त ६ हजार आपण घेत आहोत बाकी उर्वरीत जी आहे ती बाळासाहेब ठाकरे कलादालनसाठी..........

(सभागृहात गोंधळ)

**रोहिदास पाटील :-**

तो प्रस्ताव गेला आहे तुम्हाला माहिती आहे का किती गेला ते माहिती असेल तर तेही सांगा. विषय ट्वीस्ट करण्यात काही फायदा नाही त्यालाही विरोध नाही. ह्यालाही विरोध नाही असे स्वयंस्पष्ट असा आपण ठराव मांडलेला आहे. ते झाल पाहिजे असे ॲग्री करायला काही हरकत नाही.

**तारा घरत :-**

काका जिथे क्लियर आरक्षण असेल तिथे मागा ना. एखादी चांगली जागा आगरी समाजाला मागा. काका तिथे मस्जीद आहे उद्या प्रॉब्लेम होईल. उद्या त्यांना पण त्रास नाही आणि आम्हाला पण त्रास नाही.

**प्रविण पाटील :-**

याच्यामध्ये असे आहे असलेल्या राखीव क्षेत्रफळाचा १५ टक्के जागा अनुज्ञेय बांधकामासाठी १५ टक्के मध्ये तुम्ही आगरी भवन बनविण्यासाठी तिथे किती जागा मंजूर केलेली आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

फक्त ४ च्या................

**प्रविण पाटील :-**

मग त्याच्यात ते बसत का त्याच्यामध्येच सगळ जात याच्यात बाळासाहेब उद्यान तुमच कस बनेल.

**मा. उपमहापौर :-**

तुम्हाला एकच सांगायच आहे की तुम्ही ठराव मांडा. आम्ही केलेल काम चुकीच नाही एवढ ठामपणे सांगतो.

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम, निवेदन हे आपले पाहिजे सभापती आणि नगरसेवक निवेदन देतील हे निवेदन तुम्हाला मान्य होईल का? महापौर मॅडम हा आपला अधिकार आहे.

**मा. महापौर :-**

तुमच्या ठरावात मांडा तुम्हाला काय मांडायच आहे मांडून घ्या.

**प्रविण पाटील :-**

महापौर मॅडम दोन्ही विषय परत तुम्ही तेच सांगता आरक्षण आहे ६ हजार जागेचे त्याच्यामध्ये १५ टक्के जागा अनुज्ञेय बांधकामासाठी आणि ठराव मांडला आगरी समाजाच्या दोन एकरची बांधकामासाठी.

**रोहिदास पाटील :-**

२००० आधी मागणी केली होती आता आपण ६ हजार मीटर आपण मागणी म्हणजे दिड एकर ते दिड एकर का कारण की त्याचेही ते उत्तर देतील ६ हजार चौरस मीटर.

**प्रविण पाटील :-**

आणि तुम्ही बाळासाहेब कला दालनासाठी बांधकामासाठी किती देणार?

**रोहिदास पाटील :-**

कलादालनाची तुम्ही मागणी करा.

**प्रविण पाटील :-**

मी तुम्हाला तेच सांगत आहे की जागा पूर्ण कलादालासाठी आता तुम्ही सांगत आहात. आम्ही कलादालन पण बांधू आम्ही आगरी भवन पण बांधू.

**रोहिदास पाटील :-**

आयुक्त साहेब टोटल जागा ६ एकर आहे.

**प्रविण पाटील :-**

तुम्हाला खरोखर करायच असेल तर क्लिअर करुन सांगा की एवढी जागा आम्ही कलादालनासाठी एवढी जागा आगरी भवनसाठी देत आहोत.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

प्रविण पाटील साहेब तुमचा ह्या ठरावाला विरोध आहे का? विरोध असेल तर ठराव मांडा.

(सभागृहात गोंधळ)

**दिप्ती भट :-**

आमचा विरोध भुखंडाला आहे. आमचा ठरावाला विरोध नाही.

**मा. उपमहापौर :-**

तुमच्याकडे जो भुखंड उपलब्ध आहे त्याचा ठराव करा.

**तारा घरत :-**

मग तुम्ही बहुमत देणार का आम्हाला.

**प्रविण पाटील :-**

महापौर मॅडम गेल्यावेळेला सर्वानुमते आपणही नगरसेवक होता आपणही हात वर केलेला होता. सदरची जागा आपल्याही ठरावामध्ये की ह्या जागेमध्ये बाळासाहेब ठाकरे कलादालन व्हाव अशी आपली ही मागणी आहे असे असताना देखील आज तुम्ही दुसरा ठराव करता. त्याच जागेवरती म्हणजे आगरी समाजाला कुठेतरी गोलगोल फिरवून काम करता.

**मा. महापौर :-**

करायचे असेल तर तुम्ही ठराव करुन टाका.

**प्रविण पाटील :-**

आम्ही ठराव तर करु. पण तुमचे जे म्हणणे आहे ते तर स्पष्ट सांगा.

**सुरेश खंडेलवाल :-**

माजी उपमहापौर साहेब तुम्ही उपमहापौर असताना ते केलं तुम्ही आता कशाला वारंवार विचारता तुम्ही उपमहापौर असताना केल ना. आता तुम्हाला आम्ही मंजुर करुन दाखवणार. आम्ही मंजुर करुन घेउ महापौर मॅडम पुढचा विषय घ्या.

**प्रभात पाटील :-**

महापौर मॅडम खरतर हा विषय तुम्ही बोलता तसा नविन नाही विरोधी पक्ष बोलत आहे तसा हा विषय नविन नाही हे रिझर्व्हेशनमध्ये आधी बाळासाहेब ठाकरे मला असे वाटते की स्व. प्रमोद महाजन हे झालेले विषय आहेत त्याच्याबरोबर आगरी समाजाचा ठराव सुध्दा त्याच भुखंडात झालेला आहे. आपण सगळे जण त्यावेळेला होतो कर्म धर्म संयोगाने आगरी भवनचा विषय मंजुर झाला नाही. परंतु एक लक्षात घ्या तुमच्या भावना आमच्यापर्यंत पोहचतात आणि आपल्या सगळ्यांच्या भावना त्यांच्यापर्यंत पोहचत असतील की आगरी समाजाच भवन व्हायला पाहिजे. ह्या मताशी सगळे जण ठाम आहेत. आपण दुसरा एक प्रयत्न करायला काय हरकत आहे. आपण दुसऱ्यांदा पुन्हा ठराव करतो. याचे कारण एवढेच आहे की मा. मुख्यमंत्री ह्या शहरात येऊन गेल्यानंतर त्यांनी इथल्या १५ लाख लोकसंख्येला संबोधुन गेले की मला आगरी समाजासाठी काही तरी करायचे आहे. आणि मला अस वाटत की एखाद्या मोठ्या व्यक्तीचा शब्द असेल मला वाटत ते पाळतील. आणि कदाचित मागे जो ठराव झाला नाही. त्याला कदाचित त्या प्राधान्याने मंजुरी सुध्दा देतील. तुमचा आमचा इश्यु काय आहे आगरी भवन व्हायलाच पाहिजे आपण एक ठराव करुया यापुढे जर आपले हे ठराव माघारी आला मंजुरी नाही मिळाली तर आपण सगळे पुन्हा करुया. आपण सगळे पुढे जाऊ होणार होणार निश्चित होणार ह्या एका ठरावाच्या बाजुने बोलताना अस बोलावस वाटत की मा. मागचे महापौर त्या जेवणावर काय घसरले त्या खाण्यावर काय घसरले मला कळल नाही. त्या मागच्या वेळेला सुध्दा याचा मोठा इश्यु झालेला जो अख्या महाराष्ट्रामध्ये पेटला होता. कोणी काय खावं आणि कोणी काय बघु नये.

(सभागृहात गोंधळ)

**प्रभात पाटील :-**

खाण्यावर बोलण्यासाठी ही महासभा नाही त्या खाण्याबद्दल चर्चा करण्यांना मी असे म्हणेन की गुजराथी मारवाड्यांनी नॉन व्हेज खाल्ले नाही आमच्या मच्छीचा भाव एवढा वाढला आहे.

**नयना म्हात्रे :-**

यांनी यांचा शब्द मागे घ्यावा महापौर मॅडम.

**गिता जैन :-**

एखादा जैन कधीच नॉन व्हेजकडे बघत नाही.

**जयंतीलाल पाटील :-**

तुमचा शब्द मागे घ्या.

**गिता जैन :-**

मी तेच बोलली की मी ठाम आहे की एखादा जैन नॉन व्हेजकडे बघत नाही.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सर्वजण बसून जा. विषय डायव्हर्ट होत आहे. सर्व सदस्यांनी बसून जा. विरोधी पक्ष तुमचा ठराव असेल तर तो तुम्ही मांडा. आणि विषयावर सर्वांनी चर्चा केलेली आहे आता तुमचा निर्णय घ्या.

**प्रविण पाटील :-**

महापौर मॅडम आपण केलेला ठराव तो मंजुर होणारच आहे. तुम्ही करणारच आहात. आपल्याला एक विनंती आहे संबंधित अधिकाऱ्याला बोलवून ती जागा किती आहे.

**मा. महापौर :-**

ते आपल्याला सांगितलेले आहे. सभागृहात सुचविलेले आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

महापौर मॅडम पुढचा विषय सुरु करा.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सर्व सदस्यांना विनंती आहे की सर्व आपआपल्या जागेवर बसून जा.

**सुरेश खंडेलवाल :-**

महापौर मॅडम दुसरे पण भरपूर विषय आहेत. शहराच्या विकासाच्या दृष्टीने ते पण महत्वपूर्ण आहेत म्हणून माझे सर्व सन्मा. सदस्यांना अनुरोध आहे की प्लिज ह्या विषयावर महापौर मॅडम आपण एक तास चर्चा करतो मला अस वाटत की दुसरे पण भरपूर विषय आहेत. शहराच्या विकासाच्या निगडीत महापौर मॅडम आपण ठराव मंजुर करुन घ्या आणि पुढचा विषय घ्यायला लावा.

**मा. महापौर :-**

विरोधी पक्षनेता आणि काका तुम्ही विचारुन घ्या.

**मा. उपमहापौर :-**

सर्व सदस्यांनी कृपया आपआपल्या जागेवर बसून घ्यावे.

**मा. महापौर :-**

सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे तुमचा ठराव आहे तर तुम्ही मांडा.

(सभागृहात गोंधळ)

**प्रविण पाटील :-**

महापौर मॅडम थोडा इतिहास सांगतो ह्या वेळेला गेल्यावेळेला भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनेची युती होती. गिता मॅडम महापौर होत्या, मी उपमहापौर होतो. मा. आमदार प्रताप सरनाईक यांनी प्रस्ताव आणला कलादालन व्हाव बाळासाहेब ठाकरे यांचे त्याच जोडीला आम्ही प्रस्ताव आणला त्यावेळी बी.जे.पी चे सदस्य आम्हाला भेटले आणि बोलले हा चांगला प्रस्ताव आहे. आमचे तुम्हाला अनुमोदन आहे. सर आमची पण एक इच्छा आहे की मा. प्रमोद महाजनचे पण याच्यामध्ये कलादालन व्हावे. आजची परिस्थिती आहे आपण सत्तेमध्ये आलात. शिवसेनेचे सदस्य विरोधात आले बाळासाहेबांचे, प्रमोद महाजनांचे कलादालन झाले बाळासाहेबांचा आज विषय आला पध्दतशीरपणे बाजू ठेवला त्याच्याबद्दल हा इतिहास तुम्हाला सांगतो. त्या सत्तेत होतो युतीमध्ये होतो. पहिला प्रस्ताव आमचा होता. १२२ आरक्षणमध्ये बाळासाहेबांच त्यामुळे प्रमोद महाजन महाजनांच जोडीला सुचना दिली आणि ती मंजुर करुन घेतली आजची परिस्थिती अशी आहे आपण सत्तेमध्ये गेलात ही इथे नाही महाराष्ट्र शासन आणि केंद्रामध्ये पण तीच परिस्थिती आहे. परंतु परिस्थिती तीच राहत नाही बदलत जाते हा इतिहास सांगतो.

**मा. महापौर :-**

ठिक आहे आता आपला ठराव वाचा.

(सभागृहात गोंधळ)

**स्नेहा पांडे :-**

महापौर मॅडम १२२ नंबर आरक्षण के कब से एक घंटे से चर्चा हो रही है। उसमें चाहे बाळासाहेब कलादालन बने या आगरी भवन बने वह विषय नही है। मेरी एक विनंती थी की १२२ में बहुत ही गंदगी है। बहोत जंगल है बीच में नोव्हेंबर डिसेंबर में एक छोटी बच्ची का किडन्याप हुआ था वह तो मील गई अच्छी बात है। उसके पहले एक भिवंडी से बच्चे को मर्डर करके लाके यहाँ १२२ आरक्षण में फेका गया था। उसके एक साल पहले ३ साल की बच्ची का मर्डर हुआ था। उस विषय पे हम लोग कमिशनर साहब के पास संबंधित अधिकारी के पास नगररचना के पास बारबार जाते है। २-३ साल पहिले कुछ ऐसा ठराव भी हुआ था की कुंपणभिंत मारके और गेट बनाके लेंगे जो अपनी ताबे मे जगह है बाकी को अतिक्रमण हुआ है। लेकिन आज तक उस विषय पे कोई भी चर्चा नही हुई नाही वह कुंपण वॉल बनाया गया नाही गेट लगाया गया, नाही कोई सेक्युरिटी है और हमारी साथी नगरसेविका तारा मॅडम उस टाईम उपोषण पे भी बैठी थी। तभी भी उन्हें वचन दिया गया था की कुंपणभिंत मारके गेट लगाके सेक्युरिटी बिठाई जाएगी। आज उस आरक्षण की परिस्थिती ऐसी स्थिती है की अपने सिव्हरेज गटार की बडी बडी पाईप डम्प है इतनी गंदगी है की वहाँ के परिसर के लोग गोल्डन नेस्ट, न्यु गोल्डन नेस्ट वहाँ का जो परिसर है वहाँ के लोग शाम को ७-८ बाद वहाँ से जाने से डरते है। तो उस विषय पे पालिका का ध्यान कभी नही जा रहा है की उसकी सुरक्षा के लिए कुछ व्यवस्था किया जाए या आगे अतिक्रमण नही बढे उसके लिए भी व्यवस्था किया जाए। यह टेक्नीकल विषय है यह जब निर्णय आएगा उसके पहले उसकी सुरक्षा और कुंपण भिंत मारने का प्रावधान किया जाए।

**मा. महापौर :-**

ठिक है।

**प्रविण पाटील :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना क्र. टीपीएस-**1296/847**/सीआर-**162/96**/युडी-**12**, दि.**14/05/97** अन्वये मंजूर करण्यात आलेली असून दि.**15/07/97** पासून अंमलात आलेली आहे . वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र . टीपीएस-**1298/941**/सीआर-**89/98**/युडी-**12**, दि.**25/08/2000** अन्वये मंजूर झालेली असून दि .**15/10/2000** पासून अंमलात आलेली आहे . मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र . टिपीएस-**1208/1346**/प्र.क्र.**267/08**/नवि-**12**, दि.**29/08/2009** अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आ .क्र. **122** हे आरक्षण **"Playground & Social Forestry"** [खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण ] या नावाने प्रस्तावित असून मंजूर विकास योजनेप्रमाणे सदर आरक्षणाचे एकूण क्षेत्र **46700.00** चौ.मी. आहे. यापैकी **35182.60** चौ .मी. महानगरपालिकेच्या ताब्यात असून सदर आरक्षणातील **2.0** एकर जागा आगरी समाज उन्नती संस्था यांना भाडेतत्वावर देणेसाठी व भाडे निश्चित करणेबाबत मा . महासभेची मंजूरी आवश्यक असल्याने यापुर्वी तत्कालीन महासभेस दि .**20/07/2011** रोजी गोषवारा सादर केला होता . त्याअनुषंगाने दि.**29/07/2011** (दि.**20/07/2011** ची तहकूब सभा ) रोजीच्या मा. महासभेने सदर प्रकरणी महाराष्ट्र नगररचना अधिनियम **1966** च्या कलम **37(1)** अन्वये आरक्षणात फेरबदल करणेचा प्रस्ताव शासनाकडे सादर करणेसाठी ठराव क्र. **42** अन्वये मंजूरी दिलेली आहे. सदर ठरावाप्रमाणे नियमाप्रमाणे सर्व वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन मंजूरीसाठी मा . शासनास पत्र क्र . मनपा/नर/**4104/2011-12**, दि.**28/03/2012** अन्वये सादर करणेत आला असता सदर प्रकरणी अनुषंगाने मा . शासनाने शासन निर्णय क्र. टिपीएस-**1213/1813**/प्र.क्र. **231/13**/नवि-**12**, दि.**30/01/2014** अन्वये सदर फेरबदलाचा प्रस्ताव नामंजूर केलेला आहे.

**तसेच सदरचे आरक्षण क्र.122 (खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण) या आरक्षणामध्ये हिंदू हृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे सांस्कृतिक भवन व कला दालन उभारणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास आर्थिक मंजूरी मा. महासभा दि. १९/ /२०१७, प्रकरण क्र. ६ ठराव क्र. ६ अन्वये प्राप्त आहे. सदर आरक्षण मिश्र स्वरुपाचे असल्याने त्यामध्ये अनुज्ञेय बांधकामा क्षेत्र (१०% तळ + ५% पहिला मजला) यांच्या मर्यादित बांधकाम करणेसाठी व त्या अनुषंगिक मा. महासभेच्या ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेबाबत मार्ग दर्शन मिळणेसाठी शासनास पत्र क्र . मनपा/नर/२९००/२०१७-१८, दि. १८/११/२०१७ अन्वये विनंती करण्यात आलेली असून अद्याप मंजूरी प्राप्त नाही.**

**आगरी समाज या शहराचे भुमिपुत्र आहेत व इथेच त्यांची वंशावळ अस्तीत्वात आहे . २०११ पासून आगरी समाजासाठी संस्थेची जागा उपलब्ध करुन देण्याचा मानस असतानाही तांत्रिक अडचणींमुळे ते संभव होऊ शकले नाही . तरी आगरी समाज उन्नती संस्थेसाठी मनपा आरक्षणातली वाद/दावा नसलेली जागा उपलब्घ करुन देणे सन्माननीय आहे . आरक्षण क्र . २४६, ७०% जागा मनपाला हस्तांतरीत झालेली आहे . उपरोक्त विषयाच्या सारांशाचे अवलोकन केले असता आरक्षण क्र . २४६ आगरी उन्नती संस्थेसाठी देण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.**

**अर्चना कदम :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सचिव महोदय दोन ठराव आलेले आहेत. मतदान घ्या.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८१ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. रोहिदास पाटील. अनुमोदन श्रीम. प्रभात पाटील. दुसरा ठराव सुचक श्री. प्रविण पाटील, अनुमोदन श्री. हरिश्चंद्र आमगावकर. प्रथम दुसरा ठराव मतदानास टाकतो. सुचक श्री. प्रविण पाटील यांच्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. रोहिदास पाटील यांच्या ठरावाच्या

बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्री. रोहिदास पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ५५, विरोधात २६, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. सुचक श्री. रोहिदास पाटील यांचा ठराव बहुमतांनी मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ८१ :-**

**आगरी समाज उन्नती संस्थेस जागा देणेबाबत फेरप्रस्ताव सादर करणेबाबत.**

**ठराव क्र. ८१ :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना क्र. टीपीएस-1296/847/सीआर-162/96/युडी-12, दि.14/05/97 अन्वये मंजूर करण्यात आलेली असून दि.15/07/97 पासून अंमलात आलेली आहे . वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र . टीपीएस-1298/941/सीआर-89/98/युडी-12, दि.25/08/2000 अन्वये मंजूर झालेली असून दि .15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे . मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र . टिपीएस-1208/1346/प्र.क्र.267/08/नवि-12, दि.29/08/2009 अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आ .क्र. 122 हे आरक्षण "Playground & Social Forestry" [खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण ] या नावाने प्रस्तावित असून मंजूर विकास योजनेप्रमाणे सदर आरक्षणाचे एकूण क्षेत्र 46700.00 चौ.मी. आहे. यापैकी 35182.60 चौ .मी. महानगरपालिकेच्या ताब्यात असून सदर आरक्षणातील 2.0 एकर जागा आगरी समाज उन्नती संस्था यांना भाडेतत्वावर देणेसाठी व भाडे निश्चित करणेबाबत मा . महासभेची मंजूरी आवश्यक असल्याने यापुर्वी तत्कालीन महासभेस दि .20/07/2011 रोजी गोषवारा सादर केला होता . त्याअनुषंगाने दि.29/07/2011 (दि.20/07/2011 ची तहकूब सभा ) रोजीच्या मा. महासभेने सदर प्रकरणी महाराष्ट्र नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 37(1) अन्वये आरक्षणात फेरबदल करणेचा प्रस्ताव शासनाकडे सादर करणेसाठी ठराव क्र. 42 अन्वये मंजूरी दिलेली आहे. सदर ठरावाप्रमाणे नियमाप्रमाणे सर्व वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन मंजूरीसाठी मा . शासनास पत्र क्र . मनपा/नर/4104/2011-12, दि.28/03/2012 अन्वये सादर करणेत आला असता सदर प्रकरणी अनुषंगाने मा . शासनाने शासन निर्णय क्र. टिपीएस-1213/1813/प्र.क्र. 231/13/नवि-12, दि.30/01/2014 अन्वये सदर फेरबदलाचा प्रस्ताव नामंजूर केलेला आहे.

**आगरी समाज उन्नती संस्था यांनी 2 एकर जागा मिळणेबाबत महापालिकेस फेरविनंती केलेली असल्यामुळे आरक्षण क्र.122 खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण या आरक्षणाच्या एकुण 46700 चौ.मी. क्षेत्रामधून विकास योजना रस्त्यालगतचे 6000 चौ.मी. क्षेत्र हे या आरक्षणातून वगळून 40700 चौ.मी. क्षेत्र खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण या आरक्षणासाठी कायम ठेवणेसह यामधून वगळलेले 6000 चौ.मी. क्षेत्र आगरी भवन या प्रायो जनासाठी आरक्षित करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 नुसार फेरबदलाची कार्यवाही करणेसह त्या अनुषंगिक सर्व वैधनिक कार्यवाही पूर्ण करून अंतिम मंजुरीसाठी प्रस्ताव शासनास सादर करणेसाठीचे सर्व अधिकार सदरचा प्रस्ताव शासनाकडून मंजुर झाल्या नंतर अटीशर्ती ठरविण्या करीता प्रस्ताव पुन्हा मा. महासभेत ठेवण्यात यावा व पुढील कार्यवाहीकरीता मा. आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेकरीता हि मा. महासभा मंजुरी देत आहे.**

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील        अनुमोदन :- श्री. प्रभात पाटील**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजू यशवंत | |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | पाटील प्रविण मोरेश्वर | निरंक |
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | परेरा कॅटलीन एन्थोनी | |
| ५ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ५ | नलावडे दिनेश दगडु | |
| ६ | जैन गीता भरत | ६ | शिर्के अनंत गेणू | |
| ७ | पाटील प्रभात प्रकाश | ७ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| ८ | सिंह मदन उदितनारायण | ८ | सावंत अनिल दिवाकर | |
| ९ | भानुशाली वर्षा गिरधर | ९ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| १० | यादव मिरादेवी रामलाल | १० | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| ११ | हसनाळे ज्योत्सना जालींदर | ११ | घरत तारा विनायक | |
| १२ | गोहिल शानू जोरावर सिंह | १२ | कदम अर्चना अरुण | |
| १३ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | १३ | पाटील अनिता जयवंत | |
| १४ | भोईर सुनिता शशिकांत | १४ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १५ | सोंस नीला बर्नाड | १५ | भट दीप्ती शेखर | |
| १६ | रावल मेघना दिपक | १६ | गुप्ता कुसुम संतोष | |
| १७ | मोकाशी दिपाली आनंदराव | १७ | भोईर भावना राजू | |
| १८ | जैन सुनिता रमेश | १८ | शेख रुबीना फिरोझ | |
| १९ | नाईक विविता विवेक | १९ | सपार उमा विश्वनाथ | |
| २० | भावसार वंदना संजय | २० | परदेशी गिता हरीश | |
| २१ | बेलानी हेमा राजेश | २१ | सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन | |
| २२ | भोईर विणा सुर्यकांत | २२ | पाटील नरेश तुकाराम | |
| २३ | सोनार सुरेखा प्रकाश | २३ | शेख अमजद गफार | |
| २४ | मुखर्जी अनिता बबलू | २४ | पाटील वंदना विकास | |
| २५ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २५ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| २६ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | २६ | भोईर कमलेश यशवंत | |
| २७ | म्हात्रे मोहन गोपाळ | २७ | अहमद साराह अकरम | |
| २८ | शाह राकेश रतिशचंद्र | २८ | बांड्या एलायस दुमिंग | |
| २९ | शेट्टी अरविंद आनंद | | | |
| ३० | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| ३१ | तिवारी अशोक सूर्यदेव | | | |
| ३२ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | | |
| ३३ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ३४ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३५ | कांगणे मीना यशवंत | | | |
| ३६ | परमार हेतल रतिलाल | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३७ | **दळवी प्रशांत ज्ञानदेव** | | | |
| ३८ | **म्हात्रे विनोद काशिनाथ** | | | |
| ३९ | **म्हात्रे नयना गजानन** | | | |
| ४० | **भोईर जयेश भानुदास** | | | |
| ४१ | **शेट्टी गणेश गोपाळ** | | | |
| ४२ | **थेराडे संजय अनंत** | | | |
| ४३ | **राय विजयकुमार सिस्थन नारायण** | | | |
| ४४ | **जैन राजेंद्र भवरलाल** | | | |
| ४५ | **विराणी अनिल रावजीभाई** | | | |
| ४६ | **जैन दिनेश तेजराज** | | | |
| ४७ | **गजरे दौलत तुकाराम** | | | |
| ४८ | **मांजरेकर आनंद दत्ताराम** | | | |
| ४९ | **कासोदारिया अश्विन शामजीभाई** | | | |
| ५० | **दुबे मनोज रामनारायण** | | | |
| ५१ | **व्यास रवि वासुदेव** | | | |
| ५२ | **खंडेलवाल सुरेश जगदीश** | | | |
| ५३ | **पांडेय पंकज सूर्यमणि** | | | |
| ५४ | **भोईर गणेश गजानन** | | | |
| ५५ | **पारधी सुजाता यशवंत** | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८२, **भाईंदर (पूर्व) मौजे गोडदेव आरक्षण क्र . २१७ (दवाखाना व प्रसुतीगृह ) चे नामनिधान "रुग्णालय" असे करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार विकास योजनेत व विकास नियंत्रण नियमावलीत आवश्यक ते फेरबदल करणेबाबत.**

**धृवकिशोर पाटील :-**

मॅडम सदर विषय मागे घेण्यात यावा. गोषवारा नाही आहे.

**अनिल सावंत :-**

सभागृहापुढे विषय आलेला आहे प्रशासनाने गोषवारा दिलेला नाही. जरा भुमिका स्पष्ट होऊ द्या का मागे घ्यायचा. प्रशासनाने गोषवारा का दिला नाही. तुम्हीच विषय आणता तुम्हीच मागे घेता.

**मा. उपमहापौर :-**

ह्या विषयात महापौरांच्या अधिकारात सभागृहामध्ये हा विषय आम्ही पुढच्या मिटींगसाठी ढकलतो.

**मा. महापौर :-**

सचिव पुढचा विषय घ्या.

(सदरचा विषय मागे घेण्यात आला.)

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८३, **सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात पावसाळापूर्वी कच्चे/पक्के नाले सफाई करणे.**

**पंकज पांडेय :-**

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेचे एकुण क्षेत्र ७९ चौ.की.मी आहे. महानगरपालिका क्षेत्रालगत असलेल्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातुन डोंगराळ भागातुन पावसाळया दरम्यान पावसाळी पाण्याचा व सांडपाण्याचा निचरा शहरातील कच्चे/पक्के नाल्यातुन घोडबंदर व इतर खाडीमध्ये होतो.

शहरात एकुण १५५ कच्चे/पक्के नाले आहेत. सन २०१८-१९ यावर्षासाठी महानगरपालिकेतर्फे पावसाळयापुर्वी नाले सफाई करण्याकरीता आवश्यक लागणारे यंत्र सामुग्री जेसीबी, पोकलन मशीन, बोट पोकलन मशीन, हायड्रा मशीन, जेटींग मशीन व सिव्हर सक्कर मशिन डंपर, टोरस, भाड्याने घेणे, हंगामी कत्रांटी कामगार पुरवठा करणेकामी किंवा उक्त ठेका देणेबाबत महापालिकेचे आर्थिक हित पाहता मा. आयुक्त यांनी कार्यवाही करुन निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या रु.२.५० कोटी खर्चास तसेच पावसाळ्यात सखल भागातील पाणी उपसा करण्यासाठी विविध क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने घेण्याकरीता येणाऱ्या रु.५० लक्ष खर्चास ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे व नालेसफाई करताना भाईंदर (प.) येथील गणेश आनंद क्रांती नगर येथील नाला सर्वप्रथम सुरु करावा असा मी ठराव मांडत आहे.

**अशोक तिवारी :-**

माझे अनुमोदन आहे.

(सभागृहात गोंधळ)

**श्रीप्रकाश सिंग :-**

महापौर मॅडम कमिशनर साहब को जानकारी देना चाहता हूँ की हर साल बारीश का जिस टाईम नाला सफाई का काम चालु होता है तो उस दिन फोटो निकाल के किसी नगरसेवक को विश्वास मे न लेके खाली फोटो दिखाया जाता है की यह नाला साफ हुआ है उसके बाद जब बारीश आता है तो वह बोले भरती आ गया। अरे भरती जिस दिन पानी भर गया उस दिन भरती और जिस दिन पानी नही भरा उस दिन ओहोटी तो मेरा एक कहना है की जितने भी बडे नाले है रेल्वे समांतर या शांती नगर जो नाला है जहाँ कई बडे नाले है जहाँ पानी भरता है आप खुद साईट व्हिजीट करके बारीश के पहले उसको साफ कराके लिजीए ताकी इतने लोगो को नुकसान ना हो। करोडो का नुकसान होता है जो ग्राऊंड में रहते है भाईंदर जुना एरिया है। कमिशनर साहेब जुना वॉर्ड होने के कारण एरिया जुना है बिल्डींग निचे चली गई है। रोड उपर आ गए है। तो वहाँ हर जगह पानी भरता है हर जगह कई साल से पानी नही भर रहा था तो पिछले साल से नया सिस्टम लागु हो गया भरती आ गया। मेरे कार्यालय में ३-३ फिट पानी भरा था जहाँ मे बैठता हूँ और यह तिसरा टर्म से ११ साल हो गया। एक साल जिस टाईम मे चुनाव लढा था उस टाईम भरा था या तो अभी भरा है। उसका सब किया कराया आरोग्य खाते के उपर ही जाता है। रेल्वे समांतर कल्वर्ट जो है वह साफ  नही होता है। उसके बावजुद भी लोगो ने जवाब दिया की साफ हुआ है। साफ हुआ है तो साहब ऐसा ना हो की वापीस वह जवाब मिले भरती आ गया लोगो का करोडो का नुकसान हो प्लिज आप ध्यान रखिए।

**नयना म्हात्रे :-**

महापौर मॅडम आमच्या वॉर्डामध्ये वॉर्ड नं. २३ ला जवळ जवळ पाच वर्ष झाली नाले सफाई झालीच नाही. तशीच घाण पडलेली आहे. त्याच्यामुळे सगळी मच्छर येतात. ताबडतोब मॅडम अशी तुम्ही ऑर्डर काढा की जे आपले पानपट्टे साहेब आहेत आरोग्याचे त्यांची बदली करुन असे सक्षम अधिकारी घ्या की अख्खे मिरा भाईंदर स्वच्छ होऊन जाईल.

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त महोदय मी विरोधात बोलत नाही. ठरावाच्या बाजूने बोलणार आहे फक्त मला आयुक्तांच्या निदर्शनास आणून द्यायचे आहे साहेब २०१५-१६, २०१६-१७ आणि २०१७-१८ हा जो खर्च वाढत गेला पहिले आमच्याकडे साहेब कच्चे नाले होते त्याला साफ करायला खरोखर पैसा लागत होता. आता जे नाले आहेत पक्क्या स्वरुपाचे झालेले आहेत आधी जो निघणारा गाळ आणि आता निघणाऱ्या गाळामध्ये बराच फरक आहे. खरोखर इतक्या पैशाची गरज आहे का? साहेब तुम्ही चौकशी करा कस आहे साहेब पालिकेचा पैसा कोट्यवधी रुपये जातो. फक्त आपण ठेकेदाराला पोसण्यासाठी ठेका देते हा विषय नाही हे सगळे झाल्यानंतर सुध्दा मुन्ना भाई बोलले ते खर आहे. सन्मा. सदस्य मुन्नाजी बोलले ते चुकीचे नाही तरी पावसात पाणी भरतो ते भरतोच. का भरतो समुद्रामध्ये भरती आली नाले साफच झाले

नसतील कचरा आहे तिथेच आहे. पाण्याचा स्तर वरती येणारच. साहेब याची आपण सखोल चौकशी करावी चांगले अधिकारी घ्या कामासाठी. साहेब ते राजीव जाधव साहेबांनी ती सुरुवात केली होती. तत्कालीन आयुक्त त्यांनी प्रत्येक विभागाचा डेप्युटी कमिशनर रेंज अधिकाऱ्याला साहेब क्षेत्र वाटून दिलं होते आणि ते फिरत होते. साफसफाई संदर्भात नाले सफाई संदर्भात साहेब शहर आमचे सखोल परिसरामध्ये आहे. अशा परिस्थितीमध्ये नाले सफाई झालीच पाहिजे. व्यवस्थित झाली पाहिजे आणि कमी खर्चात झाली पाहिजे याची साहेब आपण दक्षता घ्यावी.

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम हा जो नाले सफाईचा पावसाच्या पूर्वीचा विषय इथे आलेला आहे. प्रत्येक वर्षी येतो ह्या वेळेला आलेला आहे. आपल्याला मंजुरी द्यायची आहे. परंतु त्या अगोदर मी सांगतो माझा प्रभाग क्र. २ आणि ३ ह्यामधून एक एस.पी. रोडचा नाला आराधना नाला ९५ पुढे तो विषय आहे मंजुरीसाठी तोच नाला जातो खाडीपर्यंत त्याच्यानंतर त्या प्रभाग क्र. ३ मधून सागर करण नाला थेट त्या ठिकाणी जात असतो. कमिशनर साहेब परिस्थिती अशी आहे की हे दोन्ही नाल्यांजवळ पोकलन कुठली मशीन जाऊ शकत नाही. कसलीच जाऊ शकत नाही. जे.सी.बी. जात नाही काही नाही फक्त कामगारांचा वरती जो दोन्ही नाले साफ होऊ शकतात सोईटला किनाऱ्याला माणसांना उभे राहायला जागा नाही अशा परिस्थितीमध्ये जे मुख्य नाले आहेत ते कशा पध्दतीने साफ होतात ह्याची सखोल चौकशी करुन त्यापध्दतीने जे कॉन्ट्रॅक्ट काढतात आम्हा नगरसेवकांना विश्वासात घेत नाहीत. मग हा पाऊस ज्यावेळेला येतो भरती येते. साईबाबा नगर पूर्णपणे एस.व्ही. रोड भरलेला असतो आणि काही बिल्डींग खाली गेलेल्या आहेत रात्री त्या लोकांना अतोनात त्रास करावा लागतो सर. सहन करावा लागतो की नाले सफाईच्या कामाला आमचा विरोध नाही परंतु उपमहापौर साहेब नाले सफाई अतिशय स्वच्छतेने नगरसेवकांना विश्वासात घेऊन हे काम करावे हीच मागणी आहे.

**दिनेश जैन :-**

बारीश के बाद नाले बारीश आने के पहले साफसफाई हो जाती है। लेकिन हमारे शांती नगर का विषय में ले रहा हूँ उधर जो रोड का जो क्रॉसींग रहता है आयुक्त साहब नाले जे जॉईंट होतात कल्वर्ट त्या क्रॉसींगमध्ये एकदम जाम आहे. मतलब उसके अंदर रेती, खडी, सिमेंट वह पडा हुआ रहता है। वह नाले साफसफाई करने का कोई मतलब नही। जब तक वह क्रॉसींग हम एक दुसरे से नही मिलाते क्योंकी वह पानी घुम के बाहर जाता नही है और दुसरा विषय यह है की नाले को हम अभी कॉंक्रीटीकरण बना भी रहे है लेकिन चुहे उसको वापीस खोदखोद के वापीस रेती सिमेंट से बाहर निकाल देते है और वह जमा कर देते है। पहले हम चुहे का दवाई डाल देते थे चुहे कम होते थे उसकी वजह से वह नाले में और वह कचरे से ज्यादा वह कॉंक्रीट मट्टी यह सब होता है। और दुसरा विषय ऐसा है की मिरारोड के अंदर २० नंबर, २१ नंबर जो प्रभाग पडता है उसके बाजु से जाफरी खाडी निकलती है वह साफसफाई कभी भी होती नही है। बारीश के अंदर और बारीश के पहले उसकी वजह से वह पानी पास न होने के वजह से शांतीनगर के अंदर गए टाईम पे भी उधर २-२, ३-३ फुट पानी हो गया था। इसके लिए में आपसे निवेदन करता हूँ की जाफरी खाडी की पुरी साफसफाई कराई जाए और दुसरा जो भी कल्वर्ट मिरारोड के अंदर जितनी भी नाले बनाए हुए है ९० टक्के नाले हमने आर.सी.सी. किए हुए है। लेकिन जॉईट जो है कल्वर्ट वह जॉईंट एक भी बरोबर नही है। सब चॉक अप है तो जॉईंट का जबतक निवारण नही करेंगे आयुक्त साहब तब तक वह नाले के अंदर पानी जाएगा नही जाफरी खाडी में इसके लिए में आपसे निवेदन करता हूँ की आप बांधकाम को बोल के जितने भी नाले है उसको एक दुसरे से कनेक्ट कर दिए जाए और वह जॉईन्ट खोले जाए।

**दिप्ती भट :-**

इनको पता नही है की जॉईंट का काम चालु है और वहाँ साफसफाई का काम भी चालु है।

**दिनेश जैन :-**

महापौर मॅडम इनको पुरी माहिती नही है जो मैंने बोला उसके उपर इनको टिप्पणी करने से पहले सोचना चाहिए की एक नाले का जॉईंट का काम चालु है उसका अश्विन कासोदरियाजी और हम सब बी.जे.पी. के नगरसेवकोने पुरा फॉलो-अप करने के बाद में वह एक जगह जॉईंट का काम शुरु हुआ है।

**दिप्ती भट :-**

महापौर मॅडम आयुक्त साहब को अभी दो महिना पहले मैंने एक लेटर दिया था।

**मा. उपमहापौर :-**

आयुक्त साहेब सांगतात आयुक्त साहेबांना अजुन ह्या शहरातली सगळी नावे माहित नसतील. आपल्या जेवढ्या ज्या काही तक्रारी असतील जे सांगायचे असेल तर आयुक्त साहेबांकडे ते लेटर द्या आणि विभाग प्रमुखांना भेटा आता इथे सांगितल म्हणजे आपण सगळ्यांची नोंद घेतो असे नाही. इथे आपल्याला हा ठराव असा आहे की आपण दरवर्षी सफाईचे काम टेंडरने काढतो. या वेळेला तो विषय दोन पध्दतीने आपण आयुक्त साहेबांना सांभाळायला सांगितलेला आहे. तर त्याचा आपण ठोक ठेका द्यायचा की एवढे पैसे लागतील. एवढ्या पैशात एवढे काम करायचे आहे. तर ह्या संदर्भात आयुक्तांनाच आपण हा सर्व अधिकार देणार आहोत. तर आपल्या सगळ्या भुमिका आपल्याला नंतर मांडता येतील.

**दिप्ती भट :-**

म्हणून महापौर मॅडम मी बोललो की १५ दिवस अगोदर शांती शॉपींग सेंटरचा नाला जो अमृत योजनेमध्ये पास झाला आहे. सातत्याने ४ वर्षाने फॉलप केल्यानंतर हा नाला पास झाला आहे. तर त्याच्यावरती अर्धा स्लॅब आहे आणि अर्धा नाही तर एक लेडीज आताच पडली. तर मी विनंती केली पत्र पण दिले स्लॅब जो जेवढा अर्धा वाचलेला आहे तो तोडून टाका नाहीतर आम्ही जाऊन ते तोडू कारण की लोक येतात जातात पडतात. नाल्याचे काम चालु करा कारण खुप इमरजन्सी आहे. लोकांना खुप प्रॉब्लेम होतो. ४ वर्षापासून सगळी काम अडकलेली आहेत. आणि लोक आजारी पण पडत आहेत. म्हणून तेवढीच विनंती आहे बाकी काही नाही.

**नरेश पाटील :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलतो माझ्या वॉर्डमध्ये रेल्वे समांतरला जवळ जवळ ८ ते १० फुट खोल नाला आहे. त्याच्यामध्ये जवळ जवळ ह्या दोन ते तीन वर्षामध्ये दोन मुल बुडून मेली. त्या संपूर्ण नाल्याला ग्रील नाहीत म्हणजे पूर्ण ओपन नाला एखादा माणूस आतमध्ये गेला तर पहिल्यांदा त्याला साफ तर कराच पण त्याला पहिला ग्रील लावून घ्या. अनेक वेळा मी पत्रव्यवहार पण दिलेला आहे. फक्त अधिकारी बघून जातात पण ग्रील लावत नाही. ग्रील लावले तर बर होईल.

**अनिल सावंत :-**

आयुक्त साहेब हा गोषवारा आलेला आहे. १५-१६ ह्या दोन वर्षामध्ये १०० टक्के वाढ खर्चामध्ये नाले वाढले की नाले खोल झालेले असतात. एकूण शहरामध्ये नाले किती मोठे आहेत हे मोठ्या नाल्यांचे टेंडर आहे ना. रेग्युलर तर साफसफाई होतच आहे. महापौर मॅडम, आपल्या ह्या शहरामध्ये कचऱ्याला सोन्याचा भाव आलेला आहे. डेली साफसफाईमध्ये नाले साफसफाई सुध्दा समावेश आहे. ते कधी साफ होत नाहीत. मोठ्या नाल्यांसाठी आपण वेगळा बजेट काढतो ते १०० टक्केनी वाढलेले आहेत. नाले तेवढेच आहेत. जाफरी खाडीचा उल्लेख केला सन्मा. मित्राने जाफरी खाडीची साफसफाई जाऊन बघा बाजूला तोच कचरा काढून बाजूला ठेवायचा. थोड्या वेळाने पाऊस पडल्यानंतर तोच कचरा आतमध्ये. कचरा वाहून नेण्याची इतर ठिकाणी बाहेर टाकण्याची ही पध्दत नाही. जरा ३-४ वर्षापासून आयुक्त साहेब त्या रोडला गेलात पेणकर पाडा रोडने तो नाला त्याठिकाणी लागतो. गाडी ब्रिजवर थांबवून जरुर बघा अशाप्रकारे ही साफसफाई होते आणि करोडो रुपये आपण देतो. याच्यामध्ये उल्लेख केला पोकलन मशीन, हायड्रा, जेटींग मशीन, सिमेंट, सक्शन मशीन ह्या कुठेच दिसत नाही. ठरावामध्ये फक्त आपण मंजुरी देतो. आपण सक्शन मशीन इथे सक्कर लिहीलेले आहे. तर हे जे आपण वाढीव मंजुरी देत आहोत त्याचा डिटेल रिपोर्ट मागवा. मागील पाच वर्षाचा आढावा मागवा. कशाप्रकारे यांनी काय खर्च केलेला आहे आणि पुढे काय करणार आहेत. ह्या शहरामध्ये पावसामुळे पाणी तुंबण्याचे प्रकार काही ठिकाणी फार भयंकर आहेत. त्याचा लोकांना फार त्रास होतो. त्यामुळे हे पैसे सत्कारणी खर्च व्हायला पाहिजे.

**प्रविण पाटील :-**

महापौर मॅडम सर्वप्रथम ४ महिने अगोदर प्रस्ताव आणला त्याच्याबद्दल धन्यवाद. नाही तर एक दोन महिने एक महिने असतानाच प्रस्ताव आणतात पावसाळा चालू असतानाच तुमचे प्रस्ताव येतात आणि पाऊस पडत असतो आणि ती नालेसफाई होत असते. आता हे लवकर आणलं तर एक काम अजून करा आयुक्त साहेब ह्या शहरातले जे नाले आहेत ते नाले फक्त शहरापुरते मर्यादित नसुन ते शहरातुन सी.आर.झेड मधून मॅंग्रोजमधून समुद्रापर्यंत जात असतात. ह्या शहरामध्ये जे-जे नाले मोठे आहेत त्या सगळ्या नाल्यांमध्ये मॅंग्रोज आहेत. आज शहरामध्ये जे नाले आहेत ते साफ करतो पण शहराच्या पुढे म्हणजे जे खाडीमधले नाले आहेत त्याच्यामध्ये मॅंग्रोज असल्यामुळे कुठल्याही प्रकारे तिथे आपण साफसफाई करत नाही. परिणामी प्लास्टीकच्या पिशव्या, प्लास्टीक जाळून तिथे अडल जात आणि शहरामध्ये पुरपरिस्थिती निर्माण होते. अपल्याला विनंती आहे लवकर प्रस्ताव आणला संबंधित विभागाकडून मॅंग्रोजच्यामध्ये जे नाल्यामध्ये जे-जे मॅंग्रोज होत असतील किंवा तिकडे जे बोट जे.सी.बी. असते ती जाऊन

काहीतरी मँग्रोज काढण्याची काय ज कायदेशीर प्रोसेस असेल तशी प्रोसीजर पूर्ण करुन तेही पूर्ण करा अशी आपल्याला विनंती आहे धन्यवाद.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर. पूढचा विषय घ्या.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम तुम्ही ठराव फक्त मंजुर करता आदेश तरी द्या अशाप्रकारे करुन घेण्यात येईल. तुम्ही आयुक्तांना आदेश तरी द्या.

**मा. महापौर :-**

आयुक्त करतील ना. सर्व सदस्यांना विश्वासात घेतील आणि अधिका-यांनी सदर जागेवर नाला सफाई करायची आहे.

**प्रकरण क्र. ८३ :-**

**सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात पावसाळापूर्वी कच्चे/पक्के नाले सफाई करणे.**

**ठराव क्र. ८२ :-**

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवा-यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेचे एकुण क्षेत्र ७९ चौ.की.मी आहे. महानगरपालिका क्षेत्रालगत असलेल्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातुन डोंगराळ भागातुन पावसाळया दरम्यान पावसाळी पाण्याचा व सांडपाण्याचा निचरा शहरातील कच्चे/पक्के नाल्यातुन घोडबंदर व इतर खाडीमध्ये होतो.

शहरात एकुण १५५ कच्चे/पक्के नाले आहेत. सन २०१८-१९ यावर्षासाठी महानगरपालिकेतर्फे पावसाळयापुर्वी नाले सफाई करण्याकरीता आवश्यक लागणारे यंत्र सामुग्री जेसीबी, पोकलन मशीन, बोट पोकलन मशीन, हायड्रा मशीन, जेटींग मशीन व सिव्हर सक्कर मशिन डंपर, टोरस, भाड्याने घेणे, हंगामी कत्रांटी कामगार पुरवठा करणेकामी किंवा उक्त ठेका देणेबाबत महापालिकेचे आर्थिक हित पाहता मा. आयुक्त यांनी कार्यवाही करुन निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या रु.२.५० कोटी खर्चास तसेच पावसाळ्यात सखल भागातील पाणी उपसा करण्यासाठी विविध क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने घेण्याकरीता येणाऱ्या रु.५० लक्ष खर्चास ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे व नालेसफाई करताना भाईंदर (प.) येथील गणेश आनंद क्रांती नगर येथील नाला सर्वप्रथम सुरु करावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. पंकज पांडेय अनुमोदक :- श्री. अशोक तिवारी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८४, **रस्ते, चौक, उद्याने व इतर वास्तुंना नावे देण्याबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे.**

**विणा भोईर :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील रस्ते. चौक, उद्याने व इतर वास्तुंना नावे देण्याकरीता सन्मानीय नगरसेवक / नगरसेविका यांना पत्र देऊन प्रस्ताव मागविण्यास आले होते. त्यांच्याकडुन प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. यापुर्वी झालेले नामकरण वगळात खालील प्रस्ताव सादर करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव | प्रस्तावित नाव |
|---|---|---|
| १ | मिरारोड प्रभाग क्र. १५ मध्ये डॉन-बोस्को स्कुल पासुन ते सरळ डायमंड टॉवर हायवे पर्यंत मार्ग. | पंडित दीनदयाल उपाध्याय मार्ग. |
| २ | भाईंदर (पुर्व) नवघर रोड आरक्षण क्र. १०९ या जागेतील अभ्यासीका. | सावित्रीबाई फुले अभ्यासिका. |
| ३ | नयानगर हॉल. | मेजर अब्दुल हमीद हॉल. |
| ४ | साईपॅलेस हॉटेल पासून ते दाचकुलपाडा पर्यंतच्या रस्त्याला विश्वकर्मा रोड. | विश्वकर्मा रोड |

| | | |
|---|---|---|
| ५ | भाईंदर (प) येथे रेल्वे समांतर रस्त्यावर प्लेनेटरिया कॉम्पलेक्स कडे जाणा-या चौकास. | संत सेवालाल महाराज चौक. |
| ६ | आरक्षण क्र.१२१ वाचनालय. | साहित्यकार इंद्रबहादूर सिंग. |
| ७ | आरक्षण क्र.३०१ वाहनतळ | रविंद्रनाथ टागोर वाहनतळ |
| ८ | आरक्षण क्र. २६४ वाहनतळ | चितुरानी चन्नमा |
| ९ | फ्लायओव्हर ब्रीजपासून रेल्वे समांतर जाणा-या चौकास | माहेश्वरी भवन चौक |
| १० | डीमार्ट ओपन प्लॉट व ओमकार टॉवर मधील चौकास | श्री संत ओधवरामजी चौक |

वरील नामकरण प्रस्तावांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची 'ड' मधील प्रकरण ११ (२) अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

**सुरेखा सोनार :-**

माझे अनुमोदन आहे.

**ज्योत्सना हसनाळे :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलते आमच्या विभागातला डाचकुलपाडाचे जे नाव आहे. विश्वकर्मा मार्ग ते कमी करण्यात याव कारण तो आदिवासी पाडा आहे आणि वर्षानुवर्ष त्या ठिकाणी त्या पाड्याला डाचकुल पाडा मार्ग असच नाव आहे आणि आता नविन नाव त्याच्यामध्ये नमुद केलेले आहे. विश्वकर्मा कुठल्याही नगरसेवकाने ती मागणी केलेली नाही. तर ते नाव कमी करण्यात याव माझी अशी सुचना आहे. डाचकुल पाडा मार्ग आदिवासी पाडा येथे विश्वकर्मा मार्ग नाव देण्यात येऊ नये.

**प्रविण पाटील :-**

महापौर मॅडम तुम्ही गोषवा-यात जी ४ नावे दिलेली होती. त्याच्यातली दोन नावे तुम्ही कशाला उडवली एक नंबर आणि ४ नंबर आणि बाकीची दुसरी नावे ॲड केली. आता मला सांगा कुठल्याही रस्ता, चौकाला नाव देण्यासाठी काय प्रोसीजर आहे. आम्ही सभागृहात आता सांगु का नावे ते तुम्ही देणार की ठरावात तुम्ही देणार ती देणार की गोषवा-यात आहेत ती देणार? विषय तरी सांगा महापालिकेचे त्याच्यावर काय धोरण आहे. नावे कसली देणार?

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त महोदय गोषवा-यामध्ये जी नमुद आहेत त्याच्यावर चर्चा झाली पाहिजे. माझा बिल्डींगचा वॉचमेन केबीनलाही नाव देतो असाच विषय झाला. काय झाल ते समजल तरी पाहिजे.

**प्रविण पाटील :-**

नावे देण्याबाबत महापालिकेचे काय धोरण आहे?

**जुबेर इनामदार :-**

कुठल्या क्षेत्राला काय नावे दिलेली आहेत बाकीच्या लोकांना त्याचा काय प्रभाव पडू शकतो. त्याच्यावर चर्चा  नको का? माहिती तुम्ही दिलेली आहे गोषवा-यामध्ये ४ नावे आहेत त्यावर चर्चा करा.

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम स्व. यशवंत केशव भोईर चौक हे नाव द्यायचे होते. हे यशवंत केशव भोईर साहेब आपल्या मिरा भाईंदर शहरातील चांगले व्यक्तीमत्व होते. हे माजी सरपंच पण होते आणि त्यांचे योगदान पण आहे. पण त्या छोट्याशा चौकाला त्यांचे नाव देणे हे संयुक्तीक वाटत होत म्हणून आम्ही ते वगळल आणि तिथे रंगमंच पण आहे. त्या रंगमंचाला एक नाव दिलं आणि ती समोरची जागा मोकळी होती. त्याच्यामुळे खाली फुकट पुन्हा वाद होऊ नये हे नाव वगळून आम्ही केल आणि दुसरी कुठली वास्तु चांगला रस्ता शोधुन आपण यांचे नाव देणार आहोत. आम्ही आमची भुमिका सांगितली आमच्या नावाला विरोध नाही.

(सभागृहात गोंधळ)

**राजु भोईर :-**

पाटील साहेब त्या रंगमंचाला हनुमान मंदिर रंगमंच आहे त्याचा आणि ह्या चौकाचा काही संबंध नाही. हा सार्वजनिक चौक आहे. त्यासाठी आपण यशवंत भोईर चौक हे नाव देणे हे आपण सुचविलेले आहे.

**वंदना विकास पाटील :-**

महापौर मॅडम वॉर्ड क्र. ११ मध्ये लता कुंज गल्ली म्हणून लता ताई रामचंद्र पाटील हे नाव देण्यात यावे अशी माझी विनंती आहे आणि हे नाव गोषवा-यामध्ये असुन सुध्दा कॅन्सल का केले.

**जुबेर इनामदार :-**

आपल्या शहरातल्या क्षेत्रातील जी काही त्यांना नावे द्यायची ती लेखी स्वरुपात द्यायची असतात. प्रशासन महासभेसमोर पाठवुन देते. हा सभागृहाचा इतिहास आहे. कोणी याच्या नावाचा विरोध कधी केलेला नाही. नामकरण करण्यामध्ये राजकारण आणु नये.

**अनिल सावंत :-**

मिरागाव येथील हनुमान मंदिर समोरील चौक त्याला यशवंत केशव भोईर चौक हे नाव प्रस्तावित केलेल होते. प्रशासनाने तो गोषवारा दिला. मा. सन्मा. सदस्यांनी त्यांची भुमिका स्पष्ट केली. भुमिका स्पष्ट करते वेळी डायरेक्ट तुम्ही ठराव वाचता आणि नंतर भुमिका स्पष्ट करता. ज्याने हे नाव प्रस्तावित केल होत त्याला याची कल्पना दिली का तुम्ही? की आम्ही ह्या चौकाला हे नाव देत नाही आहोत. उगाच काही तरी नामकरणामध्ये सुध्दा राजकारण आणायचं. यशवंतराव केशव भोईर साहेब हे ह्या शहराचे ग्रामसेवकांपासून सरपंचापर्यंत ह्या शहरासाठी त्यांचे योगदान आहे. चौथं नाव आहे प्रभाग क्र. ११ नवघर रोड येथे लताकुंज गल्ली.

**रोहिदास पाटील :-**

त्या स्वातंत्र सैनिकांच्या पत्नी आहेत.

**अनिल सावंत :-**

ते नाव कस याच कट करता. लता रामचंद्र पाटील यांच्या त्या स्वातंत्र सैनिकांच्या पत्नी आहेत आणि त्यांचे नाव प्रस्तावित केलेले आहे. ते सुध्दा नाव कट करता. त्याची तुम्हाला पण कल्पना नाही. सभागृहनेत्याला पण कल्पना नाही.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

महापौर मॅडम प्रशासनाचा गोषवारा आहे ४ नावे त्याच्यातली दोन नावे नगरसेवकांनी सुचविलेली नाव देण्याऐवजी बाकीची लावे भरलेली आहेत.

**दिप्ती भट :-**

महापौर मॅडम नवघर नाक्यावर स्वातंत्र सैनिकांचा पुतळा उभारणार आणि मग त्याच्या पत्नीचे नाव कॅन्सल करता म्हणजे ही कुठची पध्दत आहे.

**मा. उपमहापौर :-**

प्रशासनाने आपण सांगत आहात मिरागाव येथील हनुमान मंदिर समोरील चौक ह्या संदर्भात आता सन्मा. धृवकिशोर पाटील साहेब त्यांची भुमिका स्पष्ट केली की स्व. यशवंत भोईर याचे नाव हे मिरा गावचे सरपंच होते ह्या सभागृहाचे प्रतिनिधीत्व त्यांनी केलेल आहे. त्यांच्या बरोबर त्याच्यानंतर त्यांची पत्नी देखील नगरसेविका होत्या मुले देखील नगरसेवक आहेत. सुन देखील नगरसेविका आहे. आणि ज्या वास्तुचे नाव चौक म्हणून आपण सांगता त्याला चौक म्हणजे आपण साधारणपणे संकेत काय की ४ रस्ता आता हनुमान मंदिर त्याच्या बाजूला एक नाट्यगृहाचे मंच आणि एका बाजूला गावदेवीचे मंदिर अशा ३ गोष्टी आहेत. आता ह्या ठिकाणी आपल्याला नेमके अपेक्षित चौक म्हणजे नेमक काय चौक म्हणजे ४ रस्ता असे असतात. तो चार रस्ता होत नाही आणि त्या ठिकाणी दुसरे नाव देखील दिलेले नाही. त्यांचे नाव बदलल म्हणजे दुसर काही नाव दिलं असही होत नाही.

**प्रविण पाटील :-**

४ रस्ते आहेत तिकडे.

**जुबेर इनामदार :-**

त्या चौकीवरुन आम्ही रोज जातो.

**मा. उपमहापौर :-**

माझ काय म्हणणे आहे की त्याला आपण दुसऱ्या कुठल्या एखाद्या चांगल्या स्पॉटला त्यांचे नाव द्या. जो चौक नाही तो आपण चौक कस सांगणार. जो अमर पॅलेस हॉटेल जवळून येतो आणि यांच्या ऑफिस समोर जातो त्या वेळेला गावामध्ये दोन रस्ते घुसतात. तो आणि मधला एक पॅसेज आहे. तिथे ४ रस्ते नाहीत. बघा व्यवस्थित प्रस्ताव आणा हे नाव देऊ नका. तिथे दुसरे नाव दिलेले नाही का तुमचे जाणीवपूर्वक टाळल एका सभागृहात मा. जयंत पाटील साहेब हे ह्या सभागृहाचे उपमहापौर राहिले त्यावेळेला दोन नगरसेवकांनी आपआपल्या वडिलांचे नाव आणली सगळीच जण त्यावेळेला त्या दोनही नावाचा विरोध त्यावेळी सभागृहाने केला होता. नगरसेवकांचे नाव सांगत नाही. आपण मित्रमंडळी आहात नंतर त्याच्यावरती झालेली चर्चा ही एन.ओ.सी. वरती काय झाल होत किंवा काय ते डायलॉग त्या सभागृहात झाले होते परत फेरी घडल्या होत्या ते आपण नंतर सांगु याच्यात तो सांगत नाही. त्यानंतर एक विषय होता की प्रभाग ११ मधील नवघर रोड येथील लता कुंज गल्ली कै. लता रामचंद्र पाटील मार्ग अस लिहीलेले आहे. काही आपल्या माहितीसाठी जेव्हा ती गल्ली लताकुंज गल्ली म्हणून ओळखली जाते.

तर आपला ठराव आहे की नावे बदलायची नाहीत. दिलेली जी नावे आहेत ती बदलायची नाहीत. तर ह्या नावांचा ह्या गल्लीला नाव दिल आहे.

**प्रविण पाटील :-**

दिल नाही साहेब.

**मा. उपमहापौर :-**

एकूण ह्या याच्यावरती ३ नावे आहेत. याच्यामध्ये ३ नावे आहेत त्याच्यामुळे सध्या ते वगळलेले आहे.

**प्रविण पाटील :-**

उपमहापौर साहेब तुम्ही चुकीची माहिती सांगता.

**मा. उपमहापौर :-**

त्याला दुसर कुठचही नविन नाव दिलेल नाही. त्या-त्या संबंधीत लोकांशी चर्चा करुन निर्णय घेऊ.

**प्रविण पाटील :-**

त्या गल्लीला नावच दिलेले नाही.

**मा. उपमहापौर :-**

इथे काय लिहीलेले आहे प्रभाग क्र. ११ नवघर रोड इथे लताकुंज गल्ली विषयपत्रिकेत लिहीलेले आहे. त्याच्यावरती ३ ते ४ प्रस्ताव आहेत म्हणून त्यांचे नाव बदललेले नाही.

**प्रविण पाटील :-**

बदललेल नाही परंतु आजपर्यंत त्या गल्लीला कुठलेही नाव दिलेले नाही.

**मा. उपमहापौर :-**

आपण परत त्या विषयावरती चर्चा करुन घेऊ.

**प्रविण पाटील :-**

त्या गल्लीला नावच दिलेले नाही. फक्त बोलीभाषा प्रचलित आहे. लताकुंज गल्ली म्हणून. आज आपण प्रस्ताव आणलेला आहे. आजपर्यंत तुम्ही शोधा त्या गल्लीला कुठले नाव दिलेले आहे का? पहिल्यांदा तो प्रस्ताव आलेला आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

संबंधित अधिकाऱ्याला विचारुन घ्या.

**मा. उपमहापौर :-**

ह्या ठरावात त्यांची नावे बदललेली नाहीत. त्या चौकाचे ही नाव बदललेले नाही.

**जुबेर इनामदार :-**

वैती साहेब उड्डाण पूलाला चौकाचे नाव दिलेले आहे. इतिहास आहे तो मिरा भाईंदरचा. आपण रोज ज्या उड्डाण पुलावरुन येतो त्याला चौक म्हणून नाव दिलेले आहे. तो प्रस्तावित आहे. उड्डाणपूलाला चौक म्हणून होऊ शकतो. गावाच्या चौपाटीमध्ये चौक होऊ शकत नाही का?

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

हे दोन्ही नावे बदललेली नाहीत. आपण परत त्याच्यावरती माहिती घेऊन करुया.

(सभागृहात गोंधळ)

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

ह्या ठरावामध्ये दोन्ही नावे पास करुन घ्या.

**प्रविण पाटील :-**

नगरसेवकांची मागणी आहे नागरिकांची मागणी आहे.

**मा. उपमहापौर :-**

अस आहे की दहा पाऊल चालल ना की हा मंच, दोन पावलं चालले की मंदिर आणि तेथुन पाच पावलं पुढे आलो की हे यशवंत भोईर चौक लगेच पाच पाऊल पुढे गेलो की हे मंदिर अस होईल. एका जागेचे नाव किती देणार.

**प्रविण पाटील :-**

तिथे अजूनपर्यंत नावे दिलेली नाहीत.

**मा. उपमहापौर :-**

बघा ते माझ्या वडिलांच्या स्थानी आहेत. त्यांच्याबद्दल चुकीचे काही करायचं आम्हाला कारण नाही आमचा घरोबा आहे आणि त्यांच्यासाठी कुठेतरी योग्य नाव देऊ.

(सभागृहात गोंधळ)

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

याच्यामध्ये विषय ४ तुम्ही ठरावामध्ये किती नावे वाचली दोन नावे त्याच्यामधून वगळली गेली. तुम्ही प्रशासनाच्या गोषवाऱ्यामध्ये चारच नावे............

**मा. उपमहापौर :-**

ह्या नावावरून ह्या सभागृहामध्ये किती रणकंदन झालेले आहे हे मी पाहिलेले आहे.

**अनिल सावंत :-**

म्हणून तुम्ही गोषवारा दिला नाही गोषवारा द्या.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

प्रशासनाचा गोषवारा आमच्याकडे आलेला नाही तुम्ही नावे द्या तुम्ही कोणती देणार आहात ते आम्हाला कस माहिती पडणार. तुम्ही डायरेक्ट ठरावामध्ये वाचन करणार ४ नावाचा गोषवारा आहे. ही दोन्ही नावे ठरावामध्ये घेऊन पास करण्यात यावी अशी तुम्हाला विनंती आहे.

**मा. महापौर :-**

नाव मान्य असेल तर करा नाही तर तुमचा ठराव मांडा.

**प्रविण पाटील :-**

न घेण्याचे कारण तर सांगा.

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम ऑलरेडी आपण आपली बाजु सांगितलेली आहे की यशवंत भोईर साहेब खुप मोठे व्यक्तीमत्व आहे त्याचे नाव देणे आहे ह्या छोट्याशा चौकाला नाव देण्याची गरज पण नाही त्याची.............

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

महापौर मॅडम ज्या-ज्या लोकांच ह्या शहरासाठी योगदान नाही त्यांची चौकांना नावे तुम्ही दिलेली आहेत आणि ही जी महत्वाची नावे तुम्ही देत नाही म्हटल्यावर................

**धृवकिशोर पाटील :-**

आपली भुमिका आपण मांडलेली आहे. आपला विरोध नाही. ठराव मांडलेला आहे. त्यांना ठराव मांडायचा असेल त्यांनी ठराव मांडावा.

(सभागृहात गोंधळ)

**धृवकिशोर पाटील :-**

तो चौक छोटा आहे. तिथे ऑलरेडी रंगमंचाला नाव दिलेले आहे. पुन्हा वादविवाद होईल म्हणून ते नाव आपण काढलेले आहे.

**अनिल सावंत :-**

कोणी दिलेल आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

तुम्ही बघा रेफर करा रंगमंचाला नाव दिलेले आहे.

**प्रविण पाटील :-**

धृवकिशोरजी तिकडचे गावकरी आहेत. स्थानिक नागरिक आहेत नगरसेवक आहेत त्यांना माहिती नाही तुम्हाला माहिती आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

ते आमच्या देवस्थानी आहेत आणि एवढे सांगुन सुध्दा तुम्ही समजत नाही.

**प्रविण पाटील :-**

तुम्ही समजत नाही ते स्थानिक नागरिक आहेत गावकरी आहेत. एका बाजूने त्यांची स्तुती करता आणि एका बाजूने विरोध करता.

**धृवकिशोर पाटील :-**

विरोध नाही स्तुती करतो आणि अजून करणार.

**अनिता पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलते मॅडम जेव्हा आपल्याला ह्या चौकाला नाव द्यायच नव्हत तर तुम्ही गोषवाऱ्यामध्ये ते नाव द्यायच नव्हतं हे जाणुनबुजून अपमान करायचा होता का?

**प्रविण पाटील :-**

विषय तरी कशाला आणला.

**अनिता पाटील :-**

तुम्ही एका बाजूने बोलता की खुप महत्वाची व्यक्ती होती त्यांनी एवढे योगदान दिले आपल्या मिरा भाईंदरसाठी आणि मग त्यांचा गोषवाऱ्यामध्ये नाव देता आणि जाणून बुजुन तुम्ही त्यांचे नाव कॅन्सल करता याचा अर्थ तुम्ही त्यांचा जाणून बुजून अपमान करत आहात.

**मा. उपमहापौर :-**

हे बघा गिते साहेबांनी त्यांची आठवण सतत आपल्याला देत राहिले आज ते इथे नाहीत ते नाशिकला आहेत. पण त्यांचा टिप्पण्यांच्या आधारे सारखी आपल्याला आठवण देत आहेत. कदाचित आपणच गेला असाल त्यांच्याकडे मागणी केली असेल आणि त्यांनी मोघमपणे ते केल वास्तवतः ह्या गोष्टींची पाहणी करुन करायचे असते. सन्मा. विरोधी पक्षनेते आपण ह्या सभागृहामध्ये प्रतिनिधीत्व करत आहेत. शिवसेनेचे, काँग्रेसचे. आपल्याला काही फसवण्याचे कारण नाही. आपण एक चांगली वास्तु बघु आणि आम्ही ते नावही बदललेले नाही. तिथे ऑलरेडी नाव आहे तिथे दुसरे नाव कशाला देणार.

**विणा भोईर :-**

माजी नगरसेवक सुर्यकांत भोईर यांच्या निधीतून त्यांच्या आईच्या स्मरणार्थ तिथे नाव देण्यांत आलेले आहे स्टेजला आणि तिथे ४ रस्ते जवळ जवळ नाही त्या गल्ल्या आहेत चांगले रस्ते असु द्या आम्ही नाव देतो.

**मा. उपमहापौर :-**

१० मीटर क्षेत्र नाही तिथे ४ नावे कसे देणार. १० मीटरचे पण क्षेत्र नाही.

**मा. महापौर :-**

तुमचा ठराव आहे का?

**प्रविण पाटील :-**

लताकुंज गल्लीचा तुम्हाला काय प्रॉब्लेम आहे?

**मा. उपमहापौर :-**

तिथे पण आम्ही काही बदललेले नाही.

**प्रविण पाटील :-**

नाव टाकले पण नाही ना.

**मा. उपमहापौर :-**

याच्यामध्ये प्रभाग क्र. ११ नवघर रोड येथे लताकुंज गल्ली लिहीलेले आहे. लताकुंज गल्ली म्हणजे काय आलं?

**प्रविण पाटील :-**

लताकुंज गल्ली आहे ते नाव नाही.

**मा. उपमहापौर :-**

ते नाव आम्ही बदललेल नाही. चेक करुन ते आताच्या आता नाही होणार चेक करुन ते नाव बदललेल नाही ते जसेच्या तसे आहे. आपण विषय परत आणू.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

ज्या गल्लीला नाव तुम्ही दिलेल नाही. तर तुम्ही नाव बदलायचा प्रश्न कुठे येतो.

**मा. उपमहापौर :-**

असे का लिहीले लताकुंज गल्ली?

**प्रविण पाटील :-**

पत्ता दिलेला आहे नाव नाही दिलेले.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

एखाद्या बिल्डींगचे नाव असेल म्हणून त्या बिल्डींगचे नाव दिलेले आहे.

**मा. उपमहापौर :-**

लता कुंज त्या गल्लीचे नाव बदललेले नाही. ते आपण नंतर बघू.

**मा. महापौर :-**

तुम्हाला ठरावात नाव दिलेले आहे. तुम्हाला मान्य नसेल तर तुम्ही तुमचा ठराव मांडा.

**मा. उपमहापौर :-**

मागचा जुना ठराव आहे की कुठचेही दिलेले नाव बदलायचे नाही. नसेल तर आपण देऊ. पण आता नाही.

**मा. महापौर :-**

तुम्हाला मान्य नसेल तर तुम्ही तुमचा ठराव मांडा.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

अस जर तुम्हाला खरोखर राजकारण करायचे असेल तर आम्हाला तस सांगा. आम्ही आमच्या पध्दतीने काम करु.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

सगळ्या गोष्टीत राजकारण करायचे कारण नाही.

(सभागृहात गोंधळ)

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम ठराव पास करा आणि पुढचा विषय घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ८४ :-**

**रस्ते, चौक, उद्याने व इतर वास्तुंना नावे देण्याबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे.**

**ठराव क्र. ८३ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील रस्ते. चौक, उद्याने व इतर वास्तुंना नावे देण्याकरीता सन्मानीय नगरसेवक / नगरसेविका यांना पत्र देऊन प्रस्ताव मागविण्यास आले होते. त्यांच्याकडुन प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. यापुर्वी झालेले नामकरण वगळात खालील प्रस्ताव सादर करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव | प्रस्तावित नाव |
|---|---|---|
| १ | मिरारोड प्रभाग क्र. १५ मध्ये डॉन-बोस्को स्कुल पासुन ते सरळ डायमंड टॉवर हायवे पर्यंत मार्ग. | पंडित दीनदयाल उपाध्याय मार्ग. |
| २ | भाईंदर (पुर्व) नवघर रोड आरक्षण क्र. १०९ या जागेतील अभ्यासीका. | सावित्रीबाई फुले अभ्यासिका. |
| ३ | नयानगर हॉल. | मेजर अब्दुल हमीद हॉल. |
| ४ | साईपॅलेस हॉटेल पासून ते दाचकुलपाडा पर्यंतच्या रस्त्याला विश्वकर्मा रोड. | विश्वकर्मा रोड |
| ५ | भाईंदर (प) येथे रेल्वे समांतर रस्त्यावर प्लेनेटरिया कॉम्पलेक्स कडे जाणा-या चौकास. | संत सेवालाल महाराज चौक. |
| ६ | आरक्षण क्र.१२१ वाचनालय. | साहित्यकार इंद्रबहादूर सिंग. |
| ७ | आरक्षण क्र.३०१ वाहनतळ | रविंद्रनाथ टागोर वाहनतळ |
| ८ | आरक्षण क्र. २६४ वाहनतळ | चितुरानी चन्नमा |
| ९ | फ्लायओव्हर ब्रीजपासून रेल्वे समांतर जाणा-या चौकास | माहेश्वरी भवन चौक |
| १० | डीमार्ट ओपन प्लॉट व ओमकार टॉवर मधील चौकास | श्री संत ओधवरामजी चौक |

वरील नामकरण प्रस्तावांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची 'ड' मधील प्रकरण ११ (२) अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्रीम. विणा भोईर           अनुमोदक :- श्रीम. सुरेखा सोनार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८५, **जाहिरात विभागाच्या उत्पन्नाबाबत धोरण ठरविणे व दराबाबत निर्णय घेणे तसेच मुख्य रस्त्यावरील कमानींवर दिशादर्शक फलक व जाहिरात फलक प्रदर्शित करण्याबाबत दर व धोरण ठरविणे.**

राकेश शहा :-

**मिरा भाईंदर महानगरपालिका मार्फत विविध व्यक्ती /संस्था/कंपनी यांना महापालिकेच्या जागेत ठेक्याद्वारे होर्डींग्जवर जाहिरात उभारण्याची परवानगी देण्यात येते व खाज गी जागेत ही होर्डींग्ज उभारण्याची परवानगी महानगरपालिका देते. मा. महासभेने सन 2008 साली निश्चित केलेल्या दरानुसार जाहिरात फी आकारली जाते.**

**दिवसें दिवस मार्केट दर वाढले त्याप्रमाणे महापालिकेच्या जागेत उभारलेल्या होर्डींग्जचे दर वाढत गेले पण प्रशासनाने खाजगी जागेत उभारलेल्या होर्डींग्जचे दर न वाढल्याने महापालिकेचे उत्पन्न बुडाले व खुप मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.**

**शहराची लोकसंख्या वाढल्याने व अनेक उद्योगधंदे शहरात आल्याने जाहिरातीचे दर वाढले त्यामुळे दि.19/07/2014 रोजीच्या मा. महासभेत मार्केट दराप्रमाणे नविन दर मंजुर केला.**

**ठेकेदारांनी प्रशासनाशी हात मिळवणी करुन सदर दरवाढीची अंमलबजावणी करु नये म्हणून कार्यवाही सुरु केली व प्रशासनाने ठरावाची अंमलबजावणी न करता मार्केट दराचा अभ्यास न करता महापालिकेचे आर्थिक नुकसान करुन ऑगस्ट 2016 रोजी प्रशासनाने कमी दराचा प्रस्ताव तयार करुन मा. महासभेपुढे सादर केला. प्रस्तावात दर कमी असल्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होईल म्हणून मा. महासभेत प्रस्ताव घेतला नाही व प्रशासनाने नंतर प्रस्ताव 90 दिवसात मा. महासभेपूढे न आल्याने मंजुर समजुन कार्यवाही सुरु केली. मार्च 2017 मध्ये मा. आयुक्त यांनी आपल्या मनाप्रमाणे मान्यता देवून शासनाची परवानगी न घेता स्वत:चे दर ठरवून कारवाई केली.**

**चेकनाका ते फाऊंटन हॉटेल हे प्राईम लोकेशन मधील खाजगी जागेतील होर्डींग्ज चे दर मार्केट मध्ये सर्वात महाग असून महापालिकेतर्फे सर्वात कमी दरात म्हणजे रु .16 प्रती चौ.फुट आकारण्यात येत आहे वास्तविक हे दर वाढणे गरजेचे आहे . पण हे दर वाढवले नाही , नुकतेच जाहिरातीची निविदा प्रशासनाने काढली असता महापालिकेने ठरविलेल्या रक्कमेपेक्षा दुपटीने व त्याहून अधिक वाढीव रक्मेची निविदा प्राप्त झाली आहे यावरुन दिसून येते की, प्रशासनाने ठेकेदारांच्या जास्तीत जास्त फायदा व्हावा व महापालिकेचे नुकसान व्हावे. यामध्ये मोठा भ्रष्टाचार झाला असून महापालिकेचे करोडो रुपयांचे नुकसान झाल्यामुळे मा. महापौरांनी तत्कालीन अधिकाऱ्यांची चौकशी करण्यासंबंधी मा . मुख्यमंत्री, लाचलुचपत विभाग तसेच आर्थिक गुन्हे शा खा यांना पत्र द्यावे . मा. आयुक्त यांनी संपूर्ण शहरातील होर्डींग्ज (खाजगी/महापालिकेच्या जागेवरील) चा अभ्यास करुन सुधारीत ठराव मंजुर होईपर्यंत आयुक्त यांनी मागील 2014 च्या ठरावाप्रमाणे कारवाई करावी ज्या लोकांनी कमी जुन्या दराने पैसे भरलेले आहे त्यांचेकडून जुन्या 2014 च्या ठरावातील दराने रक्कम वसुल करावी तसेच मार्केट दराप्रमाणे दर ठरवून प्रस्ताव मा . महासभेसमोर ठेवून नविन निविदा काढावी असा मी ठराव मांडत आहे.**

श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर. पुढचा विषय घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**प्रकरण क्र. ८५ :-**

**जाहिरात विभागाच्या उत्पन्नाबाबत धोरण ठरविणे व दराबाबत निर्णय घेणे तसेच मुख्य रस्त्यावरील कमानींवर दिशादर्शक फलक व जाहिरात फलक प्रदर्शित करण्याबाबत दर व धोरण ठरविणे.**

ठराव क्र. ८४ :-

**मिरा भाईंदर महानगरपालिका मार्फत विविध व्यक्ती/संस्था/कंपनी यांना महापालिकेच्या जागेत ठेक्याद्वारे होर्डींग्जवर जाहिरात उभारण्याची परवानगी देण्यात येते व खाजगी जागेत ही होर्डींग्ज उभारण्याची परवानगी महानगरपालिका देते . मा. महासभेने सन 2008 साली निश्चित केलेल्या दरानुसार जाहिरात फी आकारली जाते.**

**दिवसें दिवस मार्केट दर वाढले त्याप्रमाणे महापालिकेच्या जागेत उभारलेल्या होर्डींग्जचे दर वाढत गेले पण प्रशासनाने खाजगी जागेत उभारलेल्या होर्डींग्जचे दर न वाढल्याने महापालिकेचे उत्पन्न बुडाले व खुप मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.**

**शहराची लोकसंख्या वाढल्याने व अनेक उद्योगधंदे शहरात आल्याने जाहिरातीचे दर वाढले त्यामुळे दि.19/07/2014 रोजीच्या मा. महासभेत मार्केट दराप्रमाणे नविन दर मंजुर केला.**

**ठेकेदारांनी प्रशासनाशी हात मिळवणी करुन सदर दरवाढीची अंमलबजावणी करु नये म्हणून कार्यवाही सुरु केली व प्रशासनाने ठरावाची अंमलबजावणी न करता मार्केट दराचा अभ्यास न करता महापालिकेचे आर्थिक नुकसान करुन ऑगस्ट 2016 रोजी प्रशासनाने कमी दराचा प्रस्ताव तयार करुन मा. महासभेपुढे सादर केला . प्रस्तावात दर कमी असल्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होईल म्हणून मा. महासभेत प्रस्ताव घेतला नाही व प्रशासनाने नंतर प्रस्ताव 90 दिवसात मा. महासभेपूढे न आल्याने मंजुर समजुन कार्यवाही सुरु केली. मार्च 2017 मध्ये मा. आयुक्त यांनी आपल्या मनाप्रमाणे मान्यता देवून शासनाची परवानगी न घेता स्वत:चे दर ठरवून कारवाई केली.**

**चेकनाका ते फाऊंटन हॉटेल हे प्राईम लोकेशन मधील खाजगी जागेतील होर्डींग्ज चे दर मार्केट मध्ये सर्वात महाग असून महापालिकेतर्फे सर्वात कमी दरात म्हणजे रु .16 प्रती चौ.फुट आकारण्यात येत आहे वास्तविक हे दर वाढणे गरजेचे आहे. पण हे दर वाढवले नाही, नुकतेच जाहिरातीची निविदा प्रशासनाने काढली असता महापालिकेने ठरविलेल्या रक्कमेपेक्षा दुपटीने व त्याहून अधिक वाढीव रक्मेची निविदा प्राप्त झाली आहे यावरुन दिसून येते की , प्रशासनाने ठेकेदारांच्या जास्तीत जास्त फायदा व्हावा व महापालिकेचे नुकसान व्हावे . यामध्ये मोठा भ्रष्टाचार झाला असून महापा लिकेचे करोडो रुपयांचे नुकसान झाल्यामुळे मा. महापौरांनी तत्कालीन अधिकाऱ्यांची चौकशी करण्यासंबंधी मा. मुख्यमंत्री, लाचलुचपत विभाग तसेच आर्थिक गुन्हे शाखा यांना पत्र द्यावे . मा. आयुक्त यांनी संपूर्ण शहरातील होर्डींग्ज (खाजगी/महापालिकेच्या जागेवरील ) चा अभ्यास करुन सुधारीत ठराव मंजुर होईपर्यंत आयुक्त यांनी मागील 2014 च्या ठरावाप्रमाणे कारवाई करावी ज्या लोकांनी कमी जुन्या दराने पैसे भरलेले आहे त्यांचेकडून जुन्या 2014 च्या ठरावातील दराने रक्कम वसुल करावी तसेच मार्केट दराप्रमाणे दर ठरवून प्रस्ताव मा . महासभेसमोर ठेवून नविन निविदा काढावी असा मी ठराव मांडत आहे.**

**सुचक :- श्री. राकेश शाह अनुमोदक :- श्री. श्रीप्रकाश सिंह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र. ८६, **महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५२ क नुसार अनधिकृत बांधकामाचे प्रशमन आकार लावून ‘प्रशमित संरचना ” म्हणून घोषित करण्यासाठी अधिनियमाचे कलम १५८ (१) अन्वये शासनाने केलेले नियम प्रसिध्द करणेबाबत.**

धृवकिशोर पाटील :-

**शासनाचे नगर विकास विभागाचे शासन निर्णय क्र .टीपीएस-1814/प्र.क्र.82/14/नियम/नवि-13, दि.07/10/2017 अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 मधील कलम 52 क नुसार अनधिकृत बांधकामे "प्रशमन आकार" लावून "प्रशमित संरचना" म्हणून घोषित करावी म्हणून अधिसुचना प्रसिद्ध झाली आहे. त्यासाठी शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररच ना अधिनियम 1966 चे कलम 158 अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारा अंतर्गत Maharashtra Town Planning (Compound Structure ) Rules 2017 ही नियमावली तयार केलेली आहे . यामध्ये नियोजन प्राधिकरणाच्या हद्दीनुसार दि .31/12/2015 पर्यंत किंवा त्यापूर्वीची झालेली अनधिकृत बांधका मे "प्रशमित संरचना" (Compound Structure) म्हणून घोषित करुन पुढील कार्यवाही करण्याबाबतची नियमावली लागू केलेली असून सदरची अधिसूचना प्रसिद्ध झाली आहे . सदरची अधिसूचना प्रसिद्ध झाल्यापासून त्यातील नियमावली क्र .9 नुसार नियोजन प्राधिकरण म्हणजेच मिरा भाईंदर महानगरपालिका, सदर नियमावली नुसार अधिसुचना प्रसिद्ध झाल्यापासून 6 महिन्याच्या आत , जनतेच्या अवलोकनार्थ व प्रसिद्ध नमुन्यानुसार "प्रशमित संरचना " अंतर्गत विचारात घ्यावयाच्या बांधकामाबाबत अर्ज मागविण्यासाठी वृत्तपत्रात जाहिर प्रसिद्धी करणे आवश्यक आहे . त्यानुसार सदर जाहिर प्रसिद्धी करणे मिरा भाईंदर महानगरपालिकेस क्रमप्राप्त आहे.**

**सबब सदर प्रकरणी जाहिर प्रसिद्धी करणेसाठी मान्यता आहे असा मी ठराव मांडत आहे.**

प्रशांत दळवी :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव मंजुर. पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. ८६ :-

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५२ क नुसार अनधिकृत बांधकामाचे प्रशमन आकार लावून "प्रशमित संरचना" म्हणून घोषित करण्यासाठी अधिनियमाचे कलम १५८ (१) अन्वये शासनाने केलेले नियम प्रसिध्द करणेबाबत.**

ठराव क्र. ८५ :-

**शासनाचे नगर विकास विभागाचे शासन निर्णय क्र.टीपीएस-1814/प्र.क्र.82/14/नियम/नवि-13, दि.07/10/2017 अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 मधील कलम 52 क नुसार अनधिकृत बांधकामे "प्रशमन आकार" लावून "प्रशमित संरचना" म्हणून घोषित करावी म्हणून अधिसुचना प्रसिद्ध झाली आहे. त्यासाठी शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 158 अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारा अंतर्गत Maharashtra Town Planning (Compound Structure ) Rules 2017 ही नियमावली तयार केलेली आहे . यामध्ये नियोजन प्राधिकरणाच्या हद्दीनुसार दि .31/12/2015 पर्यंत किंवा त्यापूर्वीची झालेली अनधिकृत बांधकामे "प्रशमित संरचना" (Compound Structure) म्हणून घोषित करुन पुढील कार्यवाही करण्याबाबतची नियमावली लागू केलेली असून सदरची अधिसूचना प्रसिद्ध झाली आहे . सदरची अधिसूचना प्रसिद्ध झाल्यापासून त्यातील नियमावली क्र .9 नुसार नियोजन प्राधिकरण म्हणजेच मिरा भाईंदर महानगरपालिका, सदर नियमावली नुसार अधिसुचना प्रसिद्ध झाल्यापासून 6 महिन्याच्या आत , जनतेच्या अवलोकनार्थ व प्रसिद्ध नमुन्यानुसार "प्रशमित संरचना " अंतर्गत विचारात घ्यावयाच्या बांधकामाबाबत अर्ज मागविण्यासाठी वृत्तपत्रा त जाहिर प्रसिद्धी करणे आवश्यक आहे . त्यानुसार सदर जाहिर प्रसिद्धी करणे मिरा भाईंदर महानगरपालिकेस क्रमप्राप्त आहे.**

**सबब सदर प्रकरणी जाहिर प्रसिद्धी करणेसाठी मान्यता आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. प्रशांत दळवी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८७, **भाईंदर (पूर्व) नवघर नाका सुशोभिकरण व स्वातंत्र्य सैनिकाचे स्मारक उभारणे.**

**प्रभात पाटील :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) नवघर नाका सुशोभिकरण करणे व स्वातंत्र्य सैनिकाचे स्मारक बांधणे कामाचा गोषवारा मा. महासभेत ठेवण्यासाठी सादर करण्यासाठी मा. महापौर तसेच नगरसेविका यांनी कळविलेले असून मा .श्रीम. प्रभात पाटील यांनी देखिल पत्रव्यवहार केला आहे.**

**भाईंदर (पुर्व) नवघर नाका येथे नवघर मराठी शाळा व हनुमान मंदिर मधील रस्ता विकास योजनेत 18.00 मीटर रुंदीचा असून सदर रस्त्यालगत नवघर शाळा, हनुमान मंदिर, एस.एन. कॉलेज रोड, नवघर स्मशानभूमी व नवघर दत्त मंदिरकडे जाणारे रस्ते एकत्र येतात . सदर नवघर चौकाचे फॅनिंग, रुंदीकरण व शाळेसमोरील अतिक्रमण काढणे , डीवायडर काढणे व कायदेशीर पूर्तता करुन डिवायडर मधील आवश्यक ती झाडे काढणे इ. कामे त्वरीत करण्यात यावीत.**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नवघर येथे स्वातंत्र्य सैनिकाचे स्मारक होण्यासाठी मागणी होत आहे. तरी सदर कामाच्या खर्चासाठी सन 2018-19 या वर्षाच्या अर्थसंकल्पात नवघर येथे स्वातंत्र्य सैनिकाचे स्मारक बांधणे हे लेखाशिर्ष तयार करण्यास , सदर कामाचे नकाशे, आराखडे तयार करण्यास व येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**गणेश भोईर :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

आमचा ठराव आहे. स्वातंत्र सैनिकांचे स्मारक बांधत आहेत. स्वातंत्र सैनिकांचे अपमान करत आहेत आणि महापौर मॅडम तुम्ही वरती................

**मा. महापौर :-**

स्वातंत्र सैनिक स्मारक बांधणे याच्यावर तुमचा ठराव आहे का?

**अनिल सावंत :-**

आमचा ठराव आहे.

**मा. महापौर :-**

बोला.

**अनिल सावंत :-**

तुम्हाला तेवढ्यासाठी का बसविलेले आहे तुम्हाला सभागृह कंट्रोल करायचे आहे.

(सभागृहात गोंधळ)

**धृवकिशोर पाटील :-**

ठराव असेल तर घ्या नाही तर मंजुर करा. पुढचा विषय घ्या.

**मा. महापौर :-**

विषयावर बोला.

**जुबेर इनामदार :-**

विषयावरच बोलणार.

**अनिल सावंत :-**

गोषवाऱ्यामधील आणि एका त्याठिकाणी सदस्य आपल्या भावना मांडत आहेत. सुरेश खंडेलवालसारखे नगरसेवक सांगत आहेत की बकवास बंद करा. म्हणजे स्वातंत्र्य सैनिकांविषयी बोलणे याला.............

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

तुमचा ठराव आहे का? आम्ही तुम्हाला सारखे सहभागी करुन घेत आहोत. तुमच्या बोलण्याची संधी नाकारत नाही.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

स्वातंत्र्य सैनिक स्मारक बांधणेबाबत तुमचा ठराव आहे का?

**प्रविण पाटील :-**

ठराव नाही.

(सभागृहात गोंधळ)

**प्रविण पाटील :-**

नवघर नाक्यावरती स्वांत्र्य सैनिकाचे स्मारक व्हावे अशी सर्वांची इच्छा आहे. नवघर गाव हे स्वातंत्र्य सैनिकांचे गाव ह्या शहरामध्ये जेवढे स्वातंत्र सैनिक झाले त्यापैकी २५ ते २६ स्वातंत्र्य सैनिक नवघर गावातून झाले अशी मागणी नवघर गावातील व इतर विभागातून होत असते या विभागाचे आम्ही ४ नगरसेवक आहोत. आम्ही चारही नगरसेवकांनी महापालिकेकडे मागणी केली होती. त्यानंतर सन्मा. नगरसेविका प्रभातताई पाटील यांनीही ती मागणी केलेली आहे. नवघर नाका हा गजबजलेला असतो. आता नेमके स्मारक तिथे कुठल्या प्रकारे बांधणार आहात त्याचप्रमाणे वाहतुकीला कुठल्याप्रकारे अडचण होणार नाही याची जरी दक्षता घेतली आणि ते बांधत असताना आम्ही चारही नगरसेवक स्थानिक नगरसेवक यांना विचारात घेऊन आणि तिकडचे असलेले दुकाने, फेरिवाले आणि नाक्याचे सुशोभिकरण कसे वाढेल ह्या सगळ्या बाबींचा विचार करुन आणि आम्ही चारही नगरसेवकांना विचारात घेऊन प्रभात ताईंना पण विचारात घेऊन जर बांधले तर बर पडेल कारण मागच्या वेळीला असाच विषय आणला होता. परस्पर महापालिकेचे अधिकारी येऊन तिथे तोडफोड करुन गेले आम्हाला कुठल्याही प्रकारची कल्पना नसताना तिकडचे असलेले थोडेफार बांधकाम चौकाचे ते तोडले आणि आम्हाला कल्पनाच नाही. तिकडच्या नागरिकांमध्ये दुसर वातावरण तयार झाल तर तुम्हाला विनंती आहे आम्हाला नगरसेवकांना सर्वांना विश्वासात घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना बोलवून तिथे चांगल्या प्रकारे चौक उभारावे अशी विनंती आहे.

**प्रभात पाटील :-**

प्रविण पाटीलचे खुप खुप आभार एक चांगल्या कामाला सपोर्ट केलात. खरा वॉर्ड तुमचा आहे. एकीकडे मी आहे. हे देखील तेवढे सत्य आहे. मला एवढच म्हणायचे आहे ह्या शहराचा इतिहास पाहिला आज आपण खुल्या हवेमध्ये श्वास घेत आहोत. खुल्या मनाने वागत आहोत. खुल्या मनाने आपल्याला पूर्ण स्वातंत्र्य आहे परंतु हे स्वातंत्र्य ज्यांच्यामुळे आपल्याला मिळाले त्या स्वातंत्र्य सैनिकांमध्ये नवघर गावातले भाईंदर विभागामध्ये ३८ स्वातंत्र्य सैनिक होते. त्यातले २६ आहेत त्या नवघर गावचे. हे नवघर गाव असले की अत्यंत भुषण गोष्ट आहे. त्यातले ४२ च्या चळवळीमध्ये १८ लोक होते व वैयक्तिक सत्यागृहात २ होते आणि जंगल सत्यागृहामध्ये ६ होते हे ८ लोक जे भुमिगत होते. परंतु ४२ च्या लढ्यामध्ये जे १८ लोक होते त्यांनी कारावास भोगला या स्वातंत्र्य सैनिकांना आपल्याला विसरता येणार नाही. कारण त्याच्या जिवावर आज आपले मजले वर चढत आहेत अशा वेळेला नवघर लोकांचा आता मध्यांतरी लता कुंज गोष्टीवरुन विषय निघाला त्यांचे सासरे सुध्दा स्वातंत्र्य सैनिक होते. नवघरच्या शाळेला त्यांचे नाव देण्यात आलेले आहे. आपण विविध ठिकाणी काही ठिकाणी रस्त्यांना गल्ल्यांना त्यांचे नाव दिलेली आहेत. माझी एकच इच्छा होती आणि माझ्याकडे पत्रव्यवहार आहे. २०१५ पासून मी माझा नगरसेवक निधी पण देऊ केला, प्रभाग निधी पण देऊ केला परंतु प्रशासनाच्या मनात काय होते मला माहिती नाही आणि त्यानंतर आता मला अस वाटत की मी ५ तारखेला आपल्याला एक पत्र दिल होतं. महापौर म्हणून नगरसचिवांना एक पत्र दिलं की हा विषय घ्यावा त्यानुसार महापौरांनी प्रशासनाकडे विषय दिला आणि तो पटलावर आला त्याबद्दल मी तुमचे मा. आमदार नरेंद्र मेहता यांचे खुप आभार मानतो आणि त्यांच्या खालोखाल मी विरोधी पक्षाचेही आभार मानते की ज्यांनी हा चांगल्या प्रस्तावावर सहयोग दाखविला. प्रत्यक्षात काम करताना त्यांचाही सहभाग घ्या, माझाही घ्या त्याबद्दल काही डाऊ नाही. परंतु ह्या शहरामध्ये ज्यांनी आपले आयुष्य पणाला लावल त्यांची स्मारक होणे त्यांच्या नावाने एक वास्तु होणे हे माझे ही स्वप्न होते. तुमचा दुजोरा आहे आणि त्याबद्दल सभागृहामध्ये विषय पारीत झाला त्याबद्दल संपूर्ण शहराच्या वतीने मला असे वाटते की सगळ्या नगरसेवकांच्या वतीने प्रशासनाचे खुप खुप आभार मानते आणि मा. आयुक्तांना

विनंती करते की हे स्मारक यथोचित स्मारक चांगल्या पध्दतीने करावे आणि लवकरात लवकर करावे एवढीच माझी सुचना आहे.

**मा. महापौर :-**

सगळ्या नगरसेवकांना विश्वासात घेऊन ते स्मारकांचे काम करु. ठराव मंजुर पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ८७ :-**

**भाईंदर (पूर्व) नवघर नाका सुशोभिकरण व स्वातंत्र्य सैनिकाचे स्मारक उभारणे.**

ठराव क्र. ८६ :-

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) नवघर नाका सुशोभिकरण करणे व स्वातंत्र्य सैनिकाचे स्मारक बांधणे कामाचा गोषवारा मा. महासभेत ठेवण्यासाठी सादर करण्यासाठी मा. महापौर तसेच नगरसेविका यांनी कळविलेले असून मा .श्रीम. प्रभात पाटील यांनी देखिल पत्रव्यवहार केला आहे.**

**भाईंदर (पुर्व) नवघर नाका येथे नवघर मराठी शाळा व हनुमान मंदिर मधील रस्ता विकास योजनेत 18.00 मीटर रुंदीचा असून सदर रस्त्यालगत नवघर शाळा, हनुमान मंदिर, एस.एन. कॉलेज रोड, नवघर स्मशानभूमी व नवघर दत्त मंदिरकडे जाणारे रस्ते एकत्र येतात . सदर नवघर चौकाचे फॅनिंग, रुंदीकरण व शाळेसमोरील अतिक्रमण काढणे , डीवायडर काढणे व कायदेशीर पूर्तता करुन डिवायडर मधील आवश्यक ती झाडे काढणे इ. कामे त्वरीत करण्यात यावीत.**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नवघर येथे स्वातंत्र्य सैनिकाचे स्मारक होण्यासाठी मागणी होत आहे. तरी सदर कामाच्या खर्चासाठी सन 2018-19 या वर्षाच्या अर्थसंकल्पात नवघर येथे स्वातंत्र्य सैनिकाचे स्मारक बांधणे हे लेखाशिर्ष तयार करण्यास , सदर कामाचे नकाशे, आराखडे तयार करण्यास व येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**सुचक :- सौ प्रभात पाटील अनुमोदक :- श्री. गणेश भोईर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र. ८८, **मिरा भाईंदर शहरात गोरगरीबांकरीता नाममात्र दरात अन्नछत्र उभारणेबाबत.**

सिमा शहा :-

**महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मोफत किंवा नाममात्र दरात गोरगरीब लोकांसाठी अन्नछत्रे चालविली जातात . मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रात देखील बऱ्याच प्रमाणात ग्रामीण व आदिवासी भागांचा समावेश आहे . या शहरात विविध ग्रामीण भागातून व आदिवासी पाड्यातून गोरगरीब लोक रोजगाराच्या माध्यमातून येत असतात . अशा गोरगरीब लोकांची भुख भागवावी याची प्रकर्षाने जाणीव झाल्यामुळे अशाप्रकारचे अन्नछत्र मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात देखील सुरु करण्याच्या कल्पनेचे बीज रुजले.**

**परिणामत: मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात गोरगरीबांकरीता संध्याकाळी एकवेळ रु .10/- नाममात्र दरात भरपेट जेवण देवून अन्नछत्र उभारण्यात यावे त्याकरीता आवश्यक ती निविदा मा . आयुक्त यांनी काढावी . याकामी प्रशासनाने प्रायोगीक तत्वावर एका अन्नछ त्राची उभारणी करावी व योग्य ती जागा ठरवून याबाबतची सर्व कार्यवाही करुन सदरचा प्रस्ताव पुढील मा . महासभेत सादर करावा. तसेच यासाठी येणाऱ्या खर्चाची सन 2018-19 या अर्थ संकल्पीय अंदाजपत्रकात लेखाशिर्ष घेवून आवश्यक तेवढी तरतुद करावी . या योजनेला "पंडीत दिनदयाल उपा ध्याय अन्नछत्र योजना " म्हणून असे संबोधण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.**

**अश्विन कासोदरिया :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम आयुक्तांना माझा प्रश्न असणार आहे साहेब मी असे करु शकतो का? प्रथम गोषवारा नाही याच्याआधी गोषवारा नव्हता विषय परत घेतला. असे बोलून की प्रशासनाचा गोषवारा नाही म्हणून आम्ही तो विषय मागे घेतो. तर याच्यामध्ये प्रशासनाचा गोषवारा नाही खर तर प्रशासनाची याच्यामध्ये काय भुमिका असणार आहे.

**मा. उपमहापौर :-**

आपण पुढच्या सभेसमोर आणायला सांगितलेले आहे.

**प्रविण पाटील :-**

आपल्या अन्नछत्राची व्याख्या काय आहे.

**मा. उपमहापौर :-**

असे आहे की ह्या शहरामध्ये अनेक संस्था खिचडी हफ्त्यातुन एक दिवस देत असतात अशी संकल्पना आहे की सुरुवातीला आपण अनेक शाळांना बघा खिचडी देतो तर अशा प्रकारे महापालिकेच्या क्षेत्रामध्ये पहिल्यांदा एक स्पॉट वरती आपण सुरुवात करुनया की गरिबांला निदान एक वेळी त्या गरिब लोकांसाठी आपण ती व्यवस्था करतोय की ज्यांची आर्थिक स्थिती नाही तर त्याच्यामध्ये दाल चावल किंवा खिचडी लोणच अस काही तरी आणि भरपेट अस नाही की एक पळी टाकली आणि तो खाऊन गेला ते १० रुपये फक्त एक नाममात्र घ्यायचे आणि त्याला पोटभरुन खाता आले पाहिजे. तर त्याठिकाणी तोच नागरिक जाईल तोच व्यक्ती जाईल जो उपाशी आहे. आणि मग याला तर जास्त समर्थन मिळत असेल तर या शहरामध्ये महापालिकेच्या कार्यालयाच्या आजूबाजूला असे कुठेतरी दोन तीन ठिकाणी अशी आपण व्यवस्था ठेवू की त्या तिकडे लोकांची एक वेळची भूक भागविली जाईल.

**जुबेर इनामदार :-**

भावना चांगली आहे वाईट नाही. करता येईल की नाही ते महत्वाचे आहे. शाळेमध्ये आपण दुपारचे जेवण देतो शासनाचे धोरण आहे. महापालिकेला किंवा कुठल्याही महानगरपालिकेला आपली महानगरपालिका २०-२५ वर्ष जुनी आहे. मुंबई महापालिका ६०-७० वर्ष जुनी त्यांनी हा असा प्रयोग केलेला नाही.

**मा. उपमहापौर :-**

आपण १२ लाख ५८ ते १ करोड ३० लाख आहेत.

**जुबेर इनामदार :-**

मग मी तेच म्हणतो त्याची उत्पन्नाची बाजू आणि आमच्या उत्पन्नाच्या बाजूमध्ये भरपूर फरक आहे. त्यांच्याकडे एम.एम.आर.डी.ए यांच्यांकडे एम.एम.आर.डी.ए. नाही.

**मा. उपमहापौर :-**

हे करावी भावना आहे ना तुमची थोड्याशा अवधीत आपण चालू करु.

**जुबेर इनामदार :-**

आमची तयारी आहे. करायची प्रशासनाच्या माध्यमातून गोषवारा आला. प्रशासन सांगेल आमची अर्थव्यवस्था कशी आहे. आमची आर्थिक परिस्थिती आहे का आम्ही करु शकतो का कस करता येईल किंवा केल तर कुठल्या क्षेत्रामध्ये करता येईल करायचे तर कुठे करायचे त्याचा गोषवाराच नाही म्हणजे आम्ही ठराव कसा करायचा आम्हाला जर काही सुचना करायच्या असतील तर कस होणार.

**मा. उपमहापौर :-**

सुचनांचे स्वागत राहील. पुढच्या मिटींगमध्ये जो विषय येणार आहे आपल्याला करता येते का तरतूद किती तर त्यावेळेला आपल्याला आपल्या सुचना देता येतील.

**जुबेर इनामदार :-**

साहेब तुम्ही ह्या सभागृहामध्ये नव्हता. तत्कालीन आयुक्त हांगे साहेब त्यांनी एक परिपत्रक काढले होते आणि त्यांनी असा मर्दासारखा वरती पिठासीन वरुन मंचावरुन त्यांनी काय बोलले होते माहिती आहे ज्या विषयाचा गोषवारा प्रशासन देणार नाही ते विषय आम्ही करणार नाही.

**मा. उपमहापौर :-**

धन्यवाद हिंमत वाढविल्याबद्दल.

**जुबेर इनामदार :-**

त्यांनी मंचावरुन अशी घोषणा केली होती की माझी अपेक्षा तशीच अपेक्षा पवार साहेबांच्याकडे तशीच अपेक्षा आहे. त्यांनी अशाचप्रकारे भुमिका घ्यावी कारण यांची काहीही करायची तयारी आहे. काय काय करतील परमेश्वराला माहित. मी ठरावाचे वाचन करतो. मिरा भाईंदर शहरात गोरगरीबांकरीता नाममात्र दरात अन्नछत्र उभारणेबाबतचा विषय प्रशासनाने महासभेच्या विषयपत्रिकेवर प्रस्तावित केलेला आहे. परंतु सदरच्या विषयाचा प्रशासनाने गोषवारा दिलेला नाही. त्याअर्थी सदर विषय बाबत प्रशासनाची भुमिका स्पष्ट होत नाही. तरी सदरचा विषय मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने गोषवाऱ्यासहित निर्णयासाठी प्रस्तावित करावे असा मी ठराव मांडत आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. उपमहापौर :-**

सचिव दोन ठराव आहेत मतदान घ्या.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८८ साठी दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्रीम. सिमा शहा, अनुमोदन श्री. अश्विन कासोदरिया. दुसरा ठराव सुचक श्री. जुबेर इनामदार, अनुमोदन श्री. हरिश्चंद्र आमगावकर. प्रथम दुसरा ठराव मी मतदानास टाकतो. सुचक श्री. जुबेर इनामदार यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्रीम. सिमा शहा यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्रीम. सिमा शहा यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ५३, विरोधात २७, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. श्रीम. सिमा शहा यांचा ठराव बहुमताने मंजूर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ८८ :-**

**मिरा भाईंदर शहरात गोरगरीबांकरीता नाममात्र दरात अन्नछत्र उभारणेबाबत.**

ठराव क्र. ८७ :-

**महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मोफत किंवा नाममात्र दरात गोरगरीब लोकांसाठी अन्नछत्रे चालविली जातात . मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रात देखील बऱ्याच प्रमाणात ग्रामीण व आदिवासी भागांचा समावेश आहे . या शहरात विविध ग्रामीण भागातून व आदिवासी पाड्यातून गोरगरीब लोक रोजगाराच्या माध्यमातून येत असतात . अशा गोरगरीब लोकांची भुख भागवावी याची प्रकर्षाने जाणीव झाल्यामुळे अशाप्रकारचे अन्नछत्र मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात देखील सुरु करण्याच्या कल्पनेचे बीज रुजले.**

**परिणामत: मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात गोरगरीबांकरीता संध्याकाळी एकवेळ रु .10/- नाममात्र दरात भरपेट जेवण देवून अन्नछत्र उभारण्यात यावे त्याकरीता आवश्यक ती निविदा मा . आयुक्त यांनी काढावी . याकामी प्रशासनाने प्रायोगीक तत्वावर एका अन्नछत्राची उभारणी करावी व योग्य ती जागा ठरवून याबाबतची सर्व कार्यवाही करुन सदरचा प्रस्ताव पुढील मा . महासभेत सादर करावा. तसेच यासाठी येणाऱ्या खर्चाची सन 2018-19 या अर्थ संकल्पीय अंदाजपत्रकात लेखाशिर्ष घेवून आवश्यक तेवढी तरतुद करावी . या योजनेला "पंडीत दि नदयाल उपाध्याय अन्नछत्र योजना " म्हणून असे संबोधण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.**

**सुचक :- श्रीम. सिमा शाह अनुमोदन :- श्री. अश्विन कासोदरीया**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजू यशवंत | |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | पाटील प्रविण मोरेश्वर | निरंक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | परेरा कॅटलीन एन्थोनी | |
| ५ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ५ | नलावडे दिनेश दगडु | |
| ६ | पाटील प्रभात प्रकाश | ६ | शिर्के अनंत गेणू | |
| ७ | सिंह मदन उदितनारायण | ७ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| ८ | भानुशाली वर्षा गिरधर | ८ | सावंत अनिल दिवाकर | |
| ९ | यादव मिरादेवी रामलाल | ९ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| १० | हसनाळे ज्योत्सना जालींदर | १० | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| ११ | गोहिल शानू जोरावर सिंह | ११ | कदम अर्चना अरुण | |
| १२ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | १२ | पाटील अनिता जयवंत | |
| १३ | भोईर सुनिता शशिकांत | १३ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १४ | सोंस नीला बर्नाड | १४ | भट दीप्ती शेखर | |
| १५ | रावल मेघना दिपक | १५ | गुप्ता कुसुम संतोष | |
| १६ | मोकाशी दिपाली आनंदराव | १६ | भोईर भावना राजू | |
| १७ | जैन सुनिता रमेश | १७ | शेख रुबीना फिरोझ | |
| १८ | नाईक विविता विवेक | १८ | सपार उमा विश्वनाथ | |
| १९ | भावसार वंदना संजय | १९ | परदेशी गिता हरीश | |
| २० | बेलानी हेमा राजेश | २० | सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन | |
| २१ | भोईर विणा सुर्यकांत | २१ | पाटील नरेश तुकाराम | |
| २२ | सोनार सुरेखा प्रकाश | २२ | शेख अमजद गफार | |
| २३ | मुखर्जी अनिता बबलू | २३ | पाटील वंदना विकास | |
| २४ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २४ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| २५ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | २५ | भोईर कमलेश यशवंत | |
| २६ | शाह राकेश रतिशचंद्र | २६ | अहमद साराह अकरम | |
| २७ | शेट्टी अरविंद आनंद | २७ | बांड्या एलायस दुमिंग | |
| २८ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| २९ | तिवारी अशोक सूर्यदेव | | | |
| ३० | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ३१ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३२ | कांगणे मीना यशवंत | | | |
| ३३ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ३४ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३५ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |
| ३६ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ३७ | भोईर जयेश भानुदास | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३८ | **शेट्टी गणेश गोपाळ** | | | |
| ३९ | **थेराडे संजय अनंत** | | | |
| ४० | **राय विजयकुमार सिस्थन नारायण** | | | |
| ४१ | **जैन राजेंद्र भवरलाल** | | | |
| ४२ | **विराणी अनिल रावजीभाई** | | | |
| ४३ | **जैन दिनेश तेजराज** | | | |
| ४४ | **गजरे दौलत तुकाराम** | | | |
| ४५ | **मांजरेकर आनंद दत्ताराम** | | | |
| ४६ | **कासोदारिया अश्विन शामजीभाई** | | | |
| ४७ | **दुबे मनोज रामनारायण** | | | |
| ४८ | **व्यास रवि वासुदेव** | | | |
| ४९ | **खंडेलवाल सुरेश जगदीश** | | | |
| ५० | **पांडेय पंकज सूर्यमणि** | | | |
| ५१ | **भोईर गणेश गजानन** | | | |
| ५२ | **पारधी सुजाता यशवंत** | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र. ८९, **भाईंदर (पु.) व (प.), राई, मुर्धे, डोंगरी, तारोडी व उत्तन या परिसरातील महसुली गावांचा बाकी राहिलेला सिटी सर्व्हे करणेबाबत.**

वर्षा भानुशाली :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकूण **19** महसूली गावांचा समावेश होत असून महानगरपालिकेचे एकूण क्षेत्रफळ **79.40** चौ.कि.मी. एवढे आहे.

शासन निर्णय क्र . नभूमा/**1005/1605**/प्र.क्र.**11**/ल-**1**, दि.**30/01/2007** अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राचे नगरभूमापन खाजगी संस्थेद्वारे करुन घेणेबाबत मंजूरी मिळालेली आहे . त्याप्रमाणे विहीत कार्यपध्दतीनुसार निविदा प्रक्रिया पुर्ण करुन **1** कोटी **32** लक्ष या निविदे दरात काम पुर्ण करणेबाबत पुढील तीन खाजगी संस्थेची नियुक्ती करणेत आलेली आहे.

1. मे. राणे मॅनेजमेंट कन्सलटंट प्रा.लि., भाईंदर
2. मे. मोनार्च सर्व्हेअर ॲन्ड कन्सलटंट प्रा.लि., पुणे
3. मे. पी.एन. शिदोरे ॲन्ड कंपनी, कल्याण

व त्यांस दि.**25/01/2007** रोजी कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

सदर खाजगी संस्थेने त्यांचेकडील कामकाज पूर्ण करुन कामाबाबतचा अहवाल तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, ठाणे यांचे कार्यालयात सादर केलेला आहे . सदर खाजगी संस्थेने पूर्ण केलेल्या कामाचे देयक अदा करणेबाबत अधिक्षक भूमि अभिलेख, ठाणे यांनी दि.**03/02/2009** रोजी महानगरपालिकेस पत्र दिलेले होते व त्याप्रमाणे महानगरपालिकेने संबंधीतास रु **.74,03,673/-** देयक अदा केलेले आहे .

दि.**25/01/2007** रोजीच्या कार्यादेशानुसार मोजणीचे काम पूर्ण करण्याचा कालावधी कार्यादेश दिलेल्या दिनांकापासून **49** आठवडयाचा होता. हा कालावधी यापूर्वीच संपुष्टात आलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकूण **19** महसूली गावांपैकी मौजे उत्तन , डोंगरी, पाली, तारोडी, चौक या पांच गावांचे सर्व्हेक्षण काम स्थानिक नागरीकांच्या विरोधामुळे खाजगी संस्थेमार्फत नमुद कालावधीत होवू शकलेले नाही. याबाबत तत्कालीन मा. जमाबंदी आयुक्त, यांचे दालनातील दि.**21/12/2010** रोजीच्या आयोजित बैठकीत मा. जमाबंदी आयुक्त यांनी सदर प्रकरणी भूमापन न झालेल्या पांच गावांबाबत मिरा भाईंदर महानगरपालिकेने जातीने लक्ष घालून संबंधीत खाजगी संस्थेस मदत करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

सदर सूचनेच्या अनुषंगाने मा . आमदार, मा. महापौर, मा. उप-महापौर, मा. सभापती, स्थायी समिती, मा. सभागृह नेता, मा. गटनेता, मा. विरोधी पक्षनेता, सदर गावांतील स्थानिक नगरसेवक व लोकप्रतिनीधी तसेच जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख, ठाणे व उप-अधिक्षक, भूमि अभिलेख, ठाणे यांनी दि.**19/01/2011** रोजी मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे दालनात बैठकीस बोलाविण्यात आले होते.

सदर बैठकीस उपस्थित स्थानिक नेते व लोकप्रतिनिधी यांनी नियुक्त खाजगी संस्थेस उपरोक्त पांच गावांचे नगरभूमापन करणे करिता सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले होते व तद्अनुषंगाने मा . जमाबंदी आयुक्त आणि मा. संचालक, भुमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे यांस महानगरपालिकेने पत्र क्र. मनपा/नर/**1861/11-12** दि.**16/09/2011** अन्वये उपरोक्त **5** गावांतील नगर भूमापना बाबतच्या कामाची वस्तुस्थिती कळवून यापूर्वी महानगरपालिका क्षेत्रातील मोजणी पूर्ण झालेल्या **14** गावांबाबत (भाईंदर, नवघर, गोडदेव, खारी, काशी, घोडबंदर, मिरा, महाजनवाडी, पेणकरपाडा, राई, मुर्धे, मोरवा, चेणा, वरसावे) चौकशी अधिकारी **(Inquiry officer)** नेमून नगर भूमापनाचे काम पूर्ण करणेबाबत कळविले होते.

मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, (महाराष्ट्र राज्य), पुणे यांचे अध्यक्षतेखाली दि.**16/03/2012** रोजी शहरातील नगरभूमापनाबाबत आढावा बैठक आयोजित करणेत आली होती . सदर बैठकीत महानगरपालिका क्षेत्रातील ज्या **5** गावांची मोजणी जनतेच्या विरोधामुळे शिल्लक आहे. त्याबाबत जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख , ठाणे यांनी व संबंधीत खाजगी संस्थेने आयुक्त , मिरा भाईंदर महानगरपालिका यांची भेट घेऊन मोजणी संदर्भात काम पूर्ण करणेची कार्यवाही करावी व मोजणी झालेल्या **14** गावांपैकी **4** गावांचे चौकशी काम जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख, मुंबई उपनगर यांचे जिल्ह्यातील उप-अधिक्षक भूमि अभिलेख, नगर भूमापन अधिकारी यांचेकडून करुन घेणेबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत.

तद्नंतर उपरोक्त प्रकरणात दि **.09/01/2013** रोजी मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दालनात आयोजित बैठकीत मिरा भाईंदर महानगरपालिकेतील मोजणी न झालेल्या पाच गावांचे मोजणीचे काम मे **2013** पर्यंत पूर्ण करुन घेणेबाबतची कार्यवाही उप -संचालक, भूमि अभिलेख, जिल्हाधिक्षक भूमि अभिलेख, ठाणे यांनी करणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच सविस्तर मोजणी झालेल्या **14** गावांचे चौकशीचे काम शासनाकडून चौकशी अधिकारी यांची आस्थापना मंजूर झाल्यानंतर सदरचे काम हाती घेणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

तथापी आजमितीस मोजणी न झालेल्या **5** गांवांचे (उत्तन, पाली, चौक, डोंगरी, तारोडी) मोजणी काम सुरु झालेले नाही . तसेच मोजणी झालेल्या उर्वरीत **14** गावांपैकी सद्यस्थितीत नवघर या गावाच्या चौकशीचे काम सुरु असल्याचे समजते.

महानगरपालिका क्षेत्रातील गावठाण जागेच्या सनद अभावी गावठाण क्षेत्रातील ग्रामस्थ / रहिवाश्यांच्या जुन्या घराच्या पुर्नःबांधणी प्रस्तावात कार्यवाही करणे अडचणीचे होत आहे . तसेच शहरातील मा. आमदार, स्थानिक नगरसेवक व लोकप्रतिनिधी यांचेकडून नगरभूमापन कामाबाबत सातत्याने महानगरपालिकेकडे पाठपुरावा केला जात आहे. त्यामुळे भूमि अभिलेख विभागामार्फत मोजणी पूर्ण झालेल्या सर्व **14** गावांसाठी चौकशी अधिका -यांची नेमणूक करुन चौकशी अधिकारी **(Inquiry Officer)** यांच्या कामाची कालमर्यादा ठरवून त्याप्रमाणे नगरभूमापनाचे काम प्राधान्याने पूर्ण करुन घेण्याबाबत तसेच

मोजणी न झालेल्या 5 गावांची मोजणी सुरु करणेबाबत इकडून पत्र क्र . मनपा/नर/3425/2014-15, दि.16/03/2015 अन्वये मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक , भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे यांचे कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, 3 रा मजला, विधान भवनासमोर, पुणे यांना पत्र देण्यात आलेले आहे.

तरी याबाबत संबंधित गावातील लोकप्रतिनिधी , मा. आमदार महोदय, मा. महापौर महोदया, मा. उप-महापौर, मा. महानगरपालिकेचे सर्व पदाधिकारी , जसे मा . सभापती, स्थायी समिती, मा. सभागृह नेता, मा. गटनेता, मा. विरोधी पक्षनेता सदर गावातील स्थानिक नगरसेवक , मा. आयुक्त सो., तसेच सर्व संबंधित कार्यालयाचे अधिकारी यांचेसमवेत बैठक आयोजित करुन मोजणीबाबत पुढील रुपरेषा आखून पुढील कार्यवाही करणे योग्य होईल.

**ठराव :-**

**महापालिकेने सिटी सर्व्हेचे काम मिरा भाईंदर क्षे त्रातील 19 महसुली गावाचे काम सुरु करण्याचे आदेश दिले होते. त्यापैकी 14 गावाचे सिटी सर्व्हेचे काम पूर्ण झाले आहे . परंतु त्यापैकी 5 महसुली गावे जसे उत्तन, पाली, चौक, डोंगरी, तारोडी या गावांचे सिटी सर्व्हेचे काम नागरीकांच्या गैरसमजामुळे तेथील नागरीक ठेकेदारास काम करु देत नव्हते त्यामुळे ते काम आजतागायत पूर्ण झालेले नाही . सद्यस्थितीत तेथील नागरीकांचा गैरसमज दुर झालेला असून व त्यांनी प्रशासनाला व राज्यकर्त्यांना लेखी निवेदने , विनंती करुन सिटी सर्व्हेचे काम सुरु करण्यास कळविलेले आहे. तसेच मा. स्थानिक आमदार, मा. महापौर, मा. उपमहापौर व पदाधिकारी यांचे समवेत तेथील स्थानिक नागरीकांची बैठक प्रशासनाने आयोजित करावी व त्या बैठकीचे नियोजन प्रशासनाने करावे व तेथील नागरीकांना विश्वासात घेवून सदरचे काम सुरु करुन लवकरात लवकर पूर्ण करावे . जेणेकरुन शहरातील यापूर्वी झालेल्या 14 महसुली गावांचा सिटी सर्व्हेच्या कामासह याही 5 गावांच्या सिटी सर्व्हेचा प्रस्ताव मा . महासभेत मंजुरीस ठेवल्यास भविष्यात गावठण भागास सनद मिळेल व त्यामुळे तेथील नागरीकांना भविष्यात आपल्या जुन्या घराच्या नुतनीकरण अथवा दुरुस्तीसाठी अर्ज करुन महापालिकेकडून रितसर बां धकामाची परवानगी घेता येईल . सबब 19 महसुली गावांचा सिटी सर्व्हेचे काम पूर्ण झाल्याचा अहवाल पुढील मा. महासभेत मंजुरीस्तव ठेवण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.**

**विनोद म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ८९ :-**

**भाईंदर (पु.) व (प.), राई, मुर्धे, डोंगरी, तारोडी व उत्तन या परिसरातील महसुली गावांचा बाकी राहिलेला सिटी सर्व्हे करणेबाबत.**

**ठराव क्र. ८८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकूण 19 महसूली गावांचा समावेश होत असून महानगरपालिकेचे एकूण क्षेत्रफळ 79.40 चौ.कि.मी. एवढे आहे.

शासन निर्णय क्र . नभूमा/1005/1605/प्र.क्र.11/ल-1, दि.30/01/2007 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राचे नगरभूमापन खाजगी संस्थेद्वारे करुन घेणेबाबत मंजूरी मिळालेली आहे . त्याप्रमाणे विहीत कार्यपध्दतीनुसार निविदा प्रक्रिया पुर्ण करुन 1 कोटी 32 लक्ष या निविदे दरात काम पुर्ण करणेबाबत पुढील तीन खाजगी संस्थेची नियुक्ती करणेत आलेली आहे.

1. मे. राणे मॅनेजमेंट कन्सलटंट प्रा.लि., भाईंदर
2. मे. मोनार्च सर्व्हेअर ऍन्ड कन्सलटंट प्रा.लि., पुणे
3. मे. पी.एन. शिदोरे ऍन्ड कंपनी, कल्याण

व त्यांस दि.25/01/2007 रोजी कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

सदर खाजगी संस्थेने त्यांचेकडील कामकाज पूर्ण करुन कामाबाबतचा अहवाल तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, ठाणे यांचे कार्यालयात सादर केलेला आहे . सदर खाजगी संस्थेने पूर्ण केलेल्या कामाचे

देयक अदा करणेबाबत अधिक्षक भूमि अभिलेख, ठाणे यांनी दि.**03/02/2009** रोजी महानगरपालिकेस पत्र दिलेले होते व त्याप्रमाणे महानगरपालिकेने संबंधीतास रु **.74,03,673/-** देयक अदा केलेले आहे . दि.**25/01/2007** रोजीच्या कार्यादेशानुसार मोजणीचे काम पूर्ण करण्याचा कालावधी कार्यादेश दिलेल्या दिनांकापासून **49** आठवडयाचा होता. हा कालावधी यापूर्वीच संपुष्टात आलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकूण **19** महसूली गावांपैकी मौजे उत्तन , डोंगरी, पाली, तारोडी, चौक या पांच गावांचे सर्व्हेक्षण काम स्थानिक नागरीकांच्या विरोधामुळे खाजगी संस्थेमार्फत नमुद कालावधीत होवू शकलेले नाही. याबाबत तत्कालीन मा. जमाबंदी आयुक्त, यांचे दालनातील दि.**21/12/2010** रोजीच्या आयोजित बैठकीत मा. जमाबंदी आयुक्त यांनी सदर प्रकरणी भूमापन न झालेल्या पांच गावांबाबत मिरा भाईंदर महानगरपालिकेने जातीने लक्ष घालून संबंधीत खाजगी संस्थेस मदत करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

सदर सूचनेच्या अनुषंगाने मा . आमदार, मा. महापौर, मा. उप-महापौर, मा. सभापती, स्थायी समिती, मा. सभागृह नेता, मा. गटनेता, मा. विरोधी पक्षनेता, सदर गावांतील स्थानिक नगरसेवक व लोकप्रतिनीधी तसेच जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख, ठाणे व उप-अधिक्षक, भूमि अभिलेख, ठाणे यांनी दि.**19/01/2011** रोजी मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे दालनात बैठकीस बोलाविण्यात आले होते.

सदर बैठकीस उपस्थित स्थानिक नेते व लोकप्रतिनिधी यांनी नियुक्त खाजगी संस्थेस उपरोक्त पांच गावांचे नगरभूमापन करणे करिता सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले होते व तद्अनुषंगाने मा . जमाबंदी आयुक्त आणि मा. संचालक, भुमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे यांस महानगरपालिकेने पत्र क्र. मनपा/नर/**1861/11-12** दि.**16/09/2011** अन्वये उपरोक्त **5** गावांतील नगर भूमापना बाबतच्या कामाची वस्तुस्थिती कळवून यापूर्वी महानगरपालिका क्षेत्रातील मोजणी पूर्ण झालेल्या **14** गावांबाबत (भाईंदर, नवघर, गोडदेव, खारी, काशी, घोडबंदर, मिरा, महाजनवाडी, पेणकरपाडा, राई, मुर्धे, मोरवा, चेणा, वरसावे) चौकशी अधिकारी **(Inquiry officer)** नेमून नगर भूमापनाचे काम पूर्ण करणेबाबत कळविले होते.

मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, (महाराष्ट्र राज्य), पुणे यांचे अध्यक्षतेखाली दि.**16/03/2012** रोजी शहरातील नगरभूमापनाबाबत आढावा बैठक आयोजित करणेत आली होती . सदर बैठकीत महानगरपालिका क्षेत्रातील ज्या **5** गावांची मोजणी जनतेच्या विरोधामुळे शिल्लक आहे. त्याबाबत जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख , ठाणे यांनी व संबंधीत खाजगी संस्थेने आयुक्त , मिरा भाईंदर महानगरपालिका यांची भेट घेऊन मोजणी संदर्भात काम पूर्ण करणेची कार्यवाही करावी व मोजणी झालेल्या **14** गावांपैकी **4** गावांचे चौकशी काम जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख, मुंबई उपनगर यांचे जिल्ह्यातील उप-अधिक्षक भूमि अभिलेख, नगर भूमापन अधिकारी यांचेकडून करुन घेणेबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत.

तद्नंतर उपरोक्त प्रकरणात दि **.09/01/2013** रोजी मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दालनात आयोजित बैठकीत मिरा भाईंदर महानगरपालिकेतील मोजणी न झालेल्या पाच गावांचे मोजणीचे काम मे **2013** पर्यंत पूर्ण करुन घेणेबाबतची कार्यवाही उप -संचालक, भूमि अभिलेख, जिल्हाधिक्षक भूमि अभिलेख, ठाणे यांनी करणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच सविस्तर मोजणी झालेल्या **14** गावांचे चौकशीचे काम शासनाकडून चौकशी अधिकारी यांची आस्थापना मंजूर झाल्यानंतर सदरचे काम हाती घेणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

तथापी आजमितीस मोजणी न झालेल्या **5** गांवांचे (उत्तन, पाली, चौक, डोंगरी, तारोडी) मोजणी काम सुरु झालेले नाही. तसेच मोजणी झालेल्या उर्वरीत **14** गावांपैकी सद्यस्थितीत नवघर या गावाच्या चौकशीचे काम सुरु असल्याचे समजते.

महानगरपालिका क्षेत्रातील गावठाण जागेच्या सनद अभावी गावठाण क्षेत्रातील ग्रामस्थ / रहिवाश्यांच्या जुन्या घराच्या पुर्नःबांधणी प्रस्तावात कार्यवाही करणे अडचणीचे होत आहे. तसेच शहरातील मा. आमदार, स्थानिक नगरसेवक व लोकप्रतिनिधी यांचेकडून नगरभूमापन कामाबाबत सातत्याने महानगरपालिकेकडे पाठपुरावा केला जात आहे. त्यामुळे भूमि अभिलेख विभागामार्फत मोजणी पूर्ण झालेल्या

सर्व 14 गावांसाठी चौकशी अधिका -यांची नेमणूक करुन चौकशी अधिकारी (Inquiry Officer) यांच्या कामाची कालमर्यादा ठरवून त्याप्रमाणे नगरभूमापनाचे काम प्राधान्याने पूर्ण करुन घेण्याबाबत तसेच मोजणी न झालेल्या 5 गावांची मोजणी सुरु करणेबाबत इकडून पत्र क्र . मनपा/नर/3425/2014-15, दि.16/03/2015 अन्वये मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक , भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे यांचे कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, 3 रा मजला, विधान भवनासमोर, पुणे यांना पत्र देण्यात आलेले आहे.

तरी याबाबत संबंधित गावातील लोकप्रतिनिधी , मा. आमदार महोदय, मा. महापौर महोदया, मा. उप-महापौर, मा. महानगरपालिकेचे सर्व पदाधिकारी , जसे मा. सभापती, स्थायी समिती, मा. सभागृह नेता, मा. गटनेता, मा. विरोधी पक्षनेता सदर गावातील स्थानिक नगरसेवक , मा. आयुक्त सो., तसेच सर्व संबंधित कार्यालयाचे अधिकारी यांचेसमवेत बैठक आयोजित करुन मोजणीबाबत पुढील रुपरेषा आखून पुढील कार्यवाही करणे योग्य होईल.

**ठराव :-**

**महापालिकेने सिटी स र्व्हेचे काम मिरा भाईंदर क्षेत्रातील 19 महसुली गावाचे काम सुरु करण्याचे आदेश दिले होते. त्यापैकी 14 गावाचे सिटी सर्व्हेचे काम पूर्ण झाले आहे . परंतु त्यापैकी 5 महसुली गावे जसे उत्तन, पाली, चौक, डोंगरी, तारोडी या गावांचे सिटी सर्व्हेचे काम नागरीकांच्या गैरसम जामुळे तेथील नागरीक ठेकेदारास काम करु देत नव्हते त्यामुळे ते काम आजतागायत पूर्ण झालेले नाही . सद्यस्थितीत तेथील नागरीकांचा गैरसमज दुर झालेला असून व त्यांनी प्रशासनाला व राज्यकर्त्यांना लेखी निवेदने , विनंती करुन सिटी सर्व्हेचे काम सुरु करण्यास कळविलेले आहे. तसेच मा. स्थानिक आमदार, मा. महापौर, मा. उपमहापौर व पदाधिकारी यांचे समवेत तेथील स्थानिक नागरीकांची बैठक प्रशासनाने आयोजित करावी व त्या बैठकीचे नियोजन प्रशासनाने करावे व तेथील नागरीकांना विश्वासात घेवून सदरचे काम सुरु करुन लवकरात लवकर पूर्ण करावे . जेणेकरुन श हरातील यापूर्वी झालेल्या 14 महसुली गावांचा सिटी सर्व्हेच्या कामासह याही 5 गावांच्या सिटी सर्व्हेचा प्रस्ताव मा . महासभेत मंजुरीस ठेवल्यास भविष्यात गावठण भागास सनद मिळेल व त्यामुळे तेथील नागरीकांना भविष्यात आपल्या जुन्या घराच्या नुतनीकरण अथवा दुरुस्तीसाठी अर्ज करुन महापालिकेकडून रितसर बांधकामाची परवानगी घेता येईल . सबब 19 महसुली गावांचा सिटी सर्व्हेचे काम पूर्ण झाल्याचा अहवाल पुढील मा. महासभेत मंजुरीस्तव ठेवण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.**

**सुचक :- सौ. वर्षा भानुशाली        अनुमोदक :- श्री. विनोद म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र. ९०, **भाईंदर पश्चिम व पूर्व रेल्वे स्टेशन लगतच्या परीसराचे सुशोभिकरण करणे कामाबाबत.**

पंकज पांडेय :-

**मिरा भाईंदर महानगरपालिकेस शासनाच्या "मुलभूत सोई सुविधांचा वि कास" योजने अंतर्गत खालील कामांना दि.11 जुलै 2017 रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय खालीलप्रमाणे मान्यता मिळालेली आहे.**

| | | | |
|---|---|---|---|
| **1)** | **भाईंदर पश्चिम रेल्वे स्टेशन लगतच्या परीसराचे सुशोभिकरण करणे** | **-** | **रु.2.00 कोटी** |
| **2)** | **भाईंदर पूर्व रेल्वे स्टेशन लगतच्या परीसराचे सुशोभिकरण करणे** | **-** | **रु.1.00 कोटी** |

**वरील प्रमाणे भाईंदर पश्चिम व पूर्व रेल्वे स्टेशन समोर रस्ता रुंदीकरण करणेची कामे केल्याने मूळ सुशोभिकरण करणे कामाच्या क्षेत्रात वाढ झाल्याने शासनाने मंजूर केलेल्या वरील अनुदानातून**

**सुशोभिकरणाची कामे पूर्ण करणे शक्य नाहीत . त्यामुळे सदर कामाच्या जागेच्या ठिकाणी कामे करण्यासाठी नव्याने अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.**

**1) भाईंदर पश्चिम रेल्वे स्टेशन लगतच्या परीसराचे सुशोभिकरण करणे - रु.8,00,75,713/-**

**2) भाईंदर पूर्व रेल्वे स्टेशन लगतच्या परीसराचे सुशोभिकरण करणे - रु.5,00,00,000/-**

**वरील कामाच्या सुधारीत अंदाजपत्रकातील तरतुदीस प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे तसेच सदरचे काम महापालिका फंडातून करण्यात यावे . सदर कामाचा खर्च करण्यासाठी सन 2018-19 या वर्षाच्या मुळ अर्थसंकल्पात तरतुद करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.**

**सुनिता भोईर :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

शासनाला तेलाची मिठाई देण्याची सवय काय होती. मिठाई द्यायची चांगली शुध्द घीची द्यावी. खर्च इतका मोठा पैसे देत आहेत ३ कोटी रुपये शासनाने पैसे दिले. एवढा मोठा खर्च १३ कोटी रुपयाचा खर्च आहे. आणि निधी उपलब्ध करुन देत आहेत साहेब ३ कोटी रुपये हे योग्य आहे का? शासनाने असे करणे योग्य आहे का? खर्च इतका मोठा अफाट त्यांच्या विश्वासावर आम्हाला सांगितल आम्ही देऊ. मुख्यमंत्री आले होते ह्या शहरामध्ये ते बोलले आम्हाला पाहिजे तितका निधी देऊ निवडणुकीच्या आधी बोलून गेले. देताना निधी ३ कोटी रुपये बाकीचे १० कोटी आम्ही आणायचे कुठून? पालिकेची अर्थव्यवस्था बिघडून गेलेली आहे. सामान्य जनतेवर इतका खर्च, बोजा कराच्या माध्यमातून लादला आहे. ते पैसे कूठून काढतील. पारदर्शकपणे काम करतो पारदर्शक करताना पूर्ण पैसे द्या ना. अर्धवट का देता. साहेब तेवढच नाही भाईंदर पश्चिम, पूर्व आम्ही मिरारोड स्टेशनची सुरुवात केली चांगल्या कामाला सुरुवात केली. मिरारोड स्टेशन साहेब तुम्ही जाऊन बघा. संकल्पना मा. मुझफ्फर साहेबांची होती. चांगली सुरुवात केली स्टेशन सुशोभिकरण खरतर रेल्वेने केलं पाहिजे होतं. बाहेरचा परिसर त्यांनी नाकारला म्हणून आपण ती सुरुवात केली. एक चांगली सुरुवात पायंडा चांगला शहरामध्ये आम्ही टाकलेला आहे. भाईंदर पश्चिम, पूर्वेचाही स्टेशन चांगल करा. लागणारा निधी उपलब्ध नसेल तर महापालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद केली पाहिजे. टप्याटप्याने करा. एका वर्षामध्ये काही काम पूर्ण होत नाही जितकी वर्षामध्ये आपल्याला करणे शक्य आहे तेवढे करा. बाकी पुढच्या वर्षामध्ये पण एकदम त्याचा बोजा अर्थसंकल्पावर येणार नाही साहेब ते करताना तसेच साहेब मिरारोड म्हणजे साऊथ आम्ही नॉर्थ साईटचा जो स्टेशन आहे त्या विरारकडे जाणारी बाजू तर त्याचाही त्या कामामध्ये साहेब त्यालाही गृहित धरण्यात यावे. त्याचेही काम सुरु केले पाहिजे. आयुक्त महोदय ह्या विषयावर आम्ही ठराव तसा करुन देतो तुम्हाला. ठराव बहुमतांनी त्यांना ते काय करायचे ते करत राहतील. सुचना आमची आहे. साहेब प्रत्येक ठरावाला आम्ही सुचना करतो. त्याच्यामध्ये महत्व आहे. त्याचाही तुम्ही साहेब अवलोकन करावे अशी मी विनंती करतो.

**दिप्ती भट :-**

महापौर मॅडम आपल्या परवागनीने बोलते मिरारोड स्टेशनला जरा रेन्युव्हेट करायचा विषय आलेला २००७ ला तेव्हा आपण खुप त्याच्यामध्ये ठरावामध्ये जेव्हा टेंडर काढल तेव्हा नियम टाकले होते की फेरिवाले मुक्त करुन मग हे सगळ क्लिअर करुन घेऊया. त्या अनुषंगाने आपण तिथे अजून थोडे कमी पडले प्रशासन दुसरा विषय असा आहे की मिरारोड स्टेशन दक्षिणच्या बाजूला आपण रस्ता मोठा केला आणि तिथे राहणारे चाळ जी होती एवढ्या वर्षापासून त्या लोकांना आपण घरे देऊन तिथे रस्ता मोठा केला आहे. त्याची बाजू तशीच ठेवलेली आहे. तर आपण बोललेलो की तिथे सुशोभिकरण करणार आहोत. २०-०६-२०१६ मध्ये मी पत्र दिलेले आहे आणि २०-०२-२०१७ मध्ये पण बजेटमध्ये घेऊन त्यांना नमुद केलेले होते की हा दक्षिणेचा भाग पण घेण्यात यावा. आता मिरारोड स्टेशनच्या बाजूला रेल्वे वाल्यांनी काम रिपेअरींग करायला घेतलेले आहे. तर आपण तो रस्ता बनविला आणि लोकांना घरे दिली आणि मोकळा केला त्या हिशोबाने केलेला की तिथे पण इनव्हेस्ट करायचा आहे. पण आपल्या ठरावामध्ये तिथे पण नाही म्हणून आम्ही ठराव मांडतो. नाही तर आमची सुचना घ्या की मिरारोड स्टेशन पोस्ट ऑफिससाठी पण आपण ते राहिलेले काम आहे ते पूर्ण घेण्यात यावे. **मिरा भाईंदर महानगरपालिकेस शासनाच्या "मुलभूत सोई सुविधांचा विकास " योजने अंतर्गत खालील कामांना दि .11 जुलै 2017 रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय खालीलप्रमाणे मान्यता मिळालेली आहे.**

**1) भाईंदर पश्चिम रेल्वे स्टेशन लगतच्या परीसराचे सुशोभिकरण करणे - रु.2.00 कोटी**

**2) भाईंदर पूर्व रेल्वे स्टेशन लगतच्या परीसराचे सुशोभिकरण करणे - रु.1.00 कोटी**

**मुळ सुशोभिकरण करण्याच्या क्षेत्रात वाढ झाल्याने**
**शासनाने मंजूर केलेल्या वरील अनुदानातून सुशोभिकरणाची कामे पूर्ण करणे शक्य नाहीत . सदर कामाच्या जागेच्या ठिकाणी काम करण्यासाठी नव्याने अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.**

**1) भाईंदर पश्चिम रेल्वे स्टेशन लगतच्या परीसराचे सुशोभिकरण करणे - रु.8,00,75,713/-**
**2) भाईंदर पूर्व रेल्वे स्टेशन लगतच्या परीसराचे सुशोभिकरण करणे - रु.5,00,00,000/-**
**3) तसेच मिरारोड रेल्वे स्टेशन दक्षिणेकडील बाजु परिसर सुशोभिकरण करणेबाबत प्रस्तावित खर्च ५,००,००,००० रुपये अपेक्षित आहे.**

**वरील कामासाठी १८,००,७५,७१३ रुपये रकमेचे अंदाज तयार करुन शासनाकडून ३,००,००,००० रुपये खर्चाचा निधी उपलब्ध करुन देणेसाठी मान्यता आहे. सदर कामाचा उर्वरीत १५,००,७५,७१३ रुपये निधी उपल ब्ध होण्यासाठी शासना कडे प्रस्ताव पाठवून निधी उपल ब्ध झाल्यास काम पूर्ण करुन घेण्यासाठी पुढील कारवाई करावी असा मी ठराव मांडत आहे.**

**स्नेहा पांडे :-**
माझे अनुमोदन आहे.

**दिप्ती भट :-**
मॅडम आपण ते सगळी घर खाली करुन तिथे बनवायचे नव्हते तर घर खाली करुन लोकांना घरे चेजेंस करायची काय गरज होती आणि आम्ही पण शांती नगरचे सर्व लोक पुनम सागर, सृष्टी सगळे शांती पार्क सगळी लोक टॅक्स भरतात आणि तिथे आम्हाला पण सगळ्यांची सुचना मला वाटत सगळ्यांची भावना अशी असेल सत्ताधाऱ्यांची पण की तिथे सुशोभिकरण होणे गरजेचे आहे. कारण आपण तिथे पूर्ण मार्ग खाली करुन कशाला केल? म्हणून आपल्याला विनंती आहे की ही सुचना घेतली तर बर होईल.

**मा. महापौर :-**
सचिव महोदय मतदान करा. दोन ठराव आलेले आहेत.

**प्र. नगरसचिव :-**
प्रकरण क्र. ९० करीता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. पंकज पांडेय, अनुमोदन श्रीम. सुनिता भोईर. दुसरा ठराव सुचक श्रीम. दिप्ती भट, अनुमोदन श्रीम. स्नेहा पांडे. प्रथम दुसरा ठराव मतदानास टाकतो. सुचक श्रीम. दिप्ती भट यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. पंकज पांडेय यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**
सुचक श्री. पंकज पांडेय सुर्यमणी यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ५०, विरोधात २६, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहे. श्री. पंकज पांडेय यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजूर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ९० :-**

**भाईंदर पश्चिम व पूर्व रेल्वे स्टेशन लगतच्या परीसराचे सुशोभिकरण करणे कामाबाबत.**

ठराव क्र. ८९ :-

**मिरा भाईंदर महानगरपालिकेस शासनाच्या "मुलभूत सोई सुविधांचा विकास " योजने अंतर्गत खालील कामांना दि.11 जुलै 2017 रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय खालीलप्रमाणे मान्यता मिळालेली आहे.**

**1) भाईंदर पश्चिम रेल्वे स्टेशन लगतच्या परीसराचे सुशोभिकरण करणे - रु.2.00 कोटी**
**2) भाईंदर पूर्व रेल्वे स्टेशन लगतच्या परीसराचे सुशोभिकरण करणे - रु.1.00 कोटी**

वरील प्रमाणे भाईंदर पश्चिम व पूर्व रेल्वे स्टेशन समोर रस्ता रुंदीकरण करणेची कामे केल्याने मूळ सुशोभिकरण करणे कामाच्या क्षेत्रात वाढ झाल्याने शासनाने मंजूर केलेल्या वरील अनुदानातून सुशोभिकरणाची कामे पूर्ण करणे शक्य नाहीत . त्यामुळे सदर कामाच्या जागेच्या ठिकाणी कामे करण्यासाठी नव्याने अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

1) भाईंदर पश्चिम रेल्वे स्टेशन लगतच्या परीसराचे सुशोभिकरण करणे - रु.8,00,75,713/-

2) भाईंदर पूर्व रेल्वे स्टेशन लगतच्या परीसराचे सुशोभिकरण करणे - रु.5,00,00,000/-

वरील कामाच्या सुधारीत अंदाजपत्रकातील तरतुदीस प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे तसेच सदरचे काम महापालिका फंडा तून करण्यात यावे . सदर कामाचा खर्च करण्यासाठी सन 2018-19 या वर्षाच्या मुळ अर्थसंकल्पात तरतुद करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. पंकज पांडेय अनुमोदन :- श्रीम. सुनिता श. भोईर

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजू यशवंत | |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | परेरा कॅटलीन एन्थोनी | |
| ५ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ५ | नलावडे दिनेश दगडु | |
| ६ | पाटील प्रभात प्रकाश | ६ | शिर्के अनंत गेणू | |
| ७ | सिंह मदन उदितनारायण | ७ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| ८ | भानुशाली वर्षा गिरधर | ८ | सावंत अनिल दिवाकर | |
| ९ | यादव मिरादेवी रामलाल | ९ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| १० | हसनाळे ज्योत्सना जालींदर | १० | पाटील जयंतीलाल गुरुनाथ | |
| ११ | गोहिल शानू जोरावर सिंह | ११ | कदम अर्चना अरुण | |
| १२ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | १२ | पाटील अनिता जयवंत | |
| १३ | भोईर सुनिता शशिकांत | १३ | पांडे स्नेहा शैलेश | निरंक |
| १४ | रावल मेघना दिपक | १४ | भट दीप्ती शेखर | |
| १५ | मोकाशी दिपाली आनंदराव | १५ | गुप्ता कुसुम संतोष | |
| १६ | जैन सुनिता रमेश | १६ | भोईर भावना राजू | |
| १७ | नाईक विविता विवेक | १७ | शेख रुबीना फिरोझ | |
| १८ | भावसार वंदना संजय | १८ | सपार उमा विश्वनाथ | |
| १९ | बेलानी हेमा राजेश | १९ | परदेशी गिता हरीश | |
| २० | भोईर विणा सुर्यकांत | २० | सय्यद नुरजाहाँ नाझर हुसेन | |
| २१ | सोनार सुरेखा प्रकाश | २१ | पाटील नरेश तुकाराम | |
| २२ | मुखर्जी अनिता बबलू | २२ | शेख अमजद गफार | |
| २३ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २३ | पाटील वंदना विकास | |
| २४ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | २४ | पाटील संध्या प्रफुल्ल | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २५ | शाह राकेश रतिशचंद्र | २५ | भोईर कमलेश यशवंत | |
| २६ | शेट्टी अरविंद आनंद | २६ | बांड्या एलायस दुमिंग | |
| २७ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| २८ | तिवारी अशोक सूर्यदेव | | | |
| २९ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ३० | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३१ | कांगणे मीना यशवंत | | | |
| ३२ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ३३ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३४ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ३५ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ३६ | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| ३७ | थेराडे संजय अनंत | | | |
| ३८ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ३९ | जैन राजेंद्र भवरलाल | | | |
| ४० | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ४१ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ४२ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ४३ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ४४ | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | | |
| ४५ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ४६ | व्यास रवि वासुदेव | | | |
| ४७ | खंडेलवाल सुरेश जगदीश | | | |
| ४८ | पांडेय पंकज सूर्यमणि | | | |
| ४९ | भोईर गणेश गजानन | | | |
| ५० | पारधी सुजाता यशवंत | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९१, **महानगरपालिकेच्या मालमत्ता भाड्याने देणेबाबत धोरण ठरविणे.**

**धृवकिशोर पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्ता असून त्यामध्ये मैदाने , आर.जी व खुले क्षेत्र , उद्याने, समाजमंदीरे, व्यायामशाळा, इमारती अभ्यासिका, विरंगुळा केंद्र, क्रिकेट पीच, मार्केट मधील गाळे, नव्याने विकसित केलेले कम्युनिटी हॉल , स्मशानूमी, दफनभूमीचा समावेश होतो. सदर मालमत्ता विविध

कार्यक्रमांसाठी विविध संस्थाकडून भाडयाने तसेच संचलन व देखभाल दुरुस्तीसाठी मागण्यात येते . तथापी सदर मालमत्ता भाडयाने देणेबाबत ठरविलेले दर हे कमी असून त्यामधून मालमत्तेच्या देखभाल व दुरुस्तीचा खर्च देखिल निघु शकत नाही , त्याकरीता सर्व दर नव्याने ठरविण्याची आवश्यकता आहे . तसेच सदर मालमत्ता भाडयाने देताना प्रचलित कायदे , शासन निर्णय यांचे काटेकोररीत्या पालन होण्याची आवश्यकता असून महानगरपालिकेमार्फत देखिल मालमत्ता भाडयाने देण्यासाठी पात्रता निकष व अटीशर्ती बाबत धोरण ठरविण्याची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत भाडे बाबतचा खालीलप्रमाणे तपशिल व प्रस्ताव देण्यात येत आहे.

| अ. क्र. | मालमत्ता प्रकार | **ठरविण्यात येत** भाडे प्रतिदिन | | अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | समाजमंदीरे / कम्युनिटी हॉल / इतर वास्तूमधील जागा / शाळेमधील वर्ग | | | |
| | अ) **(500 चौ.फुटापर्यंत)** | **रु.1500/-** | | |
| | ब) **(500 चौ.फुटवर)** | **रु.3,000/-** | | |
| 2 | मंगल कार्यालय नगरभवन | | | |
| | अ) **(वातानुकुलित)** | **रु.7500/-** | | **रु.2,000/-** |
| | ब) **(विना वातानुकुलित)** | **रु.6,000/-** | | **रु.3,000/-** |
| | ओपन टेरेस | **रु.5,000/-** | | **रु.2,000/-** |
| | दिवाबत्ती दर | **रु.15/-** प्रति युनिट | | **-** |
| | खुर्ची भाडे | **रु.5/-** प्रति नग | | **-** |
| | पाणी वापर**,** | **रु.500/-** | | **-** |
| | साफसफाई खर्च | **रु.1,000/-** | | **-** |
| 3 | मैदाने**,** आरजी क्षेत्र**,** खुल्या जागा**,** उद्याने | **लहान जागा आर.जी. व इतर भूखंड** | **मोठ्या जागा मैदाने** | |
| | | | | **रु.1,000/-** |
| | अ) शाळेच्या शैक्षणिक कार्यक्रमासाठी **आर.जी. मोकळे भूखंड** | | | **रु.1,000/-** |
| | ब) खेळांसाठी / क्रिडास्पर्धा | | | **रु.1,000/-** |
| | क) धार्मिक कार्यक्रमासाठी | **रु.3,000/-** | **रु.5,000/-** | **रु.1,000/-** |
| | ड) स्वातंत्र दिन**,** महाराष्ट्र दिन आणि त्या प्रकारच्या राष्ट्रीय व | **रु.3,000/-** | **रु.5,000/-** | |
| | महत्वाच्या प्रसंगी व राष्ट्रीय महापुरुषांच्या जयंतीच्या व | **रु.3,000/-** | **रु.5,000/-** | |
| | पुण्यतिथी समारंभासाठी | **रु.3,000/-** | **रु.5,000/-** | |

| | | | |
|---|---|---|---|
| **4** | क्रिकेट खेळपट्टया<br><u>सीझन खेळपट्टी</u><br>शाळा / महाविद्यालयीन विदयार्थी<br><br>शहरातील क्लब / संघ<br><br>शहराबाहेरील क्लब / संघ<br><br><u>मॅट विकेट</u><br>शाळा / महाविद्यालयीन विदयार्थी<br><br>शहरातील क्लब / संघ<br><br>शहराबाहेरील क्लब / संघ<br><br><u>साधी खेळपट्टी</u><br>शाळा / महाविद्यालयीन विदयार्थी<br><br>शहरातील क्लब / संघ<br><br>शहराबाहेरील क्लब / संघ<br><br><u>टेनिस खेळपट्टी</u><br>शाळा / महाविद्यालयीन विदयार्थी<br><br>शहरातील क्लब / संघ<br><br>शहराबाहेरील क्लब / संघ | रू.**100/-**प्रति महिना<br>**(दररोज 2**तास**)**<br><br>रू.**600/-**प्रति महिना<br>**(दररोज 2**तास**)**<br>रू.**800/-**प्रति महिना<br>**(दररोज 2**तास**)**<br><br><br>रू.**250/-** प्रति महिना<br>**(दररोज 2**तास**)**<br>रू.**1200/-** प्रति महिना<br>**(दररोज 2**तास**)**<br>रू.**1800/-** प्रति महिना<br>**(दररोज 2**तास**)**<br><br>रू.**100/-** प्रति महिना<br>**(दररोज 2**तास**)**<br><br>रू.**100/-** प्रति महिना<br>**(दररोज 2**तास**)**<br><br>रू.**1300/-** प्रति महिना<br>**(दररोज 2**तास**)**<br><br>रू.**100/-** प्रति महिना<br>**(दररोज 2**तास**)**<br>रू.**150/-**प्रति महिना<br>**((दररोज 2**तास**)**<br>रू.**300/-** प्रति महिना<br>**(दररोज 2**तास**)** | **-**<br><br>**-**<br><br>**-**<br><br>**-**<br><br>**-**<br><br>**-**<br><br><br>**-**<br>**-**<br>**-**<br><br><br>**-**<br>**-**<br>**-** |
| **5** | शुटींगसाठी रस्ता मालमत्ता भाडयाने देणे.<br>रस्ता<br>उद्यान व मैदान<br>(1 एकर क्षेत्रापर्यत)<br><br>(1एकरच्या वरील क्षेत्रासाठी) | <br>रु.**25,000/- प्रति ठिकाण**<br><br>रु.**50,000/- प्रति ठिकाण**<br><br>रु.**1,00,000/-प्रति ठिकाण** | <br><br>रु.**25,000/**<br><br>रु.**25,000/**<br><br>रु.**25,000/** |
| **6** | रस्ते, सार्वजनिक जागावर मंडप परवानगी<br>अ) मंडप परवानगी (विक्री करीता) | <br>रु.**5.00** प्रति चौ.फुट/ प्रति | <br>**-** |

| | | | |
|---|---|---|---|
| | ब) मंडप परवानगी (लग्न / इतर उत्सव)<br><br>क) गेट/कमानी/बॅनर (धार्मिक शैक्षणिक संस्था)<br><br>ड) गेट / कमानी / बॅनर (इतर संस्था) | दिन<br><br>रु.**1.00/-** प्रति चौ.फुट / प्रति दिन<br><br>रु.**1000/-** प्रति गेट/ प्रति दिन<br><br>रु.**3000/-** प्रति गेट/ प्रति दिन | **-**<br><br>**-**<br><br>**-** |
| **7** | स्ट्रीट लाईट पोलवर एरीयल केबल टाकणेस परवानगी देणे | रु.200/- प्रति पोल/ महिना<br>रु.50,000/- प्रतिकि.मीटर | -<br>- |
| **8** | सार्वजनिक जागा, फुटपाथ यावर ठेवण्यात येणारे सामान | रु.50 चौफुट प्रतिदिन दंड (विनापरवानगी) R **ले** tro **अंमलबजावणी करणे.** | |

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची समाज मंदिरे, व्यायामशाळा, वाचनालय व योगा शेड इ. मालमत्ता <u>तीन ते पाच वर्ष मुदतीसाठी भाड्याने देण्यासाठीचे धोरण.</u>**

1) **महानगरपालिकेच्या कोणत्याही मालमत्ता सेवाभावी / खाजगी संस्थांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनूसार भाड्याने देण्यात याव्यात.**
2) **मालमत्ता 3 वर्ष मुदतीसाठी करारनामा करुन देण्यात येईल.**
3) **सदर नेमलेल्या संस्थानी फक्त त्यां च्या संस्थेचा फलक महानगरपालिकेकडून मजकूर मंजूर करुन घेऊन लावण्यास यावा. तसेच महानगरपालिकेत नामकरण केलेली नाम फलक सुध्दा बसवुन द्यावा लागेल. त्याचे मोजमाप सर्व मनपा हद्दीमध्ये समान राहील.**
4) **मालमत्तेची दैनंदिन साफसफाई व सुरक्षा व्यवस्था संस्थेस करावी लागेल , महानगरपालिकेमार्फत कर्मचारी नेमण्यात येणार नाहीत.**
5) **सदर मालमत्तेची देखभाल दुरुस्ती, रंगरंगोटी कामे महानगरपालिकेच्या सुचनेप्रमाणे वेळोवेळी करावी लागतील.**
6) **सदर ठिकाणी वीज जोडणी व पाणी जोडणी महानगरपालिकेमार्फत देण्यात येईल , तथापी त्याची मासिक देयक संस्थेस भरावे लागेत.**
7) **मंजूर नकाशा व्यतिरिक्त अतिरिक्त कोणतेही बांधकाम करता येणार नाही**
8) **परस्पर इतर कोणत्याही संस्थेस अथवा इसमास सदर मालमत्ता देता येणार नाही**
9) **सदर मालमत्ता दैनदिन संचलन, देखभाल व दुरुस्ती कशाप्रकारे करणार या बाबत कर्मचाऱ्याची पदे संस्था, वेतन या सह माहिती द यावी लागेल. त्या कर्मचाऱ्यांचे कोणतेही दायीत्व मनपाचे राहणार नाही.**
10) **नेमलेल्या कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायदयानूसार वेतन देणे बंधनकारक राहील**
11) **सदर जागेच्या ठिकाणी काही अपघात घडल्यास अथवा हानी झाल्यास संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील.**
12) **मालमत्तेच्या जागेबाबत वाद निर्माण झाल्यास करारनामा रद्द करण्यात येईल.**
13) **दैनदिन संचलन, देखभाल व दुरुस्तीचे काम समाधानकारक न आढळल्यास 7 दिवसाची नोटीस देऊन करारनामा रद्द करण्यात येईल.**
14) **सदर संस्थांनी मागील तीन वर्षाच्या Audited Balance Sheet जोडणे बंधनकारक राहील.**

**15) संबंधित संस्थानी मालम त्ता कशाप्रकारे देखभाल दुरुस्ती करणार तसेच महानगरपालिकेस त्या व्यतिरिक्त काय मदत करणार याचा उल्लेख करणे आवश्यक राहील.**

**16) प्राप्त अर्जातुन मागणीनुसार कोणत्याही एका संस्थेस एक अथवा एकापेक्षा जास्त मालमत्ता देखभाल, संचलन, दुरुस्तीसाठी देण्याबाबतचा अंतिम निर्णय आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचा राहील.**

**17) सदर संस्था महानगरपालिकेची कोणेत्याही देयकाची थकबाकीदार नसावी.**

**18) यशस्वी संस्थेकडून भाड्याच्या कालावधी करीता सुरक्षा अनामत रककम ठरवून घेण्यात यावी.**

**19) सदर मालमत्ता सेवाभावी व धर्मदाय आयुक्तांकडील नोंदणीकृत संस्थेस भाड्याने देण्यात यावी.**

**20) वाहनतळ आरक्षणातील जागा धार्मिक व इतर कार्यक्रमासाठी भाड्याने देण्यात यावी.**

**21) सर्व मालमत्त देताना भाड्यासोबत जी.एस.टी. रक्कम वसूल करण्यात यावी.**

<u>सद्यस्थिसतीत खालील मालमत्ता भाड्याने देण्याची यादी निश्चिठत करण्यात येत</u> आहे.

1) धारावी समाज मंदीर
2) राई व्यायामशाळा
3) भाईंदर (प.) आंबेडकर नगर आखाडा
4) डोंगरी व्यायामशाळा
5) खारीगाव रंगमंच
6) गावदेवी मंदीर व्यायाम शाळा, मुर्धा गाव
7) मोर्वा गाव व्यायाम शाळा
8) घोडबंदर गाव व्यायाम शाळा
9) विधीशेड जेसलपार्क

**या व्यतिरीक्त इतर मालमत्ता दीर्घ मुदतीसाठी भाड्याने देण्यात येऊ नये. यापूर्वी भाड्याने दिलेल्या व मुदत संपलेल्या तसेच करारनामा रद्द केलेल्या सर्व मालमत्ता रिकामी करून ताब्यात घेण्यात याव्यात व ठरविलेल्या भाड्यानूसार अल्प मुदतीसाठी भाड्याने देण्यात याव्यात.**

<u>महानगरपालिकेच्या मालमत्ता अल्प मुदतीसाठी भाड्याने देण्यासाठीचे धोरण</u>.

1) धार्मिक कार्यक्रम व नवरात्रोत्सवासाठी मैदाने भाड्याने देण्यासाठी मा. महासभेने ठरविलेले भाडे पहील्या दिवसासाठी आकारण्यात येईल . तद्नंतर च्या दिवसासाठी रु .1000/- प्रति दिन भाडे आकारण्यात येईल.
2) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अ नुसार मैदाने व इतर जागा भाडयाने देण्याची दक्षता घेण्यात येईल. इतर वेळेस मैदाने व इतर जागा सर्वसाधारण नागरीकाच्या वापरासाठी खुली राहील.
3) मैदाने / उद्याने व कोणत्याही मालमत्ता महापालिकेच्या कार्यक्रमाकरिता विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात येतील. महानगरपालिकेच्या मालमत्ता कोणत्याही राजकीय पक्षांच्या कार्यक्रमासाठी उपलब्ध करुन दिली जाणार नाहीत त्यासाठी उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास मा. आयुक्त महोदय यांची मंजुरी घेणे आवश्यक राहील.
4) मैदाने, सभागृह व मालमत्ता प्रामुख्याने शैक्षणिक, सामाजिक व वैज्ञानिक उपक्रमांना प्राधान्याने देण्यात येतील.
5) सभागृहात भोजन व खानपान व्यवस्था करता येणार नाही.
6) कोणतीही मालमत्ता, सभागृहे / मैदाने भाडयाने देण्याचे अधिकार मा. आयुक्त यांनी अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्यांचे राहतील.
7) कोणतीही मालमत्ता, सभागृहे / मैदाने याबाबत आरक्षणाचे बाबतीत काही वाद निर्माण झाल्यास त्याचे अधिकार मा. आयुक्त महोदय यांना राहतील.
8) कोणतीही मालमत्ता, सभागृहे / मैदाने यांची देखभाल निगा व दुरुस्ती कार्यकारी अभियंता तथा मिळकत व्यवस्थापक यांचे अधिपत्याखाली राहतील.

9) कोणतीही मालमत्ता, सभागृहे / मैदाने भाडयाने देतांना भाडयांत सवलत देण्याचे अधिकार मा . आयुक्त महोदय यांना राहतील.

10) मालमत्तेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास तयाची जबाबदारी संबंधित व्यक्ती/ संस्थेवर राहील व संबंधितांचे (डिपॉझीट) अनामत रक्कम जप्त करण्यांत येईल व दंड आकारुन नुकसान भरपाई वसूल करण्यात येईल.

11) कार्यक्रम रद्द झाल्यास सदरच्या कार्यक्रमासाठी भरलेले भाडे संबंधितांना परत मिळणार नाही. परत द्यावयाचे झाल्यास मा.आयुक्त महोदय यांची परवानगी घेणे आवश्यक राहील.

12) महापालिकेस मालमत्तेच्या जागा, सभागृहे / मैदाने यांची आवश्यकता असल्यास संबंधितांचे आरक्षण रद्द करणेत येईल व सदरचे संस्थेस / व्यक्तीस जागा खाली करुन पालिकेच्या ताब्यात द्यावे लागेल व संबंधितांस सदरबाबतीत कोणतीही नुकसान भरपाई देण्यात येणार नाही.

13) कोणत्याही मालमत्तेबाबत वाद निर्माण झाल्यास मा.आयुक्त महोदय यांचे आदेश अंतिम राहतील व सदरचा आदेश संबंधितांवर बंधनकारक राहील.

14) शासनाकडून वेळोवेळी येणाऱ्या सुचना/ आदेश यांचे पालन करणे संबंधितांवर बंधनकारक राहतील.

15) ज्या संस्थेस / व्यक्तीस महानगरपालिकेच्या मालमत्ता भाडयाने देण्यात आले असेल त्या संस्थेस / व्यक्तीस कोणत्याही कारणास्तव सदरहू मालमत्ता इतर संस्थेस / व्यक्तीस वापरास परस्पर देता येणार नाही.

16) मालमत्ता भाड्याने आरक्षण ज्या दिवसापासून पाहिजे आहे तो दिवस वगळुन अगोदर **60** दिवस मैदान / सभागृह आरक्षीत करता येईल. त्या आधी आलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

17) मालमत्ता वापरासाठी उपयोग अनुज्ञेय करतांना त्या अनुषंगाने येणारे नियम आदेश नियमावली न्यायालयाचे आदेश व मुंबई पोलिस अधिनियमाखाली जारी केलेल्या आदेशाचे पालन काटेकोरपणे करावे लागेल.(महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना (सुधारणा) अध्यादेश **1997** या महाराष्ट्र अध्यादेश क्र.**14** अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम **1966** चा महाराष्ट्र अधिनियम क्र.**37** (अ) नुसार.

18) महापालिकेने मालमत्ता भाडयाने देणेबाबत वेळोवेळी दिलेले आदेश संबंधितांवर बंधनकारक राहतील.

19) महानगरपालिका मालमत्तेमध्ये कोणत्याही कार्यक्रम करण्यापुर्वी त्या त्या कार्यक्रमाच्या स्वरुपाच्या अनुषंगाने केंद्र/राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियम व आदेशाची पुर्तता व अनुपालन करणे संबंधितांवर बंधनकारक राहील . याबाबत कोणत्याही प्रकारे नियमभंग झाल्यास त्याची जबाबदारी संपुर्णपणे संबंधित व्यक्ती / संस्थेची राहील.

